# माणूस

## चित्र वार्ता पुस्तक

जानेवारी १९७४

एक रुपया



# टॉलस्टॉय - एक माणूस

एक अप्रसिद्ध प्राध्यापिका. मुक्काम मुंबई. प्रथमश्रेणीचे यश, फेलोशिप, पारितोषिके इत्यादी मानसन्मान लाभलेली. संस्कृत, मराठी, इंग्लीशमधील अभिजात साहित्य हा अध्ययन-अध्यापनाचा, चिंतनाचा विषय. एका सुट्टीत टॉलस्टॉयची ' वॉर अँन्ड पीस ' ही दोन हजार पृष्ठांची प्रचंड कादंबरी वाचायला घेतली आणि प्राध्यापिका अक्षरशः टॉलस्टॉयमय होऊन गेली.

टॉलस्टॉयने लिहिलेले सर्व साहित्य या झपाट्यात वाचून झाले. पण यातून जागृत झाले टॉलस्टॉय या व्यक्तिविषयीचे जबरदस्त कुतूहल. मग सर्व चरित्रे पाहून झाली. त्यांचा तुलनात्मक अभ्यास झाला. संत टॉलस्टॉय, विषयोपभोगात आकंठ बुडालेला टॉलस्टॉय; काऊंट टॉलस्टॉय आणि शेतमजूर टॉलस्टॉय; साहित्यिक टॉलस्टॉय आणि चळवळ्या टॉलस्टॉय–गुंतागुंत वाढतच गेली. ही उलगडण्यासाठी टॉलस्टॉय साहित्य आणि टॉलस्टॉय चरित्राबरोबरच आत्मचरित्रात्मक सर्व टिपण्या, दैनंदिन्या, पत्रे, स्मृतीग्रंथ, मुलामुलींनी व शेजाऱ्यापाजाऱ्यांनी लिहिलेल्या आठवणी, इतर समकालिनांच्या दैनंदिन्या, तात्कालिन प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे, टॉलस्टॉयकालीन रशियाचा राजकीय–सांस्कृतिक इतिहास–भूगोलसुद्धा; मुंबईस येणाऱ्या-जाणाऱ्या निवडक रशियन व्यक्तींच्या प्रत्यक्ष भेटीगाठी; अगदी आज अमेरिकेत हयात असणाऱ्या टॉलस्टॉयच्या वृद्ध कन्येशी पत्रव्यवहार– प्राध्यापिकेने यापैकी काहीही करावयाचे, उलगडावयाचे बाकी ठेवले नाही.

अनेक वर्षे या शोधात आणि चिंतनात गेल्यावर प्राध्यापिकेला वाटू लागले, की हे सर्व लिहून काढावे. आपल्याला गवसले ते इतरांना दाखवावे. पण आपण कुणी लेखिका वगैरे नाही ही एक खंत होती. शेवटी ज्यांनी प्राध्यापिकेचे हे सगळे श्रम, यातून तिच्या-जवळ जमा झालेले प्रचंड टॉलस्टॉय भांडार जवळून पाहिले, त्यांच्या सततच्या आग्रहाला आणि प्रोत्साहनाला यश आले आणि टॉलस्टॉय जीवनाचा सर्वांगाने वेध घेणारी भरीव आणि भारदस्त, सर्वांगसुंदर आणि अंतःकरणाचा सरळ ठाव घेणारी एक प्रेरक चरित्रकृती साकार झाली.

प्राध्यापिका : सौ. सुमती देवस्थळे

चरित्रकृती : टॉलस्टॉय–एक माणूस

विषय नवीन, लेखिका नवीन, चरित्राची मांडणीही नवीन. मराठीत तरी या स्वरूपाचे चरित्रलेखन अद्याप झालेले नाही. म्हणून या अंकी एक कवडसा–पृष्ठ १३ वर. चरित्रग्रंथ लिहून झाल्यावर लेखिकेने लिहिलेली ही तीन स्वैर टिपणे. यावरून लेखिकेचा या विषयाचा व्यासंग आणि चरित्रलेखनामागील भूमिका स्पष्ट व्हावी. शिवाय शक्यतो लवकर राजहंस प्रकाशनतर्फे हा ग्रंथ प्रसिद्ध व्हावा अशी योजना आहे. त्यासाठी लोका-श्रयाची गरज आहे. तो भरपूर प्रमाणात लाभावा हाही या टिपणांच्या प्रसिद्धीमागील एक हेतू आहे. आज प्रकाशन व्यवसाय इतका अडचणीत सापडला आहे, की अशा उदार लोकाश्रयाशिवाय मौलिक मराठी साहित्य प्रकाशित करणे हळुहळू अशक्य ठरत आहे.


–संपादक

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

# माणूस चित्र वार्ता पुस्तक

पंधरा जानेवारी १९७४ एक रूपया अंक बारावा



माझे केस निर्वासितासारखे वाऱ्यावर उडत असताना
नीट करून देत नाही कुणी
मी काही तुला मागितले होते का ?
काही मागतो का तुला
मी डार्लिंग ?
जीवन कुशीत घेऊन, मृत्यू उशाला ठेऊन
इथे आलो मी,
तक्रार रहित रुजलो मी.
न्हालो आयुष्य पसरून. या ऋतुशून्य पावसात.
—ग्रेस


## ‘ग्रेस’ स्थानिक मातीला खिळून असल्याची साक्ष त्यांची कविता देते —दुर्गाबाई

९ जानेवारी, पुरंदरे सभागृह, साहित्यसंघ मंदिर.
अमेय प्रकाशनाचा मुंबईतील सोहळा.
ग्रेसच्या कवितासंग्रहाचा, त्यातील सुभाष अवचटच्या रेखाचित्रांचा आणि त्यासाठी उपस्थित असलेल्या अनेक आप्त, रसिक साहित्यिकांचा सुंदर, सुबद्ध, सुव्यवस्थित. नजर लागावं असं सर्व काही.
ग्रेस हरवलेला. म्हणजे तो तेथे असतो आणि नसतोही. काळा चष्मा घातलेला ग्रेस तेथे व्यासपीठावर बसलेला दिसतो. अनोळखींना त्याची ओळख पटवून घ्यायला शेजारच्याच्या कानात कुजबुजावे लागते. ग्रेसची कविता—गूढरम्य कोडं. खूपसं काही बोललं जातं. स्वतःच्या डोळयादेखत स्वतःचं हृदय दुसऱ्याच्या तळहातावर पहायला मिळावं तसा काहीसा हा प्रसंग. निदान ग्रेसला तरी तसं वाटत असावं. किंचित् अभिमान, किंचित् अगतिकता, किंचित् अपरिहार्यता. ग्रेसचा काळा चष्मा परत परत खटकतो. वेदनेचा कढ लपविण्यासाठी केलेली ही फसवणूक ? कुठेतरी आठवत असतं मागं एकदा तो म्हणाला होता, डोळे दुखतात. प्रकाश सहन होत नाही.
राजपुत्र आणि डार्लिंग—ग्रेसचा दुसरा कवितासंग्रह. रामदास भटकळ अमेय प्रकाशनाची ओळख करून देतात. आणि वसंत बापट—जुन्या पिढीत जमा होऊ पहाणारे कवी ग्रेसचे कौतुक करायला उभे रहातात. प्राध्यापकी थाटात प्रथमच जाहीर करून टाकतात. कविता ह्या विशिष्ट साहित्य प्रकाराला ‘ बौद्धिक अर्थाने आकलन ’ हा निकष गैरलागू आहे. आजची कविता अन्वय आणि अर्थ ह्याच्या पुढे गेली आहे आणि ग्रेसची कविता या धाटणीची आहे. ती कळली नाही तरी खिळवून ठेवते. एखाद्या नवचित्रकलेच्या कॅन्व्हाससारखी. तिचे नाते जी. ए. कुलकर्ण्यांच्या गूढरम्य अनुभवांशी आहे. नवे संकेत निर्माण करण्याची ताकद तिच्यात आहे.
माधव मनोहर उठतात आणि बापटांचीच थिएरी आणखी एक पायरी वर नेतात. कविता ही अंतःकरणानेच जाणण्याची चीज आहे. कदाचित अनाकलनीयतेतच कवितेचे सौंदर्य साठविलेले असते. ‘ संध्याकाळच्या कवितातून निर्माण झालेली गूढ उदासीनता राजपुत्र आणि डार्लिंगमध्ये अधिक गडद होते. ग्रेसच्या कवितात दुःख वारंवार भेटते. ‘ करुणाष्टकाचो उदासी माझ्यात आहे. ’ कवीच कबुली देऊन जातो. ‘ शोकवंशाचा सिद्धपुरुष ’, ‘ व्यथालयात बसून दुःख सांगतोय ’ ‘ राजपुत्रा दुःखापासून काही मिळते का ?’ माधव मनोहर एकामागून एक दुःखाचे आधार शोधीत जातात. मात्र त्यांना त्या दुःखाची जातकुळी सापडत नाही. हे शारीर दुःख नाही याची खात्री पटते. मात्र त्या दुःखाचा उगम हाती लागत नाही. एक मात्र माधव मनोहर कबुल करतात, कवितेचे संस्कार दोन्ही होतात. एकीकडे कवीच्या मूडशी जुळणारी विषण्णतेची लय लागते आणि दुसरीकडे आनंद होतो खूप काही कळल्याचा.
दुर्गाबाई भागवत—समारंभाच्या अध्यक्षा. त्या बोलायला उठतात आणि ग्रेसच्या आजी शोभतील अशा या बाई सटासट दोन पिढयांचे अंतर ओलांडून ग्रेसच्या कवितेशी आपलं जिव्हाळयाचे नाते प्रस्थापित करतात. ग्रेसच्या कवितेचे साम्य त्यांना आढळतं, तुळजापूरच्या देवीच्या मागे नृसिंहांची उग्र प्रतिमेची मूर्ती आहे तिच्या डोळयांशी. वाटोळे डोळे. पैलू न पाडलेल्या रत्नांनी जडवलेली डोळयांची खोबण. खोल खोल तेज असलेली लाल, हिरवी, पांढरी रत्नं. त्या डोळयात त्यांना तीन भाव दिसले. पाशवी, मानवी, दैवी. ह्या तीनही भावांचे मिश्रण त्यांना ग्रेसच्या कवितेत जाणवलं. झपाटयाने दैवी तंत्राकडे खेचले जाणारे ग्रेस वैश्विक पातळीवर जाऊन पोचतात. पण अनेक पाश्चात्य व्यक्तिमत्त्वांनी झपाटलेले ग्रेस तितकेच स्थानिक मातीला खिळून आहेत याचीही साक्ष त्यांची कविता देते. व्हिवॅगो ते वेदांपर्यंत प्रत्येकाशी ग्रेसने आपले नाते जोडले आहे.
त्यांच्या संवेदनेमागे शब्दांचा आक्रोश आहे. शब्दांच्या प्रतिमांचा खच आहे आणि याच प्रतिमांमध्ये वाचकांच्या मनात त्याच्या अनुभवाच्या कुवतीनुसार हजारो नव्या प्रतिमांची वलये उमटविण्याचे सामर्थ्य आहे. हा दुर्गाबाईंचा विश्वास. म्हणूनच स्टीफन्स स्पेन्डर्स यांनी न्यूयॉर्क रिव्ह्यूमध्ये लिहिलय, ‘ कवितेचा रिव्ह्यू करू नये. ’ पण बाईंना ते पटत नाही. कलाकृती जेव्हा पूर्ण होते तेव्हा ती सर्वांची होते आणि प्रत्येकजण आपापल्या अनुभवांच्या निकषांवर ती समजावून घेत असतो.
सर्वांनीच ग्रेसच्या संपादकीय कर्तृत्वाचा आवर्जून उल्लेख केला. गेल्या दोन वर्षात ग्रेसने नावारूपाला आणलेले आणि वजनदार बनविलेले ‘ युगवाणी ’ द्वैमासिक रसिकांच्या नजरेतून सुटले असते तरच नवल. विशेषतः विदर्भ साहित्य संघाचे हे मुखपत्र असून त्यांनी त्याचे तांत्रिक, रुक्ष स्वरूप काढून त्याला ललित आणि सर्वसमावेशक बनविल्याबद्दल सगळयांनाच आदर वाटत होता.
अमेय प्रकाशनाचा तर चक्क हेवा वाटला अनेकांना. ग्रेसच्या मनःपूत पुस्तकाची सजावट करून पिंपळापुरे या चालकांनी चक्क त्यांचे लाड केलेत असं गोड कौतुक गुणगुणलं जात होतं. तर कित्येकांना साडेतेरा रुपये पुस्तकाची किंमत बघून आता हे पुस्तक धंदा कसं काय करणार याची चिंता पडली होती. आणि मग कॉफीपानानंतर सूरांची मैफल जमली. हृदयनाथ मंगेशकरांचा आवाज चांगलाच जमला होता. त्यांनी ज्ञानेश्वरांची विराणी सुरू केली.

अवचिता परिमळू । झुळकरा अळूमळू
मी म्हणे गोपाळू । आला गे माये ॥

आणि आकाशात चंद्राचा भगवा टिळा वरवर चढत होता. ‘ संध्याकाळचा ’ मुहूर्त धरून ग्रेसच्या संग्रहाच्या उद्घाटनाचा समारंभ पार पडला होता.
मन विचार करीत होतं. हा ग्रेस गृहस्थ फक्त तिशीला पोचलेला आणि आयुष्य दुःखाच्या काटयावर सलत ठेवणारा—याच्या वेदनेचा रुतून बसलेला शर काढता आला तर !

**—छाया दातार**





ग्रेसच्या राजपुत्र आणि डार्लिंग या कवितासंग्रहाचे प्रकाशन
माधव मनोहर । दुर्गाबाई भागवत । रामदास भटकळ

## दोन समारंभ

चरित्रकार धनंजय कीर यांच्या एकसष्टीनिमित्त कीर गौरव ग्रंथाचे प्रकाशन
मुंबई विद्यापीठाने एक खास विभाग उघडून महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहिण्याचे कार्य कीर यांच्या नेतृत्वाखाली करवून घ्यावे.–पु.ल.



# राजकीय धावाधाव !



आजपर्यंत कोल्हापूरी चपला प्रसिध्द होत्या आता नागपूरी चपला प्रसिध्द होऊन राहिल्या आहेत.




मतांचं पीक अमरावती सोळा आणे येईल, दगडांचा पाऊस खूप पडला.



राजकारणामुळे होणारी धावाधाव !
नेमका बंदच्या दिवशी मूहूर्त काढायला नको होता.
साखर आऽऽऽलीऽऽऽऽऽ
एक लिटर घाम गाळावा, तेव्हा अर्धा लिटर पदरांत पडते!
रॉकेल
कार्ड
परत गाई म्हशी संपावर!
श्यामजोशी-






# फेअरवेल टू ब्रेबॉर्न...






# वेलकम् टू ?

१९३८ पासून मुंबईतलं क्रिकेट आणि ब्रेबॉर्न ह्यांचे संबंध अतूट वाटावेत असे होते. भारताचं लॉर्डस् हे भारतीय क्रिकेटियर्सनी त्याला दिलेलं नामाभिधान! पण हे सारं आता संपुष्टात येत आहे. मुंबई विरुद्ध महाराष्ट्र रणजी सामना ३१ डिसेंबरला इथे अनिर्णीत स्वरूपात संपला. दोन्ही संघ रणजी सामन्यांच्या बाद स्पर्धेत या सामन्यातून प्रवेश करते झाले. हाच इथला शेवटचा सामना !



मुंबई क्रिकेट ॲसोसिएशनच्या लॉईडस रेक्लेमेशनवरील नवीन मैदानावर...इथे ५०,००० प्रेक्षकांची बसण्याची सोय आहे.



**चंदगडकर**
**सेक्रेटरी**
**मुंबई क्रिकेट असोसिएशन**
**We have reached the point of no return**




**माधव आपटे**
सदस्य सी. सी. आय.
ब्रेबॉर्न आणि मुंबई क्रिकेट ह्यांची
ताटातूट, अवघ्या फर्लांगाच्या परिसरात
दुसरं मैदान...मनाला पटत नाही...

**माधव मंत्री**
निःपक्ष निवृत्त क्रीडापटू
थोडी लवचिकता दाखवली गेली
असती तर हा संघर्ष टळू शकला असता

**पॉली उम्रीगर**
लॉईडस वरील खेळपट्टी तयार
करण्यात सिंव्हाचा वाटा.
मैदानापेक्षा खेळ आणि खेळाडू
महत्त्वाचे आहेत.







# सी. सी. आय. × बी. सी. ए.

## असा रंगला खेळ

सु. ल. सोमण

३१ डिसेंबर, १९७३ ! प. विभाग रणजी करंडक साखळी सामन्यापैकी महाराष्ट्र विरुद्ध मुंबई हा अखेरचा सामना मुंबईच्या जगप्रसिद्ध ब्रेबॉर्न स्टेडियमवर खेळवला जात होता. कर्मधर्मसंयोगाने साखळीतला हा अखेरचा सामना; ह्या मैदानावरीलही प्रथम दर्जाचा अखेरचा सामना ठरू पहात आहे; आणि आजमितीला काही अद्भुत चमत्कारच घडून आला तर हा संभव खोटा ठरेल. तशी शक्यता मात्र शून्य आहे ! त्या दिवशी सुमारे दहा हजार प्रेक्षकांसमोर, अनेक गाजलेल्या क्रीकेटपटूंच्या समोर, शेवटचा बॉल टोलवला गेला. शेवटच्या वेळेला यष्टी काढण्यात आली. आता किमान काही वर्षे तरी ब्रेबॉर्नवर मोठाले सामने होणार नाहीत. अटीतटीच्या लढती लढल्या जाणार नाहीत. सामन्यांच्या तिकिटांसाठी प्रचंड रांगा लागणार नाहीत. चाळीस हजारांचे लोंढे तिथे लोटणार नाहीत. १९३८ पासून क्रिकेटची काशी बनलेले ब्रेबॉर्न–मंदिर आता दुसरीकडे हलणार आहे. मंदिर, त्यातला देव जिथे असेल तिथे जाते. त्या देवाशिवाय, ब्रेबॉर्नची नुसती वास्तू सुनी सुनी वाटणार आहे ! क्लब हाऊसवर काही सभासद जमतील, त्यात श्री. विजय मर्चंटसारखे काही मान्यवर क्रिकेटपटूही असतील. पण ह्या पुजाऱ्यांनाही देवाशिवाय चैन पडेलसे वाटत नाही !

ब्रेबॉर्नवर क्रिकेट क्लब ऑफ इंडिया ही संस्था अजूनही उभी राहीलच. पण इथून पुढचे क्रिकेटचे महत्त्वपूर्ण सामने मात्र तिथे खेळवले जाणार नाहीत. हे सामने खेळले जातील मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या, झपाट्याने उभारल्या जात असलेल्या नव्या भव्य मैदानावर ! ह्या संस्थेशी संलग्न असलेल्या मुंबईतल्या २८० क्रिकेट क्लबचे खेळाडू ह्या नव्या वास्तूतच आता वावरणार आहेत !! ह्यातले अनेक खेळाडू ब्रेबॉर्नवरच पुढे आले, नावारुपास चढले, आज खेळात चमकताहेत. विजय मर्चंट, उम्रीगर, माधव मंत्री, माधव आपटे, रंगा सोहोनी, दत्तू फडकर वगैरे अनेक जुन्यांनी ब्रेबॉर्नची खेळपट्टी स्मरणीय करून ठेवली आहे ! पण ह्या साऱ्यातले काही मोजके सोडले तर आणि आज आघाडीवर असलेले खेळाडू–सर्वांनाच ब्रेबॉर्नबद्दल भावनिक जवळीक वाटत असली तरी, लॉईड्स रेक्लेमेशनच्या नव्या होऊ घातलेल्या खेळपट्टीची अपरिहार्यताही त्यांना जाणवत आहे. त्यातूनच ते, ब्रेबॉर्नच्या अगदी जवळच असलेल्या सुमारे दोन कोटी रुपयांच्या ह्या प्रकल्पाचे स्वागत करतात. त्याचे समर्थन करतात ! विजय मर्चंट, माधव आपटे किंवा तारापोर वगैरे काही थोड्या मंडळींचा ह्या नव्या प्रकल्पाला विरोध असला तरीही !!

मी स्वतः जे पाहिले, जी माहिती मिळविली त्यावरूनच, निदान मला तरी असे वाटते, की नव्या प्रकल्पाचे समर्थन वा त्याला विरोध, ह्या द्वंद्वाला आज वावच शिल्लक राहिलेला नाही. लॉईड्स् रेक्लेमेशनवरील मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या नियोजित वास्तूचे व खेळपट्टीचे काम आज इतक्या झपाट्याने चालू आहे आणि इतक्या पुढच्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचले आहे की तिथे ते अर्धवट सोडून माघार घेणे म्हणजे शुद्ध शब्दात मूर्खपणाच ठरेल ! तशी माघार आज यत्किंचितही संभवत नाही हेही माझे ठाम मत झाले आहे आणि दुर्दैव हे की अशा अवस्थेत खा. विठ्ठलराव गाडगीळ आदी सहा खासदारांनी ह्या प्रकरणात पंतप्रधानांनी हस्तक्षेप करून हे नव्या प्रकल्पाचे काम थांबवावे अशी भूमिका घेतली आहे !

वास्तविक क्रिकेट क्लब ऑफ इंडिया (सी. सी. आय.) आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन (बी. सी. ए.) ह्यांच्यातला वाद तसा फार जुना आहे. बेबॉर्न हे सी. सी.आय. चे मैदान. पण सी. सी. आय. हा इतर अनेक क्लब्सप्रमाणे बी. सी. ए.शी संलग्न. ह्या मैदानावर जे सामने खेळवायचे त्याचे सूत्रचालन, मुंबई क्रिकेटची प्रातिनिधिक संस्था म्हणून बी. बी. ए.कडे. ह्या पार्श्वभूमीवर ब्रेबॉर्नवर होणाऱ्या सामन्यांच्या (विशेषतः कसोटी सामन्यांच्या !) उत्पन्नातला मोठा वाटा, संयोजक व प्रातिनिधिक संस्था म्हणून बी. सी. ए.ला व्हायला हवा. तसा तो होतो अशी अनेक प्रेक्षकांची कल्पनाही असते. पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे. एका कसोटी सामन्यामागे एकूण उत्पन्न सुमारे वीस लक्ष रुपये होते. ह्यापैकी जेमतेम दोन ते तीन लाख रुपयेच फक्त बी. सी. ए. ला मिळतात ! तर सी. सी. आय. ला अंदाजे आठ ते दहा लाख रुपये किमान मिळतात. हिंदू जिमखाना, पारसी, इस्लाम, कॅथॉलिक आदी पंचरंगी सामन्यांच्या वेळचे प्रमुख जिमखाने ह्यांच्यामध्ये बाकीचे उत्पन्न विभागले जाते. हे पाचही जिमखाने बी. सी. ए.शी संलग्न असूनही, सी. सी. आय. त्यांच्याशी स्वतंत्र करार करते, १९३८ पासून चालत आलेला उत्पन्नातला वाटा त्यांना ह्या करारान्वये मिळत राहतो. उलट, बी. सी. ए. ला मिळणारा फायदा त्यांच्या दरवर्षी वाढत असणाऱ्या सभासद क्लब्समध्ये विभागला जात असल्याने तो अगदीच तुटपुंजा ठरतो ! चिपॉक (मद्रास) इथेही काहीसा असलाच प्रकार होता. मद्रास क्रिकेट असोसिएशनने गेल्या एम. सी. सी. (इंग्लंड) विरुद्धचा सामना, स्वतः नव्याने बांधलेल्या चिपॉकवरील खेळपट्टीवर खेळवला. परिणाम ? ह्यापूर्वीच्या सामन्यातून मद्रास क्रिकेट असोसिएनला कसोटीवर मुंबईप्रमाणेच अडीच तीन लाखाचा फायदा होत असे. ह्यावेळी स्वतःच्या स्टेडियमवर झालेल्या पहिल्याच सामन्यातून उत्पन्न मिळाले २७ लाख रुपये

आणि निव्वळ फायदा झाला १८ लाख रुपये !

म्हैसूर क्रिकेट अॅसोसिएशनचाही हाच अनुभव आहे, व तोही गेल्याच मोसमांतला. तीन दिवसांच्या एम्. सी. सी. विरूद्ध द. विभाग सामन्यात मैं. क्रि. अॅ. ला. निव्वळ नफा पाच लाख रुपये एवढा झाला ! तिथलाही स्वतःच्या खेळपट्टीवरचाच तो पहिला सामना होता. दिल्ली (फिरोजशहा कोटला मैदान), कलकत्ता (ईडन गार्डन्स वगैरे ठिकाणी तिथल्या प्रातिनिधीक संस्था अशा सामन्यातून (५ दिवसांचे कसोटी) बारा ते पंधरा लाख रुपयांपर्यंत निव्वळ नफा मिळवतात. बी. सी. ए. ही मुंबईतली सर्वात जुनी असूनही ह्या बाबतीत मात्र मागासलेली आहे. बी. सी. ए. चे पदाधिकारी, संलग्न क्लब्स व क्रिकेटपटू ह्यांचे नेमके शल्य हेच आहे. ह्यामुळेच, बी. सी. ए.–सी. सी. आय ह्यांच्यात चालू वादात समझौता झाला असता तरी तो तात्पुरताच ठरला असता !

सी. सी. आय हा खाजगी मालकीचा, श्रीमंत घराण्यांचे सभासदत्वच असलेला एक क्लब आहे. ब्रेबर्नची खेळपट्टी व स्टेडिअम ह्यांवर सी. सी. आय ची मालकी आहे. इथे सामने खेळविण्यासाठी बी. सी. ए. बरोबर सी. सी. आय. चे करार होत. सी. सी. आय संस्था, त्यांचे क्लबहाऊस व स्टेडिअम ह्यांच्यासाठी बराच मोठा नोकरवर्ग तिथे आहे. त्यांचे पगार लठ्ठ आहेत. इतर ओव्हरहेड्स् चिक्कार आहेत. त्यामुळेच, क्लबहाऊसला जोडून केटरींग हाऊस असले तरी, स्टेडिअम अलग केला तर, सी. सी. आय ला तोटा होतो. ह्याचाच अर्थ, क्लबहाऊस व अन्य ठिकाणी येत असणारी तूट सी. सी. आय क्रिकेट सामन्यातून होणाऱ्या प्रचंड फायद्यातून भरून काढते व आपला डोलारा उभा ठेवते. ब्रेबर्नवर चाळीस हजार प्रेक्षकांची सोय आहे. ह्या चाळीस हजार तिकिटांची सी. सी. आय, बी. सी. ए. पंचरंगी सामन्यांच्या वेळचे हिंदू, इस्लाम आदी पाच जिमखाने ह्या सात गटात त्या काळातल्या (१९३८) ह्या संस्थांच्या सभासदत्त्वानुसार विभागणी झाली आहे. ह्यामध्ये सिंहाचा वाटा अर्थातच सी. सी. आय. कडे जातो. व त्यातच संपूर्ण अर्थशास्त्र बसवले आहे. बी. सी. ए. चे सभासदत्त्व (बी. सी. ए. ला व्यक्तीगत सभासदत्त्वाची प्रथा नाही. क्रिकेट खेळवणारे बृहन् मुंबईतले सुमारे २८० क्लब्स हे बी. सी. ए. चे सभासद आहेत. व ह्या प्रत्येक क्लबचे किमान ५०–६० मेंबर्स असतात !) दरवर्षी वाढत गेलं तर बाकी पाच जिमखान्यांचे कमी होत गेलं. तरी देखील ह्या पाची जिमखान्यांना पूर्वीचाच तिकिटांचा साठा मिळत गेला. हे पाची जिमखाने बी. सी. ए. ला संलग्न असूनही ब्रेबर्नवरील ह्या व्यवस्थेसंबंधात सी. सी. आय चे त्यांच्याशी स्वतंत्र कदार-मदार होत हेही इथे लक्षात घेतले पाहिजे ! ब्रेबर्नवरचे सामने भरवायची जबाबदारी बी. सी. ए. वर. बी. सी. ए. चे सभासद वाढते. तरीही तिथल्या त्यांनीच आयोजित केलेल्या तिकिटांच्या वाटपाची व्यवस्था मात्र सी. सी. आय कडे ! ही तिकीटे बी. सी. ए. ला जास्त मिळावीत ही बी. सी. ए. ची मागणी. तर त्यामुळे सी. सी. आय ची आर्थिक घडीच बिनसेल हा सी. सी. आय चा दावा !

१९३८ मध्ये बी. सी. ए. ला ६००० तिकिटे एवढा कोटा मिळाला होता. थेट १९६२ पर्यंत तो तसाच होता. १९६२ मध्ये त्यावेळचे बी. सी. ए. चे प्रमुख श्री. व्ही. जे. दिवेचा ह्यांनी हा कोटा वाढवून मागितला. सी. सी. आय प्रमुख त्यावेळी श्री. जसदनवाला हे होते. त्यावेळीच खरे तर बी. सी. ए. वेगळी चूल उभी राहायची. शिवाजीपार्क मैदानावर सामने खेळवायची संपूर्ण तयारीही श्री. दिवेचा ह्यांनी सुरू केली होती. शेवटी ऐनवेळी समझौता झाला, कोटा वाढवून मिळाला आणि त्यावेळचे ते वादळ शमले ! पण पुढे प्रत्येक कसोटी सामन्यांपूर्वी अशा वादळाला तोंड फुटत गेले. त्यातून बी. सी. ए. चा कोटा, ६००० वरून गेल्या एम. सी. सी. विरुद्धच्या सामन्याच्या वेळी ११८०० वर गेला. ह्यापुढे कोटा वाढवून देणे आर्थिक दृष्टचा शक्य नाही, असा सूर सी. सी. आय ने लावला होता. तर नव्या बदलत्या काळात दोन-तीन लाख (एका कसोटीवर जेवढे उत्पन्न मिळते त्यावरचे पुढच्या कसोटीपर्यंतचे खर्च रेटून न्यावे लागतात !) रुपयांवर मुंबईचे क्रिकेट रेटणे शक्य नाही हा बी. सी. ए. चा दावा आहे. ह्या उलट क्लबहाऊस, स्टेडिअम ह्यावर होणारा खर्च आणि कसोटीतून मिळणारे उत्पन्न ह्यावर आधारलेले गणित, सी. सी. आय. चा कोटा थोडा जरी कमी झाला तरी पार बिघडून जाईल हा सी. सी. आय चा दावा आहे.

खेळातून मिळालेला पैसा पुन्हा खेळाच्च्या विकासासाठीच राबवला गेला पाहिजे असे म्हटले जाते. सी. सी. आय,च्या बाबतीत नेमके हेच घडत नाही, हा बी. सी. ए. च्या मंडळींचा दावा आहे आणि काही अंशी तो खरा आहे. कांगा लीगमध्ये सी. सी. आय.चा संघ उतरतो ह्याखेरीज, कसोटचांवर दहा बारा लाखांचा फायदा मिळविणारी ही संस्था क्रिकेटसाठी इतर काही करताना दिसत नाही. 'त्यांना होणारा संपूर्ण फायदा इतरत्रचे तोटे भरून काढण्यातच होतो–विशेषतः क्लब हाऊसवरील तोटा आणि मॅनेजर आदींचे लठ्ठ पगार !' हा बी. सी. ए. चा प्रच्छन्न आरोप आहे आणि त्याला फारसे उत्तर सी. सी. आय. जवळ नाही. ह्या उलट कसोटचांशिवाय, दरवर्षीचे रणजी सामने, दुलीप सामने व कांगा लीग वगैरेंसारख्या चाळीस क्रिकेट स्पर्धा भरविणे, शालेय–महाविद्यालयीन स्पर्धा घेणे, क्रिकेट कोचिंग कॅम्प्स् भरविणे, जुन्या क्रिकेटपटूंसाठी मदत निधी उभारणे वगैरे अनेक उपक्रम बी. सी. ए. चे चालू असतात. 'काही न करता, क्लब हाऊस हा उत्पन्नाचा वेगळा मार्ग असूनही दहा बारा लाखांचे उत्पन्न सी सी. आय. ला व सर्व उपक्रम राबवून, इतर काही उत्पन्नाचे साधन नसताना केवळ २।३ लाख बी. सी. ए. ला हा कुठला न्याय आहे ;' इति श्री. चंदगडकर.

कसोटी सामन्यातल्या उत्पन्नावरच बी. सी. ए. व त्याच्याशी संलग्न २८० क्लब्सचे भवितव्य अवलंबून असते हे इथे लक्षात घेतले पाहिजे. ह्या क्लब्सकडून बी. सी. ए. वार्षिक वर्गणी घेते ती फक्त २५ रुपये. हे क्लब्स स्वतःच्या सभासदांकडून वर्गणी घेते पाच-एक रुपयांच्या आसपास. सामने भरवायचे, क्लब चालवायचे, खेळपट्टचा जोपासायच्या, म्हणजे खर्च जातात ते लाखांच्या घरात. जी वर्गणी बी. सी. ए. किंवा संलग्न क्लब्स आकारतात त्यात ह्या खर्चाची तोंडमिळवणी शक्य नसते. त्यासाठी कसोटीची तिकिटे विकून त्यावर मिळणारा फायदा हाच एकमेव तोडगा ठरतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावरच पुढला काळ, त्या काळातले क्रिकेट तारून न्यायचे असते.

म्हणूनच, बी. सी. ए. ला अधिक तिकिटे उपलब्ध असल्याशिवाय, ह्या सतत वाढत जाणाऱ्या क्लब्सना तिकिटे मिळणार नाहीत. क्लब्सच्या क्रिकेटमधूनच मुंबईचे क्रिकेट जगते हे लक्षात घेतले तर बी. सी. ए. व ह्या क्लब्सच्या व एकूणच क्रिकेटच्या दृष्टीने ह्या प्रश्नाची व्याप्ती समजू शकेल.

आजच्या महागाईच्या काळात एका स्टेडियमशेजारीच दुसरा उभा करणे, त्यावर दोन कोटींचा खर्च करणे, त्यातून पहिला स्टेडियम आता ओस पडणे हा साराच दुर्दैवी प्रकार आहे. श्री. माधव मंत्री आदी निःपक्ष मंडळींना, 'दोन्ही बाजूंनी, विशेषतः सी. सी. आय. ने, थोडी लवचिक भूमिका स्वीकारली असती तर आजच्या काळात तरी नव्या स्टेडियमची उभारणी पुढे ढकलता आली असती' असे मनापासून वाटते! पण असे घडले मात्र नाही. १९६२ च्या दिवेचा–जसदनवाला वादानंतर, १९६६ मध्ये बी. सी. ए. ने स्वतःच्या स्टेडियमसाठी लॉईडस रेक्लेमेशनची जागा मिळविली. 'बी.एच.ए.' हॉकी मैदानाला लागूनच ही जागा आहे. १९६८ मध्ये फेन्सींग उभारले गेले तर ७१ मध्ये नव्या वास्तूचा कोनशिला समारंभ पार पडला. ह्या काळातही बी. सी. ए.–सी. सी. आय. वाद चालूच होते आणि बी. सी. ए.ला कोटा वाढवून न देण्याचेच धोरण सी. सी. आय. अवलंबित होती. अगदी अलीकडे, नोव्हेंबर / डिसेंबर ७३ मध्ये क्लब हाऊस सोडून संपूर्ण स्टेडियम बी. सी. ए. ला द्यायचे धोरण सी. सी. आय. ने घोषित केले आहे. पण आज सुमारे पाऊण कोटीचा खर्च नव्या वास्तूवर झाल्यावर ही सूचना निरर्थक आहे. हीच सूचना १९६२ ते १९७१ किंवा डिसेंबर ७२ पर्यंतही आली असती तर, आर्थिक तणावाच्या काळात ह्या स्टेडियमची योजना पुढे ढकलणे शक्य झाले असते. 'पण आज सुमारे ४००० क्रिकेटपटूंचा पैसा त्यात अडकला असताना, बी. सी. ए.ने माघार घेणे म्हणजे ह्या क्रिकेटपटूंचा विश्वासघात करण्यासारखे आहे...सी. सी. आय. ह्या श्रीमंतांच्या संस्थेपेक्षा क्रिकेटीयर जनांची ही संस्था अधिक जवळची आम्हाला वाटणार आहे...' इति एक ताज्या दमाचा क्रिकेटपटू!

ह्याही पेक्षा विशेष म्हणजे, क्रिकेटपटू बीसीए ह्या सामने भरविणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी वगैरे नाही सी. सी. आय तर्फे अत्यंत हीन वागणूक मिळत गेली असेही मला सांगितले गेले...

ह्या साऱ्यातून वेगळ्या चुलीची कल्पना क्रिडापटूत रेंगाळत होतीच. त्याचाच परिपाक ५० हजार प्रेक्षक सामावू शकतील अशा ह्या भव्य स्टेडिअमच्या उभारणीत होत आहे. तिथे क्रिडापटूंना अधिक मानाचे पान मिळेल, किंबहुना त्यांचीच ती वास्तू राहील' असे आश्वासन श्री. चंदगडकर ह्यांनी दिले आहे. 'तारापोर– चंदगडकर किंवा विजय मर्चंट– वानखेडे असा हा वादच नाही. वादाचे स्वरूप हे शुद्ध आर्थिक आहे. सी. सी. आय. च्या आर्थिक, काहीशा भांडवलशाही मगरमिठीतून क्रिकेट वाचायचे असेल तर अशा नव्या क्रीडापटूंच्या संस्थेचे अस्तित्व वादातील आहे.' असेही त्यांनी आवर्जून सांगितले...

ह्या पार्श्वभूमीवर बी. सी. ए. स्वतःचे नवे घर थाटीत आहे. येत्या मार्च-एप्रिल पासून नव्या मैदानावर प्रथम दर्जाचे सामने खेळवले जाणार आहेत! १९३८ मध्ये बॉम्बे जिमखान्यावरून मुंबई क्रिकेटचे केंद्र ब्रेबॉर्नवर गेले. सी. के.च्या षटकारांनी बॉम्बे जिमखाना मैदानाचा इतिहास घडवला. टेनिसच्या नेतृत्वाखालील संघा बरोबरच्या पहिल्या सामन्याने १९३८ मध्ये ब्रेबॉर्नवरील मुंबई क्रिकेटच्या इतिहासातले पहिले पान उघडले. ३१ डिसेंबर ७३ ला त्याचे शेवटचे पान मिटले गेले. मध्यंतरीच्या काळात वॉरेल, ग्रॅव्हनी, नील हार्वे, कॉड्रे, सोबर्स, गिलख्रिस्ट ट्राईब, कन्हाय, बेनॉ, हनीफ वगैरेचा रोमहर्षक खेळ ह्या मैदानाने साक्षिला. १९४८ सालची, दत्ता फडकरने गाजवलेला, वेस्ट इंडिजच्या विरुद्धचा रोमहर्षक सामना इथेच खेळला गेला. ह्या सामन्यातला आपल्या संघाचा विजय अवघ्या सहा धावांनी हुकला. व तोही अंपायरनी चुकून एक षटक कमी खेळवले म्हणून! १९७०–७१ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध नोंदवलेला आपला पहिला विजय वास्तविक त्याचवेळी नोंदवला जायचा!!... प्रचंड धावसंख्या इथेच रचल्या गेल्या आणि जास्तीत जास्त सामने अनिर्णीत अवस्थेत संपले तेही इथेच!... ब्रेबॉर्नला भारताचे लॉर्डस समजले जाते. वाडेकर, गावस्कर वगैरे आजचे 'टॅलेंट' तिथे रुजले, फुलले... आज ह्या स्टेडिअम ओस पडणार आहे. निदान क्रिकेटच्या संदर्भात तूर्त तरी ब्रेबॉर्नला, ह्या साऱ्या जुन्या आठवणींना उजाळा देत देत बाय बायच म्हणावे लागणार आहे!...

इथे थोडी विषयाला कलाटणी मी देणार आहे. ब्रेबॉर्नवरचे क्रिकेट जरी आज संपुष्टात आले असले तरी, तिथल्या भव्य मैदानाचा उपयोग दुसऱ्या कामासाठी अवश्य करून घेता येईल. पुढल्या वर्षी होऊ घातलेल्या 'वर्ल्डकप' हॉकी सामन्यांचे वेळी किमान चार-पाच मैदानं तरी बॉम्बे हॉकी असोसिएशनला उपलब्ध करून द्यावी लागतील. ब्रेबॉर्नवर किमान दोन मैदाने सहज बसू शकतील. एरवीही हॉकी साठी मैदाने कमी पडतातच. त्या दृष्टीने ब्रेबॉर्नचा उपयोग करून घेता येईल. आजच्या घडीला ब्रेबॉर्न की लॉईड्स वरील बी. सी. ए. ह्या वादाला फारसा अर्थ नसून, दोन्ही मैदानांचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल ह्याचा विचार महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने अशा सूचनांचा विचार सी. सी. आय.ने केला पाहिजे, फारसा 'प्रेस्टीज इश्यू' न करता!!


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये


राजहंस प्रकाशन

तीन टिपणे....

- ☐ युद्ध आणि शांती
- ☐ टॉलस्टॉय आणि गांधी
- ☐ अखेर....

लेखिका

सौ. सुमती देवस्थळे



# १ : युद्ध आणि शांती

वयाच्या पस्तीसाव्या वर्षी टॉलस्टॉयने प्रेमविवाह केला. त्याची पत्नी सोफाया अँड्रीव्हँना–सोन्या–त्याला सर्वच दृष्टींनी अनुरूप होती. अशी असीम आनंदाची धुंदी निर्माण करणारी पत्नी लाभेल हे त्याला पूर्वी स्वप्नातही खरे वाटले नसते. पण सत्य हे स्वप्नाहूनही सुंदर ठरले होते. सांसारिक सुखाच्या बरसातीत चिंब भिजत असताना त्याच्या मनातला लोकोत्तर कलावंत जागा झाला. उत्कट मनोवृत्ती फुलारून आल्या प्रतिभेला नवनिर्मितीचे वेध लागले. त्याचे फलित म्हणजे 'युद्ध आणि शांती' ही अप्रतीम कादंबरी लिहिली गेली. प्रत्यक्ष लिखाणास सहा वर्षे लागली. त्याच्या सर्व मानसिक शक्ती निर्मितीत केंद्रीत झाल्या होत्या.

कादंबरीच्या पसाऱ्यात त्याचे मन गुंतले असले, तरी शाश्वत आनंदाचा वेध घेण्याची आर्तता संपली होती असे मात्र नाही. टॉलस्टॉयच्या अंतरंगाला अतृप्तीचा चिरंतन शाप होता. 'युद्ध आणि शांती'चे लेखन सुरू असताना शाश्वत आनंदासाठी होत असलेली आध्यात्मिक ओढ मान खाली घालून शांत पडून होती इतकेच फार तर म्हणता येईल.

मोहोरीएवढ्या बीजातून प्रचंड अश्वत्थवृक्ष निर्माण व्हावा तशी 'राष्ट्रीय महाकाव्य' National Epie' ठरलेली कादंबरी वाढत वाढत गेली. मूळचा आराखडा तीन वेळा बदलला. नावही तीन वेळा बदलले. काही व्यक्तिरेखांना आधीच्या संहितेत स्थान नव्हते–त्यांना मागून प्रवेश मिळाला. सुरुवातीला जे चित्रित करण्याचा हेतू होता, त्यापेक्षा अगदी वेगळी, उदात्त, अभूतपूर्व अशी कलाकृती हळूहळू आकारत गेली. नेहमीची संदेहात्मक मनोवृत्ती आता बदलली आणि टॉलस्टॉयला जबरदस्त आत्मप्रत्यय आला, आत्मविश्वास वाटू लागला. त्याने आपल्या आजीला लिहिले, 'माझ्या मानसिक शक्ती इतक्या विमुक्त व कार्यक्षम झाल्याचे मला आजवर कधीही जाणवलेले नव्हते. आता मी एक प्रचंड प्रकल्प हाती घेतला आहे. तो म्हणजे १८१० ते १८२० या कालखंडाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली कादंबरी आता मी अगदी मनःपूर्वक, जीव ओतून लिहिणार आहे. आता मी जसे लिहितो किंवा लिहिणार आहे, तसे पूर्वी कधीही लिहिले नव्हते.'

या कादंबरीचे सुरुवातीचे नाव होत 'डिसेंबरिस्ट.' टॉलस्टॉयचा नायक १८२५ च्या डिसेंबरिस्ट क्रांतीकारकातील एक होता, आणि सैबेरियात ३० वर्षांची हद्दपारी सोसून १८५६ मध्ये मायदेशी परतलेला असा दाखवायचा होता. अशा समकालीन डिसेंबरिस्टाला केंद्रस्थानी कल्पून टॉलस्टॉयने तीन प्रकरणे लिहूनही काढली होती. तीच जुनी कादंबरी आता पूर्ण करून टाकावी हा त्याचा बेत होता. त्यासाठी १८२५ च्या सुमाराचे सामाजिक व राजकीय विचारप्रवाह अगदी काटेकोरपणे आत्मसात करायला हवे होते. डॉ. बर्स (सासरे) व लिझा (मेहुणी) यांनी संदर्भग्रंथांच्या याद्या पाठवून दिल्या. उपयुक्त पुस्तकेही पाठविली. अभ्यासाची खोली व विस्तार जसजसा वाढत गेला तसतसा अपरंपार तपशील हाती येत गेला. त्या कालखंडाचा जिवंत चित्रपट डोळ्यासमोर थरथरत राहिला.

टॉलस्टॉयच्या व्यक्तिचित्रणात विलक्षण प्रत्ययकारिता असे. त्यासाठी व्यक्तीचे अगदी बालपणापासूनचे संस्कार लक्षात घेऊन त्याचे कलात्मक चित्रण करायचे अशी टॉलस्टॉयची पद्धत. म्हणून १८२५ च्या डिसेंबरिस्ट क्रांतिकारकांच्या बालपणाचा वेध घेत घेत तो २० वर्षे मागे गेला. तेथपर्यंतच्या प्रवासात १८१२ मधील नेपोलियनच्या स्वारीचा चित्तथरारक प्रसंग आणि त्या युद्धात रशियाचा 'नैतिक' विजय या घटना आल्या. त्या भव्योदत्त ऐतिहासिक घटनेने टॉलस्टॉय अक्षरशः झपाटल्यासारखा झाला, आणि मग मूळचा डिसेंबरिस्ट कुठल्याकुठे गळफटून नेपोलियनची स्वारी अधिक प्रेरक ठरली. ऐतिहासिक सत्य अलिप्तपणाने, वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातूनच समजावून घेण्याची इच्छा झाली. त्या अभ्यासातून इतिहासाकडे पहाण्याचा, सामाजिक संदर्भात निरनिराळ्या घटनांचा अर्थ लावून दाखविण्याचा दृष्टीकोन लाभला. ऐतिहासिक घटनांच्या, व्यक्तींच्या पलीकडे जाऊन इतिहासविषयक तत्त्वज्ञान मांडून दाखविणे, इतिहासाचा सामाजिक अर्थ लावून दाखविणे ही गोष्ट टॉलस्टॉयला महत्त्वाची वाटली. तो जसजसा लिहित गेला, तसतसे इतिहासविषयक तत्त्वज्ञान स्पष्ट होत गेले.

टॉलस्टॉय मूळचा आरंभशूर, लहरी! तेव्हा अभ्यासाचे डोंगर पालथे घालीत असला, तरी हा लिहीलच अशी सोन्याला खात्री नव्हती. पण यावेळी तिची भीती फोल ठरली. टॉलस्टॉयला सूर सापडला होता, नव्हे तो चांगला ६ वर्षे टिकला होता. इतकी दीर्घकालीन तपस्या करण्याचे श्रेय जेवढे त्याचे, तेवढेच सोन्याचेही होते. ती त्याच्या प्रतिभेची 'शुश्रूषा' करीत असे. त्याच्या एकाग्रतेत कोणताही व्यत्यय येणार नाही अशी खबरदारी घेई. टॉलस्टॉय अभ्यास करीत असताना यत्किंचितही शांतताभंग होऊ नये म्हणून कमालीची दक्षता बाळगली जाई. त्याच्या खोलीच्या बाहेर कुत्रे किंवा कोंबड्यांचा आवाज होऊ देऊ नये अशी नोकरांना सक्त ताकीद होती.

टॉलस्टॉयच्या कल्पना चक्षूंसमोर भव्य वाङमयीन कैलासलेणे आकारत होते. ती भव्यता कोणत्याही विशिष्ट वाङमयप्रकारात साचेबंद होण्याजोगी नव्हती. टीकाकार आपल्या लिखाणावर एखाद्या साहित्यप्रकाराचे शिक्कामोर्तब करतील, आणि त्या निकषापासून आपण कसे दूर गेलो आहोत असे दाखविण्याचा खटाटोप करतील याची टॉलस्टॉयला जाणीव होती. तसा वावदूकपणा कोणीही करू नये म्हणून त्याने लिहिले, 'मी जे लिहीत आहे, ते कथा, कादंबरी, काव्य, इतिहास यापैकी कोणत्याही कक्षेत मोडणार नाही. प्रत्येक कलावंत आपल्या मनातील आशयाशी सुसंगत असा आकृतीबंध निर्माण करीत असतो आणि तो आकृतीबंध संपूर्णतया स्वयंभू असू शकतो.'

१८६३ च्या अखेरीस कादंबरी लेखनास सुरुवात झाली. 'न भूतो न भविष्यति' अशा या वाङमयशिल्पात अक्षरशः अगणित व्यक्तिरेखा, अनेक लहानमोठ्या घटनांचा विस्तार, नेपोलियनची रशियावरील स्वारी, युद्धातील चित्तथरारक प्रसंग, तत्कालीन रशियन लोकांचे कौटुंबिक जीवन, सामान्य जनतेचे जीवन, लष्करी कारवाया, शिकार, नृत्य, पार्टीज, इ. अनेकांची वर्णने आहेत. ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या घटना या कादंबरीत येतात. पण टॉलस्टॉय हा

काही इतिहास लिहीत नव्हता. ललित माध्यमातून सारे लिहायचे होते. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर मानवी स्वभावदर्शन हाच त्या कादंबरीचा खरा विषय आहे. प्रत्येकाला स्वतंत्र-वेगळे असे व्यक्तिमत्त्व आहे–अगदी कुत्र्याला सुद्धा ! व्यक्तिचित्रणातले यश लक्षात घेतले तरीही या कादंबरीने फार मोठे उद्दिष्ट साध्य केल्याची कबूली सर्व जाणकारांनी खुल्या दिलाने दिली आहे–अगदी टर्जिनिव्हनेसुद्धा ! व्यक्तिदर्शनाच्या बाबतीत टॉलस्टॉय हा जगातला सर्व श्रेष्ठ कलावंत ठरतो याबद्दल दुमत नाही.

'युद्ध आणि शांती' ऐतिहासिक घटना असल्या तरी राष्ट्रीय नेते हे काही त्या कादंबरीचे नायक नव्हत. नेपोलियन, झार-अॅलेक्झॅण्डर, कुटुझोव्ह यावर झगझगीत प्रकाशझोत टाकलेला नाही. रोस्टोव्ह, बोल्कॉन्स्की, कुरेजिन व बुझुकोव्ह या चार कुटुंबावरच लक्ष केंद्रित केले आहे. या कुटुंबातील व्यक्तींच्या निरनिराळ्या क्रिया-प्रतिक्रियातून कथानकाचा नितळ गोफ विणला जातो. तो पाहून मराठी वाचकांना हरिनारायणांची आठवण व्हावी.

व्यक्तिचित्रणासाठी टॉलस्टॉयने परिचित माणसामधूनच निवड केली. डोस्टोयव्हस्की संपूर्ण व्यक्ती 'invent' करीत असे–टॉलस्टॉय परिचित व्यक्तीवर आपल्या कल्पनाशक्तीचे अप्रतीम संस्करण करून 'intensify' करीत असे. परिणामत: त्या रासायनिक प्रक्रियेतून संपूर्णतया नवीच व्यक्तिरेखा निर्माण होई. प्रत्येक व्यक्तिच्या वैशिष्टयांचा बारीकसारीक तपशीलसुद्धा टिपलेला असे. टॉलस्टॉयने या कादंबरीची नायिका नटाशा रोस्टोव्ह आपल्या मेहुणीवरून (तान्या बर्स) घेतली. पण नटाशा रोस्टोव्ह म्हणजे तान्या बर्स नव्हे. त्या बाबतीत तो म्हणे, 'मी थोडीशी तान्या घेतली, त्यात थोडीशी सोन्या (पत्नी) मिसळली अन दोघींनी एकत्र घोटून तयार केली–ती म्हणजे नटाशा रोस्टोव्ह. आपले वडील, आजोबा, आई इतर नातेवाईक यांच्या स्वभाववैशिष्टयांचासुद्धा त्याने व्यक्तिचित्रणासाठी 'कच्चा माल' म्हणून वापर केला. एवढेच काय, पण प्रिन्स अॅण्ड्र्यू आणि पिअरी हे दोघे नायक रंगविताना त्याने आपल्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या दोन बाजूंचे व्यक्तिकरण केले. तसे करीत असताना त्याला स्वत:च्या गुंतागुंतीच्या संदेहात्म, दुभंगलेल्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव होती की काय न कळे ! पिअरी व प्रिन्स अॅण्ड्र्यू हे लेखकाच्या दोन मनांची प्रतिबिंबे आहेत; दोघांचीही तात्त्विक भूमिका एक असली तरी तपशिलात खूप फरक आहे. नटाशाच्या व्यक्तिचित्रणात टॉलस्टॉयने लेखन कौशल्याची परिसीमा गाठलेली आहे. ती अतिशय वेधक, संवेदनाशील, हळवी, लहरी, पोरकट, अवखळ, उत्कट अशी मुलगी आहे. कादंबरीच्या सुरुवातीला ती कुमारवयातली १३-१४ वर्षाची अल्लड किशोरी आहे. कादंबरी संपते तेव्हा ती प्रौढ माता बनलेली आहे. कुमारवयापासून मातृत्वापर्यंतच्या जीवन प्रवाहात तिचे व्यक्तिमत्त्व कसे वाढत गेले, फुलत गेले, संस्कारित होत गेले हे पाहणे म्हणजे मनोज्ञ अनुभव आहे. अत्यंत हळूवार हातांनी टॉलस्टॉयने नटाशाच्या व्यक्तिरेखेत रंग भरले आहेत. नटाशा इतकी रोमारोमात जिवंत आणि पाऱ्यासारखी तरल व्यक्तिरेखा खुद्द त्याला सुद्धा पुनश्च रंगविता आली नाही–तो घाट फक्त एकदाच जुळला, अन मग कायमचा मोडून गेला.

'युद्ध आणि शांती'च्या तयारीसाठी त्याने जो आटोकाट मेहनत केलेली आहे, जे अभ्यासाचे डोंगर पेलले आहेत, ते पाहून मनुष्य आवाक् होतो. अगणित संदर्भग्रंथांचा त्याने एकसारखा, अगदी कसून अभ्यास चालविला होता. अधिकृत इतिहास, रशियन इतिहासकारांनी लिहिलेला, तसेच फ्रेंच इतिहासकारांनी लिहिलेला–हे सर्व त्याने नीट पाहिले. एकाच घटनेतून विरुद्ध पक्षाचे लोक कसा निष्कर्ष काढतात, दृष्टिकोनात फरक पडला की आशयावर कसा परिणाम होतो, याचे शास्त्रच त्याने अनुभविले. युद्धाचा एकूणएक तपशील गोळा केला. नेपोलियनच्या बाजूने लिहिलेले लिखाण, स्मृतिग्रंथ, पत्रे, दैनंदिन्या, तत्कालीन वर्तमानपत्रे, समकालिनांची चरित्रे, राजकीय कादंबऱ्या, देशभक्तीने प्रेरित झालेले लिखाण, नेपोलियनविषयी प्रसिद्ध झालेले अपरंपार लिखाण, युद्धाचे तपशीलवार अहवाल हे सारे काही त्याने अक्षरश: घुसळून काढले. कादंबरी लिखाणाच्या काळात (१८६३ ते ६९) तो मनाने नेपोलियनच्या काळातच जगत होता असे म्हटल्यास मुळीच अतिशयोक्ती होणार नाही.

केवळ पुस्तकी संदर्भ वाचून त्याचे समाधान होणे शक्य नव्हते. आणखीही मिळेल त्या ठिकाणाहून माहिती–इतरांची–अनुभूती जमा करायला हवी होती. नेपोलियनच्या स्वारीला ५०–५१ इतकीच वर्षे झालेली होती. तेव्हा त्या स्वारीचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले कित्येक लोक हयात होते. खुद्द त्याच्या दोघी आत्या, घरातली एक वृद्ध नोकराणी, यांनी युद्धामुळे झालेली सामाजिक स्पंदने अनुभविली होती. वडील निकोलस यांनी बाळपणी काही खास आठवणी सांगून ठेवलेल्या होत्या, आपण गाजविलेला पराक्रम वर्णिला होता. युद्धाचा सर्वसामान्य व्यक्तीवर होणारा परिणाम वर्णन करण्याच्या दृष्टीने असले अनौपचारिक संदर्भ फारच उपयुक्त होते. युद्धाच्या वर्णनात संपूर्ण प्रत्ययकारिता आणण्यासाठी टॉलस्टॉयने बोरोडिनो येथील रणभूमीस प्रत्यक्ष भेट दिली. अवतीभोवती रहाणाऱ्या वयस्क लोकांच्या अनौपचारिक मुलाखती घेतल्या. एकंदर युद्धाचा रशियातील सामान्य जनतेवर नेमका काय परिणाम झाला ते समजावून घेतले. ते युद्ध प्रत्यक्ष पाहिलेला एक माणूस वेडयाच्या इस्पितळात होता. त्याचे वेड काही विशिष्ट बाबतीपुरतेच मर्यादित होते, बाकी तसा तो शहाणा (normal) होता. हे कळल्यावर वेडयाच्या इस्पितळात जाऊन त्या वेडयाचे युद्धविषयक अनुभव जाणून घेण्यासही टॉलस्टॉयने कमी केले नाही. मिळेल तेथून मिळेल तेवढा तपशील तो 'क्षणश: कणशश्चैव' जमवीत होता. या बाबतीत डॉ. बर्स (सासरे) व लिझा (मोठी मेहुणी) यांनी सक्रीय मदत केली; बरीच पुस्तके व माहिती पुरवली. त्याच्या भोवती तपशिलाचा अक्षरश: समुद्र पसरला होता. त्याचे मंथन करून मानवी जीवनविषयक तत्त्वज्ञान, काही निष्कर्ष मांडणे हे काम सोपे नव्हते. म्हणूनच आपला कविमित्र फेट याला टॉलस्टॉयने कळविले, 'साहित्यनिर्मिती म्हणजे एकप्रकारची प्रसूतीच असते. पुरे पोसल्याशिवाय मूल बाहेर येत नाही आणि प्रत्यक्ष जन्मकाळी अतोनात यातना–वेदना दिल्याशिवाय रहात नाही !'

टॉलस्टॉयच्या कल्पनासृष्टीपुढे उलगडलेला ऐतिहासिक पट लवकरच बारीकसारीक तपशिलासह जिवंत होऊ लागला. कादंबरीतील व्यक्तिरेखा जिवंत होऊन जणू त्याच्याशी बातचीत करू लागल्या. वास्तवातील व्यक्तीपेक्षासुद्धा कल्पनासृष्टीतील माणसे त्याला अधिक

जवळची, ओळखीची वाटू लागली. चोवीस तास त्या व्यक्तिरेखा टॉलस्टॉयच्या मनश्चक्षूपुढे वावरत, शब्दरूपाने अभिव्यक्त होण्याचा अट्टाहास धरीत. निर्मितीची प्रक्रिया शक्य तितक्या वेगाने चालू होती. पण मूळच्या चोखंदळपणापायी लिहिलेले पुष्कळसे भाग विस्कटून जात होते. धड काही जमून येत नव्हते; सूर लागत नव्हता. कादंबरीची सुरुवात कशी करावी हा प्रश्न विकट होता. कितीतरी वेळा वेगवेगळी सुरुवात करून पाहिली–न जमलेल्या कवितेसारखी दूर लोटली. टॉलस्टॉय इतका चिकित्सक अन् आदर्शवादी होता, की त्याला प्रत्येक गोष्ट अगदी उत्तमात उत्तम जुळायला हवी होती. सुरुवातीचा सूर जुळला तरी नंतरचा भाग काही सलग लिहिला जाईना. नेमक्या आराखड्याच्या अभावी किंवा बदलत्या आराखड्यांमुळे लेखनावर खूप परिष्करण करावे लागले. परिष्करण इतक्यांदा केले, की त्याला तोडच नाही. नेमकी शब्दसंहती, नीटस परिच्छेदरचना, पात्र योजना, कथानकाची गुंफण–सारे काही अगदी मनाजोगते व्हायलाच हवे होते. त्यासाठी लागतील तितके कष्ट करायची तयारी होती.

त्याची तयारी होती, तशीच सोन्याचीही कष्ट करण्याची तयारी होती. तिने त्याच्या प्रतिभेची सतत शुश्रूषा (शुश्रूषा हा शब्द तिचाच) चालविली होती. त्यामुळेच टॉलस्टॉय ६ वर्षे कादंबरी लिहू शकला, पूर्ण करू शकला. सोन्याचे सहकार्य न लाभते, तर कादंबरी लिहिली गेली असती की नाही याची शंकाच आहे. दिवसभर केलेले लिखाण तो संध्याकाळी सोन्याच्या टेबलावर ठेवी. त्याच्या लिखाणाची सुवाच्य नक्कल उतरविणे हे तिचे काम होते; अन् ते ती अगदी मनःपूर्वक, भक्तिभावाने करीत असे. ती लेकुरवाळी होती. कादंबरी संपली तोवर चार मुलांची आई झाली होती. दीड दीड वर्षाचा पाळणा! पण मुले झोपली की ती आपल्या कामाला सुरुवात करीत असे. ती सर्वार्थाने लेखकाची सहचरी बनली होती. सर्व लिखाण ती न कंटाळता उतरवून काढीत असे. किंबहुना त्यातच तिचा आनंद, अभिमान सामावलेला होता. रात्र रात्र जागून ती नक्कल उतरवून काढी. ते काम बिकट होते. कारण टॉलस्टॉयचे अक्षर म्हणजे दिव्यच होते. कित्येकदा 'स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति' अशी स्थिती असे. लिहिताना त्याच्या डोक्यात विचारांची इतकी गर्दी होई की त्या भरात तो अतिशय वेगाने लिहीत जाई. समासात लिहीत असे–दोन ओळींच्या मध्येच लिही. खाडाखोड तर विचारू नका. मग एक लांब रेघ ओढून टोकाला वर्तुळ काढून त्यात गिचमिड अक्षरात शब्द लिहिणे असले तापदायक प्रकार नित्याचे होते. सोन्या बिचारी सूक्ष्मदर्शक यंत्रच घेऊन बसायची; अन् ते गिचमिड अक्षर लावून, समजावून घेऊन स्वच्छ अक्षरात मोकळे लिहून काढायची. हे तिचे काम पहाटे ४॥–५ पर्यंत चाले. त्यानंतर ती निजे–सकाळी ११–११॥ पर्यंत झोपून राही. तत्पूर्वी आपण लिहिलेले कागद ती टॉलस्टॉयच्या टेबलावर नीट रचून ठेवीत असे. ती उठेपर्यंत पुनश्च टॉलस्टॉयने अभ्यासिकेत लिखाणाला सुरुवात केलेली असायची.

सोन्याने लिहिलेले कागद तो प्रथम नजरेखालून घाली. त्यात अक्षरशः असंख्य बदल करी. सगळे कागद खाणाखुणा, वाक्यखंड, रेघा इ. तपशिलाने चिताडले जात आणि घायाळ, रक्तरंजित अवस्थेत पुनश्च सोन्याच्या टेबलावर संध्याकाळी स्थानापन्न होत. रात्री पुनश्च तिचे काम. सूक्ष्मदर्शक यंत्रातून दुरुस्त्या वाचायच्या अन् सारे काही सुवाच्य लिहून काढायचे. अशा रीतीने ती २००० पृष्ठांची कादंबरी सोन्याने जवळ जवळ सात वेळा लिहून काढली! तिच्या दीर्घोद्योगाची खरोखर शर्थ आहे! पण सात वेळा लिहून तरी टॉलस्टॉयचे समाधान झाले काय? नाही! छापखान्यातून प्रुफे आली की तो त्यातसुद्धा बदल करी. जुळारी कंटाळले. इतके बदल केल्यास छपाईचे बिल वाढेल अशी सूचना दिली. ती त्याने अर्थातच धुडकावून लावली. अगदी अखेरच्या प्रुफसमध्येही काही शब्दसंहती पसंत पडत नसत. मग ताबडतोब तार करून तो शब्दात फेरफार सुचवी. त्याच्या चिकित्सेला काही सीमाच नव्हती. कलेतल्या कुसरीबद्दल तो कमालीचा जागरूक होता. 'युद्ध आणि शांती'ची सर्व हस्तलिखिते सध्या मॉस्कोच्या वस्तुसंग्रहालयात जपून ठेवलेली आहेत. त्याचा बारीक अभ्यास करणाऱ्याला टॉलस्टॉयचे प्रतिभापुष्प प्रत्येक संस्करणाबरोबर कसकसे विकसित होत गेले ते पहायला मिळते. सोन्याने केलेली ती अफाट मेहनत पाहून माणूस अवाक् होतो.

१८६३ च्या अखेरीस कादंबरीच्या लिखाणास सुरवात झाली, १८६९ च्या डिसेंबरमध्ये अखेरचे प्रकरण हातावेगळे झाले. १८७३ मध्ये मूळ कादंबरीतील फ्रेंच परिच्छेदांचे रशियन भाषेत भाषांतर झाले. १८८६ मध्ये सोन्याने कादंबरीची सुधारीत आवृत्ती काढली. त्यात मूळच्या प्रतीशी इमान राखले. अशारीतीने प्रसिद्धी नंतरही दोन वेळा फेरफार झालेच. कादंबरी प्रथम डिसेंबरिस्ट या नावाने सुरू झाली. मग '१८०५' या नावाखाली काही भाग प्रसिद्ध झाला. नंतर 'शेवट गोड तर सारेच गोड' हे नाव देण्याचे ठरले. मग ते बोजड वाटल्याने दुसऱ्या नावाचा विचार झाला. शेवटी प्रौडॉनच्या War & Peace या पुस्तकाचे नाव फार उचित वाटले, व तेच नाव कादंबरीला दिले. दोन परस्परविरुद्ध स्वभावधर्म असलेल्या व्यक्तिरेखा-जवळ आणून त्यातून जीवननाट्य रंगविणे हे टॉलस्टॉयचे वैशिष्ट्य होते. कादंबरीच्या नावापासूनच विसंगतींचा एकत्र न्यास करण्यास सुरवात झाली. न्याय–अन्याय, चांगले–वाईट, कृपणता–औदार्य, भ्याडपणा–शौर्य, क्षुद्रता–उदात्तता अशा न्यासामुळे कादंबरीत जीवननाट्याच्या अनेक छटा व्यक्त झाल्या आहेत.

टॉलस्टॉयला रशियन् लोकांबद्दल अधिक सहानुभूती वाटणे स्वाभाविक आहे. तरीही कादंबरीतील ठळक व्यक्तिरेखा फ्रेंचविरोधी नाहीत. पिअरी हा फ्रान्समध्येच शिकलेला आहे, रशियन् इतकेच फ्रेंचही सफाईने बोलतो. फ्रेंच संस्कृती व जीवनपद्धती यांच्या विरुद्ध तो कधीही बोलत नाही. नेपोलियनचा तो तिरस्कार करतो ते फ्रेंच माणूस म्हणून नव्हे; तर तो त्याला उन्मत, गर्विष्ठ वाटतो म्हणून. समग्र रोस्टोव्ह कुटुंबही फ्रेंचविरोधी नाही. देशभक्त मात्र जरूर आहे. प्रिन्स अँड्र्यू हा तर फ्रेंच संस्कृतीत मुरलेला आहे. नेपोलियन व फ्रेंच लष्कर सोडले, तर सामान्य फ्रेंचांशी त्याचे संबंध मैत्रीचे आहेत.

या कादंबरीत टॉलस्टॉयने सांघिक नेतृत्वाची कल्पना मांडली आहे, व त्यानुसार युद्धातील परिणामाची जबाबदारी एकट्या नेपोलियनवर किंवा कुटुझोव्ह वर टाकणे कसे अयोग्य आहे ते स्पष्ट केले आहे. एखादे फळ जेव्हा खाली पडते तेव्हा त्या घटनेस अनेक कारणे असू शकतात. त्या फळाचा दांडा सुकून जाणे, फळाचे वजन, जोराने

वहाणारा वारा, खालून दगड मारणारा मुलगा, पक्षांचा चंचुप्रहार या सर्व कारणांचा कमीअधिक प्रमाणात झालेला समवाय हा फळ पडण्याच्या दृष्य घटनेस जबाबदार असतो. त्याचप्रमाणे ऐतिहासिक महत्त्वाच्या घटनांची कारणे अनेक लहानसहान–नगण्य अशा घटनेत सामावलेली असतात. युद्धासारख्या घटनेशी फक्त एका व्यक्तीचा संबंध जोडणे (नेपोलियन किंवा कटुझोव्ह इ.) हे अप्रयोजकपणाचे आहे हा विचार कादंबरीत परोपरीने फुलविला आहे. नृपकेंद्रित इतिहासावर (King–Centred histrography) टॉलस्टॉयने आक्षेप घेतला असून त्यात खूपच तथ्य आहे.

कादंबरीच्या अखेरीवरून सुखांत की शोकांत ठरविणे कठीण व्हावे. तथापी टॉलस्टॉयने त्याचा विधीनिषध बाळगलेला नाही. सत्याशी एकनिष्ठ रहाणे एवढाच वाङमयीन धर्म त्याने पाळला आहे. वावदूक टीकाकारांनी वाटेल तेवढा वाद घालावा ! कादंबरीचा शेवट तासून गुळगुळीत केलेला नाही. जीवनाचा प्रवाह असाच पुढे खळाळत जाणार आहे ही गोष्ट वाचकांना जाणवत रहाते. मदाम बोव्हारीसारख्या प्रमाणबद्ध कादंबरीला जसा आदि–मध्य–अंत असा घाट असतो तशा साच्यात 'युद्ध आणि शांती' बसू शकणार नाही. टॉलस्टॉयला वाङमयप्रकारांच्या आकृतिबंधाबद्दल कधीही दबदबा वाटला नाही. तो असल्या निकषांच्या सीमापर आहे. 'Others abide our reason! Thou art free !' असेच टॉलस्टॉयच्या बाबतीत म्हणायला हवे. जीवन जर अनिर्बंध खळाळत वहाणार असेल, तर त्याच्या शब्दांकित स्वरुपाला तरी वाङमयप्रकारांच्या निकषांचे निर्बंध कशासाठी ? प्रस्तुत कादंबरी वाचल्यावर एकाद्या विस्तीर्ण महानदीचा एखादा भाग पाहिल्याचा भास होतो. कोणत्यातरी अत्युच्च शिखरावरून ती उगम पावली, अन् पुढे अशीच उसळत वहात रहाणार आहे. कादंबरी संपली तरी त्यातून निर्माण झालेली जीवनधारा संपलेली नाही. या दृष्टीने प्रिन्स अॅण्ड्र्यूच्या बाळाचा उल्लेख किती कलापूर्ण, अर्थपूर्ण वाटतो. चिवट जीवनासक्ती अशीच कायम रहाणार आहे – कादंबरीतील व्यक्ती अशाच पिढयान्पिढया जगत रहाणार आहेत. कादंबरी संपते तीच मुळी नवजीवनाच्या तारा जुळवून ! त्यातून जीवन प्रवाहाची अनिरुद्धता आणि गतिमानातच सुचवायची आहे !

या कादंबरीचा पसारा पुढे इतका काही वाढत गेला, की तिच्या कक्षा सीमित करणे खुद्द टॉलस्टॉयलाही जमले नाही. बराचसा भाग लांबण लावल्या सारखा झाला. व्यक्ती, इतिहास आणि तत्त्वज्ञान या सर्वांनीच आपापले अस्तित्त्व चढाओढीने दाखवून देण्यास सुरवात केली. परिणामी कादंबरीचा आकार फार बेढब बनला. त्याविषयी टॉलस्टॉयला प्रथम काही खंत वाटली नाही, पण १५–२० वर्षांनी मात्र खंत वाटली. कादंबरी इतकी अवाढव्य नको होती असे तो म्हणत असे...पण ते त्याच्या अध्यात्मिक पुनर्जन्मानंतर !

सर्वसामान्य वाचक या कादंबरीने स्तिमित झाला – गोंधळला. पुष्कळांना त्या कादंबरीची झेप एकदम समजली नाही; आणि ज्यांना समजली, त्यापैकी पुष्कळांना ती आवडली नाही. लोकांच्या प्रतिक्रिया संमिश्र स्वरुपाच्या होत्या. तरीही सर्वसामान्य रसिकवर्गात खूपच खळबळ उडाली हे उघड आहे. जुन्या पठडीतल्या राजनिष्ठ लोकांच्या श्रद्धेला धक्का बसला. सर्वमान्य शूराग्रणींची प्रतिमा रंगविताना टॉलस्टॉयने कोतेपणा दाखविला आहे, देशप्रेमाची भावना चेतविणारे सर्व प्रसंग सपाट करून टाकले आहेत म्हणून त्यांचा रोष होता. जे जे लोक आधुनिक क्रांतिविचारांनी भारावले होते, त्यांना देखील नाराजी वाटत होती. खानदानी अमीर उमराव सद्वृत्त दाखविण्यात आणि त्यांचा भंपकपणा–दुष्टपणा न दाखविण्यात टॉलस्टॉयने चूक केली आहे असे त्यांचे मत पडले. कादंबरी हप्त्याने प्रसिद्ध होत होती. तेव्हा परस्परविरुद्ध अभिप्रायही दिले जात होते. टर्जिनिव्हला पहिले दोन भाग वाचून कितीतरी वेळा अगदी कंटाळा आला. त्याच्या उलट डोस्टोयव्हस्कीला 'पुढील भाग वाचायची ओढ लागून राहिली.' पूर्ण कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर जाणकारांचे अक्षरशः डोळे दिपून गेले. टर्जिनिव्ह लिहितो, "ही कादंबरी इतकी श्रेष्ठ दर्जाची आहे की याहून वरच्या दर्जाचे कोणी काही लिहिले असेल असे वाटत नाही; आणि या तोडीचे भविष्यकाळात कोणी काही लिहील की नाही याची शंकाच आहे." टर्जिनिव्हच्या आग्रहावरून फ्लॉबर्टने ती कादंबरी वाचली त्याविषयी अभिप्राय कळविताना तो लिहितो, 'ही कादंबरी निःसंशय पहिल्या दर्जाची आहे. मानवी मनाचे अन्तर्भेदी चित्रण त्यांत आलेले आहे.. शेक्सपिअरच्या तोडीची उंची या कलाकृतीने गाठली आहे. वाचताना मी मनःपूर्वक कौतुक करीत होतो, कौतुकाचे उत्स्फूर्त उद्गार दाबून टाकीत होतो. पुस्तक फारच मोठे आहे हो, पण उत्तम आहे...फार फार श्रेष्ठ आहे !' कित्येकांना ही कादंबरी वाचताना झोलाची आठवण झाली. चेकॉव्हने जेव्हा ही कादंबरी वाचली. (प्रसिद्धीनंतर २० वर्षांनी) तेव्हा तर तो विस्मयचकित झाला. सर्व पट्टीच्या साहित्यिकांनी कादंबरीवर अनुकूल अभिप्राय दिले. कादंबरीचे रसग्रहण करणाऱ्या अनेक लेखमालिका लिहिल्या गेल्या. त्या स्तुतिसुमनांच्या वर्षावामुळे टॉलस्टॉयचा 'अहम्' काही सुखावला नाही. तो त्या बाबतीत अगदी स्थितप्रज्ञ होता. एखाद्या अभिप्रायात वाजवीपेक्षा जास्त स्तुती केल्याचे दिसल्यास तो अभिप्राय टॉलस्टॉय शेवटपर्यंत वाचीतही नसे. ज्यांनी कादंबरीवर प्रतिकूल टीका केली त्यांना टॉलस्टॉयने अनुल्लेखाने उत्तर दिले.

साखरेची गोडी जशी सांगून समजत नाही, तशी या वाङमयीन कैलास लेण्याची महती प्रत्यक्ष वाचल्याशिवाय कळणे अशक्य आहे. जगातल्या सर्वोत्कृष्ट कादंबऱ्यात 'युद्ध आणि शांती'णी गणना होते. ती कादंबरी लिहिल्याला १०० वर्षे लोटली, तरीही तिचा मानदंड अद्याप जसाच्या तसा आहे. यावरून त्या कादंबरीच्या थोरवीची सामान्य कल्पना यावी.

'युद्ध आणि शांती'वर टॉलस्टॉयला अतोनात पैसा मिळाला. नुसत्या पहिल्या आवृत्तीवरच २९१०० रुबेल्स (पावणेतीन लाख रुपये) मिळाले. नंतरही अनेक आवृत्त्या निघाल्या. ऐश्वर्याची आवड असलेल्या सोन्याला ही कादंबरी म्हणजे साक्षात कामधेनूच वाटली. यानंतर सुमारे दहा वर्षांनी टॉलस्टॉयच्या जीवनमूल्यात संपूर्ण परिवर्तन झाले. आणि मग मात्र ती कादंबरी, अन् त्यातून निघणारा पैशाचा प्रवाह या दोन्हीचा विलक्षण कंटाळा आला. कीर्तीच्या झोतात रहाणे असह्य झाले. परंतु काही इलाजच नव्हता. या कादंबरी लेखनामुळे श्रेष्ठ साहित्यिक म्हणून त्याच्या भोवती जे कीर्तीचे वलय झगमगत राहिले ते अगदी जीवनाच्या अखेरीपर्यंत ! कीर्तीच्या वलयातून त्याची कधीही सुटका झालीच नाही.

# २ : टॉलस्टॉय आणि गांधी

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात साहित्य, तत्त्वज्ञान, धर्मसुधारणा, शिक्षणशास्त्र, समाजसुधारणा इ. अनेक क्षेत्रात टॉलस्टॉयचा विलक्षण प्रभाव पडला. टॉलस्टॉयचे विचार अतिशय बंडखोर व मूलगामी स्वरुपाचे होते. त्याने लिहिलेले अभिजात साहित्य हा कलेच्या क्षेत्रातला उत्तुंग मानदण्ड होता. त्याचे धर्मविषयक विचार प्रागतिक व अत्यंत बुद्धीनिष्ठ होते. त्यातून अनेकांना प्रचोदना मिळत होती. ज्या ज्या क्षेत्रात टॉलस्टॉयने पदार्पण केले, त्यापैकी काही क्षेत्रात महात्मा गांधी यांनीही कर्तृत्त्व गाजविले. विसाव्या शतकाचा पूर्वार्ध गांधींच्या कर्तृत्त्वाने प्रभावित झाला. गांधी व टॉलस्टॉय यांची प्रत्यक्षात कधीही भेट झाली नाही. टॉलस्टॉयच्या जीवनाच्या अगदी संध्याकाळी गांधींचे कर्तृत्त्व उदयोन्मुख झाले. त्याची भेट फक्त पत्ररूपाने झाली तेवढीच ! तथापि त्यातूनही दोघांना आपली एकात्मता जाणवली. 'गांधी हा मनुष्य वैचारिकदृष्ट्या आपल्याला फार जवळचा आहे.' असे टॉलस्टॉयने लिहून ठेवले.

महात्मा गांधींशी पत्ररूपाने परिचय होण्यापूर्वीपासूनच टॉलस्टॉयला पौर्वात्य संस्कृती, जीवनपद्धती, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान याविषयी ओढ होती, अतिशय आदर होता. आदर केवळ भावनात्मक नसून पौर्वात्य तत्त्वज्ञानाच्या सखोल अभ्यासातून निर्माण झालेला होता. टॉलस्टॉयच्या स्वतःच्या वाचनालयात (२३००० पुस्तकांचा संग्रह) पौर्वात्य तत्त्वांची पुष्कळशी पुस्तके होती. कन्फ्यूशिअस, लाओत्से मो-तइ, हे चिनी तत्त्वज्ञ, शितोइझम् वरील पुस्तके, बुद्ध, महावीर, झरतुष्ट्र, महंमद यांचे धर्मविचार, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, वेद, उपनिषदे, गीता, महाभारत, रामायण इ. विपुल ग्रंथसंपत्ती होती. त्या ग्रंथांच्या अभ्यासाचे अनेक दाखले टॉलस्टॉयच्या लिखाणात मिळतात. टॉलस्टॉयने आयुष्याच्या अखेरीस जो Anthology of religions thousht नावाचा संग्रह केला, त्यातही पौर्वात्यांचे विचारधन संग्रहीत केलेले आहे. my Confesion या अप्रतीम, आत्मपर लिखाणात स्वतःची भावावस्था वर्णन करताना भारतीय पंचतंत्रातील एका रूपककथेचा अत्यंत चपखल असा उपयोग केलेला आहे.

पौर्वात्य जीवनपद्धतीविषयी टॉलस्टॉयला अगदी तरुणपणापासून कुतूहल वाटत होते. कझान विद्यापीठात शिक्षण घेत असता एकदा आजारी पडल्यामुळे त्याला हॉस्पिटलमध्ये राहण्याची वेळ आली. तेथे त्याला एक बुद्धधर्मीय मंगोलियन लामा भेटला. त्यावेळी टॉलस्टॉयचे वय जेमतेम वीस वर्षांचे असेल. मंगोलियन लामाने बुद्ध धर्माची, अहिंसा व अप्रतिकार या जीवनमूल्यांची टॉलस्टॉयला प्रथम माहिती करुन दिली. त्यासंबंधी टॉलस्टॉयचे कुतूहल जरी जागे झाले तरी या भेटीचा फारसा प्रभाव पडला नाही. कारण या भेटीनंतर शिक्षण अर्धवट टाकून तो सरळ कॉकेशस्‌मध्ये युद्धावर दाखल झाला. त्यानंतर क्रिमियन युद्धात भयंकर रणकंदन त्याने पाहिले. युद्धातील अमानुष क्रौर्य पाहून मात्र त्याला अत्यंत उद्वेग वाटला. त्याभरात त्याने आपल्या दैनंदिनीत लिहिले, 'धर्माच्या नावाखाली अखिल मानव जातीचे एकीकरण घडवून आणणे हा माझ्या जीविताचा प्रमुख हेतु राहील. त्यासाठी भगीरथ प्रयत्न करण्यास मी सदैव कटिबद्ध राहीन ?'

इ. स. १८८० च्या सुमारास टॉलस्टॉयच्या जीवनमूल्यात आमूलाग्र फरक पडला. 'अध्यात्मिक पुनर्जन्मा'नंतर टॉलस्टॉयला पौर्वात्य जीवनपद्धतीचा अधिक अभ्यास करण्याची निकड वाटू लागली. ख्रिश्चिॲनिटी व अनेक पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांच्या जोडीला पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांच्या अभ्यासास सुरुवात झाली. या तौलनिक अभ्यासासाठी उपनिषदे, गीता, इस्लाम, बुद्ध, महावीर, रामकृष्ण, विवेकानंद, कन्फ्युशिअस् इ. अनेकांनी शिकविलेल्या जीवनविज्ञानात त्याला मानवाच्या आत्मिक प्रगतीचा मार्ग स्पष्ट दिसू लागला.

१४ सप्टेंबर १८९६ रोजी टॉलस्टॉयच्या दैनंदिनीत विवेकानंदांचा 'राजयोग' वाचल्याची नोंद आहे. हे पुस्तक श्री. तोडा नावांच्या भारतीयाने अमेरिकेहून टॉलस्टॉयला धाडले होते व त्यात विवेकानंदांची राजयोगावरील भाषणे संग्रहीत केलेली होती. ते विचार टॉलस्टॉयला अतिशय तर्कशुद्ध व स्फूर्तिपद वाटले. त्यानंतर श्री. सुऱ्हावर्दी, चित्तरंजनदास यांचाही टॉलस्टॉयशी चुटपुटता पत्रव्यवहार झाला. १९०४ मध्ये कॅलिफोर्नियात राहणारे एक बंगाली स्वामी प्रेमानंद भारती यांनी टॉलस्टॉयशी बराच पत्रव्यवहार केला. त्यांनी टॉलस्टॉयला 'कृष्ण' नावाचे स्वलिखित पुस्तक धाडले. त्यातले विचार टॉलस्टॉयला इतके महत्त्वाचे वाटले की त्याने तावडतोब ते पुस्तक रशियन भाषेत भाषांतरित करविले. प्रेमानंद भारतींना सविस्तर उत्तर धाडले. तेच 'हिंदूस पत्र' म्हणून प्रसिद्ध आहे. (A letter to a Hindu)

हे पत्र हस्ते परहस्ते फिरत फिरत जेव्हा म. गांधींच्या पाहण्यात आले तेव्हा गांधींना विलक्षण आनंद झाला. आपल्या अंतररंगातील विचार टॉलस्टॉयसारख्या जगप्रसिद्ध महर्षींनी नेटक्या भाषेत मांडलेले पाहून गांधींना आपल्या अंगीकृत कार्याला नैतिक आधार मिळाल्याचा आनंद वाटला. ते विचार आपण सांगण्यापेक्षा टॉलस्टॉयचे ते पत्रच छापून प्रसिद्ध करावे आणि त्याच्याविषयी लोकांच्या मनात जो परमादर आहे त्याचा स्वमत-प्रचारार्थ उपयोग करून घ्यावा असा गांधींनी विचार केला. त्यासंबंधी लेखकाची परवानगी मागण्यासाठी त्यांनी टॉलस्टॉयला पत्र लिहिले. हे पत्र म्हणजे गांधींनी टॉलस्टॉयला लिहिलेल्या पत्रापैकी दुसरे पत्र होय. [पहिले पत्र टॉलस्टॉयच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त लिहिले होते. त्यात औपचारिक अभिवादन-अभिष्टचिंतन इ. मजकूर होता. ते पत्र जवळ जवळ ४० वर्षे बेपत्ता होते. श्री. जी. डी. तेंडूलकरांनी त्याचे संशोधन करून १ ऑक्टोबर १९४९ मध्ये लखनौच्या नॅशनल हॅरॉल्डमध्ये ते प्रथम प्रसिद्ध केले.] १ ऑक्टोबर १९०९ रोजी लंडनहून दुसरे पत्र लिहिलेले आहे. त्यातून दोघांना एकमेकांच्या अंतरीची खूण पटल्याचे स्पष्ट जाणवते.

या पत्रात गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील लढ्याचा वृत्तांत दिलेला आहे. ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या अन्यायाचा आपण अहिंसात्मक शस्त्राने प्रतिकार करीत आहोत, कारण अहिंसात्मक प्रतिकारावर आपली दृढ श्रद्धा आहे. टॉलस्टॉयचे वाङमय आपण वाचलेले असून त्यातील विचार आपणास पटलेले आहेत. ते प्रत्यक्षात आणण्याचा

आपण आणि आपले सहकारी आटोकाट प्रयत्न करीत आहोत असे गांधींनी टॉलस्टॉयला कळविले. त्याचप्रमाणे 'हिंदूस पत्र' या पत्राच्या २०,००० प्रती छापून वाटण्याचा आपला इरादा आहे, त्यास आपली परवानगी आहे काय ? लेखनाचे मानधन द्यायचे काय इ. विचारणा आहे. अखेरीस 'सत्य' या जीवनमूल्यावरील समान श्रद्धा लक्षात घेऊन लिहिण्याचे धाडस केल्याचा उल्लेख आहे. खाली सही–

आपला नम्र सेवक–मो. क. गांधी

या पत्राला टॉलस्टॉयने लगेच ७ ऑक्टोबर १९०९ रोजी उत्तर लिहिले. त्यांत ट्रान्सव्हालमधील सहकारी बंधूंना त्यांच्या शांततापूर्ण लढ्यात यश चिंतले. आपणही हिंसा आणि क्रौर्य यांना अहिंसा व शांततामय प्रतिकाराने उत्तर देत आहोत. राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या जुलमाला आपण अहिंसेच्या अस्त्राने अत्यंत परिणामकारक उत्तर देत आहोत. 'हिंदूस पत्र' या लिखाणाच्या प्रती छापून प्रसिद्ध कराव्यात. त्याचप्रमाणे आपले विचार भारतीय भाषातून भाषांतरित व प्रसारित होत असतील तर त्यात आनंदच आहे. असल्या लिखाणाच्या संदर्भात मानधनाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. मी तुम्हाला बंधुत्त्वाच्या भावनेने अभिवादन करतो. तुमच्याशी व्यक्तीगत संपर्क साधल्यामुळे मला अतिशय आनंद वाटत आहे. अशा मजकुराचे हे पत्र आहे.

हे टॉलस्टॉयने गांधींना धाडलेले पहिले पत्र. त्यामुळे गांधींना फार मोठे नैतिक पाठबळ मिळाल्याचा आनंद झाला. विश्वशांतीच्या उपासकाडून प्रोत्साहन मिळाल्याने हुरूप वाटला. लगेच त्यांनी १०–११–१९०९ रोजी टॉलस्टॉयला पत्र लिहिले. त्यात पत्रोत्तराबद्दल व 'हिंदूस पत्र' छापण्याची परवानगी दिल्याबद्दल आभार आहेत. पत्राच्या सोबत श्री. डोक यांनी लिहिलेले आपले चरित्र गांधींनी टॉलस्टॉयला धाडले. 'त्यावरून दक्षिण आफ्रिकेत चालविलेल्या अहिंसात्मक लढ्याची आपणास कल्पना येईल, आमच्या कार्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. आपल्या सहानुभूतीची आम्हास फार गरज असल्यामुळे स्वतःचे चरित्र पाठविण्यात काही वावगे आहे असे वाटत नाही. आमच्या चळवळीचा अधिक प्रचार व प्रसार करण्यासाठी आपल्या नावाचा उपयोग करू काय ?...आमची चळवळ जर यशस्वी झाली तर त्यामुळे धर्म, प्रेम (करुणा), आणि सत्य यांचा अधर्म, द्वेष व असत्य यांच्यावर जय होईल, इतकेच नव्हे तर लाखो पददलितांसमोर ते एक चांगले ठसठशीत उदाहरण राहील. हिंसेला अहिंसेने प्रत्युत्तर देण्याचे उदाहरण निदान भारतीयांना तरी फारच उपयोगी पडेल. त्याच मार्गाने अंतीम यश मिळेल यात मला मुळीच शंका नाही. आपण सांगितलेल्या मार्गावरूनच आम्ही जात आहोत. त्यात जर आपणाकडून प्रोत्साहन मिळाले तर आमच्या निश्चयाला अधिक बळकटी येईल...या लढ्यात माझा मुलगा तुरुंगात गेलेला असून त्याला ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा झालेली आहे. ही त्याची तुरुंगाची चौथी वारी ! मीही आफ्रिकेत गेलो की पकडला जाणार हे उघड आहे. इ. इ.

लंडनहून धाडलेल्या पत्राचे उत्तर जोहान्सबर्गला मागविले आहे.

आफ्रिकेत आल्यावर गांधींनी टॉलस्टॉयला The Indian Home Rule हे आपले पुस्तक अभिप्रायार्थ पाठविले. ते पुस्तक प्रथमतः गुजराथीत लिहिले होते. ते सरकारने जप्त केले. तेव्हा गांधींनी त्याचे भाषांतर करून एक प्रत टॉलस्टॉयला धाडून दिली. त्या पुस्तकात सशस्त्र क्रांतीकारक व अहिंसावादी यांचा संवाद आहे व त्या अनुषंगाने या दोन मतप्रणालींची चर्चा आहे.

या दोन्ही पत्रांना मिळून टॉलस्टॉयने एक त्रोटक उत्तर लिहिले. त्रोटक उत्तर लिहिण्याचे कारण की त्याची प्रकृती बरी नव्हती. ८ मे १९१० रोजी हे पत्र लिहिले आहे. 'Indian Home Rule या पुस्तिकेत चर्चिलेले प्रश्न केवळ भारतीयांच्याच नव्हे तर अखिल मानव जातीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. ते पुस्तक आपणास फार चित्तवेधक वाटले. श्री. डोक यांनी लिहिलेले चरित्र वाचले. चरित्र अत्यंत वेधक आहे व त्यावरून आपली चांगली ओळख पटली. जरा बरे वाटू लागले की सविस्तर लिहीन.' असा त्या पत्राचा सारांश आहे. पत्राच्या अखेरीस 'तुमचा बंधू आणि मित्र–लिओ टॉलस्टॉय' अशी सही आहे.

वरील पत्रास गांधींनी १५ ऑगस्ट १९१० रोजी आफ्रिकेहून उत्तर लिहिले. त्यात प्रथम 'Indian Home Rule' आवडल्याबद्दल आभार मानले आहेत. श्री कॅलेन बॅक यांच्या सहकार्याने आपण टॉलस्टॉय फार्म स्थापन केले आहे. श्री. कॅलेनबॅक यांनी आपले (टॉलस्टॉयचे) सर्व लिखाण वाचले आहे. My Confession चा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव पडला. आपल्या सर्व कल्पना प्रत्यक्षात जगून दाखविण्याची त्यांची जिद्द आहे, त्या भरात त्यांनी शेतीला टॉलस्टॉयचे नाव दिले आहे. त्या शेतीचा उपयोग सत्याग्रहींसाठी व्हायचा आहे. त्या संबंधात अधिक माहिती व्हावी म्हणून Indian Opinion चे अंक पाठवीत आहे. आपली प्रकृती बरी नसता अशी तोशीस देणे प्रशस्त वाटत नाही; परंतु शांततामय प्रतिकाराच्या ट्रान्सव्हालमधील आमच्या चळवळीविषयी आपणास उत्सुकता वाटत असल्याने हे अंक धाडले आहेत. असा पत्राचा मतितार्थ. खाली सही–आपला विश्वासू सेवक–मो. क. गांधी

हे पत्र मिळाले तेव्हा टॉलस्टॉय अतिशय अशक्त झालेला होता. घरात भयंकर भांडणे सुरू होती. साऱ्या सुखशांतीला चूड लागलेली होती. काउंटेसच्या (पत्नी) हिस्टीरियाला भर आलेला होता. त्यापायी टॉलस्टॉयचे शरीर व मन पार खचून गेले होते. अप्रतिकार, प्रेम, शांतता, बंधुता या उदात्त तत्त्वांचा उद्‌गाता, विश्वशांतीचा उपासक अशी त्याला कीर्ती मिळाली होती. जगाच्या कुठल्या लांबलांबच्या कोनाकोपऱ्यातून लोक त्याचा सल्ला मागत होते. स्वतःला त्याचा दासानुदास म्हणवून घेण्यात धन्यता मानीत होते. पण प्रत्यक्ष अर्धांगीशी चालू असलेला संघर्ष उदात्त तत्त्वांनी जिंकता येत नव्हता. काउंटेस ही रुग्णाईत होती. तिने केलेल्या पराभवाने हतबल व्हायचे नाही असे त्याने ठरविले. गांधींचे पत्र वाचून टॉलस्टॉयच्या हताश मनात पुनश्च आशादीप उजळला. जे मला जमले नाही ते हा आशियातला हिंदू ट्रान्सव्हालमध्ये करून दाखवील. तो श्रद्धापूर्वक अहिंसेचा मार्ग चोखाळतो आहे–त्याला प्रोत्साहन दिलेच पाहिजे. कुणी सांगावे ? आपण गायिलेल्या तत्त्वांच्या संकीर्तनाला हा जागतिक महत्त्व प्राप्त करून देईल ! मला जे जमले नाही, ते गांधी नामक मनुष्य करून दाखविल ही आशा !

लगेच टॉलस्टॉयने चेरेट्कॉव्हला (आपला एकनिष्ठ अनुयायी)

लिहिले, 'गांधी हा मनुष्य ब्रिटिश साम्राज्यशाहीशी अहिंसात्मक शस्त्राने लढा देत आहे. तो आपल्याला फार जवळचा आहे. त्याने माझे सर्व लिखाण वाचलेले आहे. त्याच्या Indian Home Rule या भारतीय भाषेतील पुस्तकावर सरकारने बंदी घातली आहे. त्याला माझा अभिप्राय हवा आहे. मी त्यावर अगदी तपशीलवार लिहिणार आहे. तुम्ही माझे पत्र भाषांतरित करून पाठवाल काय? आणि मग या अनुयायामार्फत गांधींना उत्तर लिहिले गेले. तथापी ते त्रोटक होते. टॉलस्टॉयची प्रकृती सुधारल्यावर ७ सप्टेंबर १९१० रोजी टॉलस्टॉयने गांधींना अखेरचे पत्र धाडले आणि मग दोन महिन्यांनी तो मृत्यूच्या पडद्याआड गेला. शेवटचे पत्र कोट्चेटीहून—म्हणजे आपल्या मोठ्या मुलीकडून लिहिले आहे. वस्तुतः त्यावेळी टॉलस्टॉय अत्यंत हताश मनःस्थितीत होता, पत्नीच्या तापदायक वागणुकीने अक्षरशः रंजीस आलेला होता. त्याची स्वतःची प्रकृतीही अगदी हल्लक झाली होती. तरीही गांधींना प्रोत्साहन देणं हे आपले नैतिक कर्तव्य आहे अशी त्याची भूमिका. आपणास प्राणप्रिय असणाऱ्या तत्त्वांच्या आधारे एक माणूस अन्यायाचा प्रतिकार करतो आहे, वाटेल तेवढ्या यातना झाल्या तरी त्याची तत्त्वनिष्ठा ढळलेली नाही, ही गोष्ट टॉलस्टॉयला फार अर्थपूर्ण वाटत होती. म्हणून तशा विकल स्थितीतही त्याने गांधींना सविस्तर पत्र लिहिले.

त्या पत्रात इंडियन ओपिनिअनचे अंक वाचल्यांचा उल्लेख आहे आणि त्यातील लिखाण वाचून मनात उद्‌भवलेले विचार लिहिले आहेत. त्यापैकी महत्त्वाचा भाग असा,

'मृत्यू आता माझ्या सन्निध येऊन ठेपलेला आहे. तत्पूर्वी माझ्या मनात उसळणारे विचार, भावना इतरांना सांगून टाकण्याची मला ओढ लागून राहिली आहे. कारण त्या विचारांनी मी भारून गेलो आहे आणि माझ्या दृष्टीने ते अत्यंत महत्त्वाचे आहेत.'

'आपण ज्याला सामान्यतः प्रतिकार म्हणतो, ती वस्तुतः निष्कलंक प्रेमाची अत्यंत शुद्ध–अविकृत–अशी शिकवण असते. प्रेम म्हणजे दुसऱ्याच्या आत्म्याशी एकरूप होण्याची, त्याच्याशी अद्वैत साधण्याची प्रक्रिया होय. सर्व प्रकारच्या श्रेष्ठ कार्यांचा मूलस्रोत अशा उदात्त प्रेमभावनेतूनच निर्माण झालेला असतो. प्रेम हे मानवी जीवनाचे अंतीम ध्येय आहे, तोच एक नियम आहे–जीवनपद्धती आहे. या गोष्टींची प्रत्येकाला स्वतःच्या अंतरंगात–अगदी खोल–कुठे तरी जाणीव असतेच. लहान मुलांच्या ठिकाणी असल्या जाणीवेचा स्पष्ट आविष्कार दिसतो; आणि मोठ्या माणसांनासुद्धा...खोटयानाटया विकृत तत्त्वांनी दृष्टी बांधली जाण्यापूर्वी–या प्रेममय ध्येयाची संपूर्ण जाणीव असते...

'एका बाजूला प्रेम हाच जीवनाचा सर्वश्रेष्ठ नीतिनियम म्हणून मान्यता द्यायची आणि दुसरीकडे राजसत्ता, न्यायालय, लष्कर इ. क्षेत्रात मात्र हिंसेला अटळ मानून तिचा स्वीकार करायचा, हिंसेचा मार्ग अवलंबायचा ही उघड उघड विसंगती आहे. तेव्हा आता आपल्यापुढे प्रश्न आहे तो असा की, एकतर आपण कोणतीही आर्थिक किंवा नैतिक शिकवण मानीतच नाही आणि आपल्याला फक्त सक्तीचा किंवा दंडेलीचाच कायदा समजतो असे तरी मान्य करायचे किंवा सक्तीने गोळा केले जाणारे कर, न्यायालये, लष्कर असल्या गोष्टी बंद करायच्या. समाजवाद, साम्यवाद (कम्युनिझम), अराजक, मुक्तिसेना, बेकारी, श्रीमंतांची चैन, गरिबांच्या असह्य यातना, आत्महत्येचे वाढते प्रमाण–ह्या सर्व ठिकाणी मुळात ही विसंगती दिसते. प्रेमाचे तत्त्वज्ञान मान्य केल्याशिवाय आणि सर्वप्रकारची हिंसा त्याज्य केल्याशिवाय या विसंगती दूर होणे अशक्य आहे. या दृष्टीने पहाता ट्रान्सव्हालमध्ये आपण चालविलेले कार्य आमच्या जगाच्या केन्द्रबिंदूपासून खूप दूर असले तरीसुद्धा अत्यंत मूलभूत स्वरूपाचे असल्याने आम्हाला त्याचे फार महत्त्व वाटते. कारण त्या कार्यातून आपण अंगीकृत तत्त्वांचा सक्रीय–प्रात्यक्षिक पुरावा जगापुढे ठेवीत आहोत. त्यात केवळ ख्रिश्चन म्हणविणाऱ्यांनीच नव्हे, तर अखिल मानवजातीने भाग घेतला पाहिजे...राजसत्ता अशा चळवळी नामशेष करण्याचा प्रयत्न करते. कारण ..कोणत्या दिशेने धोका संभवतो याची सत्ताधीशांना पूर्ण जाणीव असते. म्हणून स्वतःचा बचाव करण्याचा ते अगदी अटीतटीने प्रयत्न करतात. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीच नव्हे, तर केवळ स्वतःचे अस्तित्त्व टिकविण्यासाठी सुद्धा त्यांना अशा शांततामय संघर्षाला तोंड द्यावेच लागते.' खाली सही–तुमच्याविषयी परमादर बाळगणारा–लिओ टॉलस्टॉय.

गांधी आणि टॉलस्टॉय यांच्यातला पत्रव्यवहार इथे संपतो. पत्रांची संख्या किती थोडी! केवळ ३–४ इतकीच. पण आशय महत्त्वाचा. ज्या तत्त्वांचे संकीर्तन टॉलस्टॉयने आमरण केले, त्यांची धुरा त्याच्या मृत्यूपूर्वी गांधींनी स्वीकारली. गुरुस्थानी असणाऱ्या टॉलस्टॉयच्या वाङ्मयातून व पत्रातून मनोधैर्य मिळविले. त्या जोरावर 'शिष्या-दिच्छेत्पराजयम्' अशा तोडीचा पराक्रम गाजवून दाखविला. गांधींनी हाती घेतलेले उपक्रम बव्हंशी टॉलस्टॉयप्रणीत होते. तथापी गांधी हा स्वतंत्र बुद्धीचा पुरुष होता. जसजसे ते राजकारणात गुंतत गेले, तस-तसे सर्वसामान्य माणसाला हाताशी धरून, त्यातले वैशिष्टय ओळखून राजकीय कार्याला जोडण्याची किमया त्यांनी करून दाखविली. श्रमांची प्रतिष्ठा, जीवन शिक्षण, ग्रामोद्योग, दलितांचा उद्धार, साक्षरता, इ. गांधींचे कार्य अत्यंत मूलगामी स्वरूपाचे होते. या कार्याचा मूलस्रोत टॉलस्टॉयच्या अपरंपार ग्रंथसंपत्तीपर्यंत पोहोच-विता येईल. टॉलस्टॉयच्या 'The Kingdom of God is within you' या पुस्तकाने आपण किती प्रभावित झालो ते गांधींनी लिहून ठेवलेले आहे. तथापी गांधींनी जे उपक्रम केले, ते टॉलस्टॉयने सांगितले म्हणून केले नाहीत. अंधश्रद्धेने जसेच्या तसे उचलले नाहीत. आपल्या देशाला रुचेल, पचेल असे वाटल्यावर त्यावर भारतीयत्वाचे संस्करण करूनच ते कार्यक्रम हाती घेतले व यशस्वी करून दाखविले.

गांधींना केवळ नैतिक पाठिंबा देऊन टॉलस्टॉल कालवश झाला. अधिक तपशीलवार मार्गदर्शन करण्याचा योगच आला नाही. परंतु टॉलस्टॉयने जी प्रशंसा केली, प्रोत्साहन दिले, ते गांधींना लाख मोलाचे वाटले. Indian Opinion मध्ये टॉलस्टॉयच्या मृत्यूनंतर त्याची गांधींना आलेली पत्रे छापली आणि टॉलस्टॉयवरील मृत्यु-लेखात त्याच्याविषयी भक्तियुक्त आदर व्यक्त केला. Indian Opinion मध्ये आलेल्या टॉलस्टॉयच्या मृत्युलेखातील काही भाग असा –

'काउंट लिओ टॉलस्टॉय यांचा उल्लेख आम्ही केवळ परमादरा-नेच करू शकतो. आमच्या दृष्टीने ते या कालखंडातील वंदनीय महापुरुषांपैकी एक होते. त्यांच्या शिकवणीतला जितका भाग

आम्हास आकलन झाला, तितका भाग कसोशीने आचरणात आणण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे...टॉलस्टॉय हे कालवश झालेले नाहीत, तर सबंध जगभर पसरलेल्या त्यांच्या असंख्य अनुयायातून त्यांचे जीवन अस्तित्त्वात आहे. जसजसा काळ जाईल, तसतसे अखिल मानवजातीला त्यांच्या शिकवणीचे महत्त्व पटेल अशी आमची दृढ श्रद्धा आहे...ट्रान्सव्हालमधील लढा यास्नायापोल्यानाच्या महर्षींना जागतिक महत्त्वाचा वाटावा ही गोष्ट भारतीय सत्याग्रहींना अतिशय प्रोत्साहन देणारी आहे...'

Indian Opinion 26 th Novb. 1910.

प्रस्तुत विवेचनावरून टॉलस्टॉय व गांधी यातील गुरुशिष्य-संबंध आणि परस्पराविषयींची प्रेमादराची भावना दिसून येते. त्यावरून भारतीय जनतेला टॉलस्टॉय किती जवळचा आहे ते सहज स्पष्ट व्हावे.

# ३ : अखेर...

अॅस्टापोव्हो...मध्य रशियातले एक लहानसे वैशिष्टचहीन स्टेशन केवळ नगण्य ! पण इ. स. १९१०च्या नोव्हेंबरच्या सुरवातीपासून सबंध जगाचे लक्ष अॅस्टापोव्होवर केंद्रित झालेले होते, तारा, पत्रे, फोन्स सतत सुरू होते. पोस्टाचे कार्यालय चोवीस तास उघडे ठेवूनही काम पुरे होईना म्हणून ताबडतोब सर्व यंत्रणा वाढवून घेतली होती. सबंध जगाला अॅस्टापोव्होशी संपर्क साधायचा होता.

असंख्य वर्तमानपत्रांचे बातमीदार, छाया-चित्रकार तेथील स्टेशनमास्तरच्या घराभोवती घुटमळत होते. शेकडो माणसे स्टेशनवर दाटीवाटीने घुटमळत होती. इतकी विलक्षण गर्दी, पण यत्किंचितही आवाज नाही—बोलणे बंद ! स्टेशनसारखी वर्दळीची जागा—पण आवाज बंद. गाड्या लांब जाऊन थांबत, शिट्टी न देता सुरू होत—सारा आवाज जणू गोठून गेला होता. स्टेशनच्या परिसरात एक राजेशाही डबा 'सायडिंग'ला पडला होता, त्यात आठ-दहा माणसे अस्वस्थ मनाने भिरभिरत होती. असंख्य कॅमेरे त्या डब्यावरही रोखलेले होते. गावात, रशियात नव्हे सबंध जगात चर्चेचा एकच विषय होता... टॉलस्टॉय ! वयाच्या ब्यायशीव्या वर्षी गृहत्याग करणारा टॉलस्टॉय ! घरातून गुपचुप पळून गेलेला टॉलस्टॉय ! पत्नीशी आत्यंतिक मतभेद झाल्याने बाहेर पडलेला टॉलस्टॉय ! अॅस्टापोव्होच्या स्टेशनमास्तरच्या घरी मृत्युशय्येवर पडून अखेरच्या घटका मोजीत पडलेला टॉलस्टॉय !

टॉलस्टॉयला वाटत होते की आपण अज्ञातवासात आहोत. आपण कोठे आहोत. हे कुण्णा कुण्णाला माहीत नाही. सोन्याला—धर्मपत्नीला तर मुळीच ठाऊक नाही. केवढा प्रचंड गैरसमज ! प्रत्यक्षात सर्व जगाचे डोळे त्याच्यावर खिळलेले होते. पत्नी खालच्या मजल्यावर घोटाळत होती—तिला आत जाण्यास मज्जाव होता. टॉलस्टॉय ही व्यक्ती म्हणजेच अत्यंत महत्त्वाची बातमी बनून राहिली होती. कीर्तीच्या दाहक प्रकाशझोतातून त्याला कधीच दूर होता आले नाही. घरातून गुप्तपणे निसटला तरी कीर्तीचे वलय पाठलाग करीतच होते. तो जाईल तिथे कीर्तीचा सुगंध आधीच जाऊन पोहचलेला असायचा.

**नकोय् मला हे ! किती दडपण येतं मनावर ! जाऊं दे ना मला! कशाला त्रास घेता ? किती डॉक्टर्स ! मुले—मुली—अनुयायी...केवढी गर्दी गोळा झाली आहे, स्वस्थ पड् दे ना मला ! शेवटच्या घटकेला तरी !**

टॉलस्टॉयच्या मनातले हे विकल भावतरंग धाकट्या मुलीशिवाय—(साशाशिवाय) कोणाच्याही लक्षात येत नाहीत. ती बिचारी सतत उशापायथ्याशी घोटाळत असते. एका बाजूला टॉलस्टॉयचा 'कल्याण शिष्य' चेरेट्कॉव्ह आहे. ९ डॉक्टरांचा ताफा सतत औषधोपचार करण्यात गुंग आहे. टॉलस्टॉयची मुले वडिलांच्या काळजीत चूर आहेत. चोरपावलांनी दबकत दबकत येऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करीत आहेत. खोलीच्या दारांत सर्जिएंको हा अनुयायी कडक पहारा करतो आहे.

टॉलस्टॉयच्या आजारापायी सबंध रशिया हवालदील ! राजसत्तेला धाक ! लोकांच्या मनावर प्रेमाचे अधिराज्य चालविणारा हा दुसरा झार आसन्नमरण आहे. मृत्यूनंतर दंगेधोपे होतील का ? अंत्ययात्रा नीट पार पडेल का ? त्यासाठी काय काय खबरदारी घेणे आवश्यक आहे ? खारकेसारख्या वाळून गेलेल्या त्या शुष्क चंदनी माणसाचा धर्मसत्तेलासुद्धा धाक वाटतो. त्याने अखेर ऑर्थोडॉक्सचर्चला मान्यता द्यावी, धर्मविधी करवून घ्यावा म्हणून केवढी यातायात—अगदी लोचटपणे केलेली ! काही उपयोग झाला नाही. धर्माच्या स्वरूपातील कृत्रीम थोथांडावर टॉलस्टॉयचा मुळीच विश्वास नाही.

**खोल गेलेल्या आवाजात टॉलस्टॉय बिर्युकॉव्ह नावाचा अनुयायाला म्हणतो, "पोशा, माझे चरित्र लिहितो आहेस तू. होय ना ?"**

**"होय लिओ निकोल्विच् !"**

**"अरे मग मी जसा आहे, तसाच्या तसा त्यात दिसूं दे बरं. पोशा, अरे, मी खूप चुका केल्या आहेत...अगदी डोंगराएवढ्या ! त्यांच्याकडे दुर्लक्ष करून माझे चरित्र लिहिलेस,' तर ते बरोबर ठरणार नाही. माझ्या दोषांकडे दुर्लक्ष करू नकोस बरं. !"**

**"ठीक आहे, मी लक्षात ठेवीन. पण आपण बोलू नये...त्रास होतो ना ? शांत झोपा बर आता !"**

शांत झोप !

कशी येणार !

टॉलस्टॉयच्या सदसद्विवेकाला कधी डुलकी घेता येत नव्हती. सबंध जीवनाचा चित्रपट मनःश्चक्षूंपुढे उलगडत होता. किती काटेकोरपणाने प्रत्येक पाऊस टाकले होतं ! मनाला काबूत ठेवण्यासाठी किती आटापिटा ! किती तरी नीतीनियम—स्वतःच स्वतःवर घालून घेतलेले ! केवढे कठोर आत्मपरीक्षण ! सारासार विचार...धर्माच्या शुद्ध स्वरूपाची चिकित्सा...ईश्वरनिष्ठा...शत्रूंनासुद्धा प्रेमाने जिंकून घेण्याचे उदात्त तत्त्वज्ञान...अभिजात वाङ्मयनिर्मिती...सद्विचारांचे संकलन...पण तरीही मन शांत होत नाही. शिष्य आणि पत्नी यांच्या स्पर्धेपायी जिवाची कुतरओढ होते ! त्यांच्यांत भडकलेल्या द्वेषाग्नी-

मुळे घराचे घरपण जळून जाते–वेडयाच्या इस्पितळाची कळा येते त्या घराला. तिथे कसे राहायचे ? त्या निष्प्रेम वातावरणात आठवण येते ती आईची.

**आई तू ये ना ! मला जवळ घे...थोपट ! मला तुझ्या कुशीत यायचे आहे ग ! आई...**

होय ! ८० वर्षांपूर्वी जेमतेम दोन वर्षांच्या चिमुकल्या 'बेंजा-मिन्ला' सोडून देवाघरी गेलेल्या आईच्या कुशीत जाण्याची वेळ आली होती खरीच ! अन् प्रत्यक्षात धाकटी मुलगी – साशा विचारीत होती, 'पपा तुमची उशी सारखी करू ? पपा...सांगा ना...'

अंतरात्म्यावर नजर रोखलेल्या टॉलस्टॉयला लाडक्या लेकीचे ते हळुवार शब्द प्रथम ऐकू येत नाहीत...मृत्यूच्या पड्यावर रेलून तो स्वतःचा जीवितपट साक्षित्वाने पहातो आहे. उदात्त तत्त्वांवर श्रद्धा ठेवून केलेली अविश्रांत धडपड...अफाट लेखन...कोटयवधी रुपयांचा परोपकार...धर्म जागृती...युद्धविरामाचे तात्त्विक विवेचन या साऱ्यांसाठी अटीतटीने केलेल्या अट्टाहासाला अखेर कितीसा अर्थ उरेल ? दुबळा देह...अस्वस्थ मनाने घेतलेला सत्याचा वेध... विशिष्ट वैचारिक भूमिका...धर्मपुनीत जीवितपद्धती किती लोकांना समजेल ? प्रेमाच्या अमोघ शस्त्राने जग जिंकण्याचे अहिंसात्मक प्रभावी शस्त्र किती लोकांना पेलेल ? त्याला स्वतःला तरी ते पेलले का ? 'प्रेमाचा क्लोरोफॉर्म' देऊन पत्नीचे हृदयपरिवर्तन करता आले नाही....मग जगाला शहाणपणाच्या गोष्टी सांगायचा काय अधिकार ? पार्थिवाशी जखडून राहिलेल्या शुद्ध व्यवहारवाद्यांना आत्म्याची उदात्त भाषा कधी समजतच नाही का ?

**किती प्रश्न ! साऱ्या खोचक प्रश्नांनी टॉलस्टॉयच्या क्लांत मेंदूत फेर धरला आहे. डोळ्यांच्या काचा आढयावर स्थिरावल्या आहेत. त्यात नजरच नाही. भोवतालच्या सर्वांना परके करून टाकणारी ती शून्य भकास दृष्टी !**

मोठी मुलगी हळुवारपणे विचारते आहे, 'पपा, तुम्हाला आईला भेटायचे आहे का ?'

**काय उत्तर देऊ बेटा ? अग तुझी आई म्हणजे माझा प्राण आहे बरं ! किती उत्कृष्ट प्रेम केलंय मी तिच्यावर ? एकत्र गुंफूनि जीवित धागे अशी चार तपे गेली. पण आता मात्र तिचे दर्शनही नको. तिला माझी भाषा समजत नाही. जडालाच खिळून राहिली आहे ती. संपत्तीसाठी चाललेली तिची वखवख मला बघवत नाही. माझ्या पुस्तकांच्या प्रकाशनावर जास्तीत जास्त पैसा मिळविण्याची तिची धडपड ! छे छे ! संपत्ती हे सर्व पापांचे मूळ आहे असे सांगणाऱ्या पुस्तकांवर ती पैशाचे डोंगर उभे करते. केवढे भयानक विडंबन चालवले आहे तिने माझ्या विचारांचे ! खेरीज तिने मजवर केलेले आरोप खोटे–अश्लील–लज्जास्पद ! ते कसे सहन करू बेटा ? आता मला तिचे तोंडही पहायचे नाही. तिच्या कचाटयातून निसटण्या साठीच ना घर सोडले ? नको तिचे दर्शन...ती पहा...खिडकीच्या तावदानातून डोकावते आहे...बंद करा, दारे बंद करा...ती येतेय्... चला पळा...पाठलाग करतेय् ती...पळा...**

खिडक्यांची दारे बंदच असतात. वडिलांच्या समजुतीसाठी मुली खिडकीला ब्लँकेटचा पडदा लावतात–काचा बंद ! आता त्या महा-मायेचे दर्शन घडणार नाही अशी टॉलस्टॉयची खात्री पटते. धाकटी साशा हळूच विचारते, 'पपा, औषध घेता ना ?'

**'नको ग साशा...अग बाहेर हजारो दीन-दुबळयांना तुमच्या मदतीचा हात हवाय, अन् तुम्ही मात्र एकटया लिओ निकोल्विच-मध्येच गुंतून पडला आहात !'**

मुली पटापट टॉलस्टॉयच्या तोंडचे शब्द टिपून ठेवतात. स्टेशन मास्तरांच्या घरात उच्चारला जाणारा प्रत्येक शब्द चार-पाचजणांच्या दैनंदिनीत उतरविला जातो. बारीकसारीक तपशिलाची शब्दबद्ध नोंद होते. अनुयायी व डॉक्टरांची धडपड–इंजेक्शनस्–स्पंजिंग–टेंपरेचर–इ. हजार प्रकार टॉलस्टॉयला तत्त्वतः मुळीच आवडत नाहीत.

**त्याच्या मनात विचार येतो, अरे कशाला धडपडता ? प्राणांचा पंछी उडून जातो आहे... घेऊ दे ना त्याला झेप ! का असे पकडून ठेवता ? नकोय मला ते अवडंबर ! खोल आवाजात त्याच्या तोंडून शब्द येतात, 'शेतकरी...ते कसे मरतात ?'**

टॉलस्टॉय जन्मतः काउंट होता. पण प्रेम होते ते अश्राप शेत-कऱ्यांवर. त्यांच्या सुखासाठी वर्षानुवर्षे धडपड चाललेली होती. सतत व्यर्थतेत विरून जाणारी धडपड ! कोणाला त्याचा खरा अर्थ कळले-लाच नव्हता. लोक वेडयांत काढीत होते. किती संपन्न जीवन वाटयाला आले होते ! पिढीजात श्रीमंती...उच्च शिक्षण...सैन्या-तला पराक्रम...साहित्याच्या क्षेत्रातले विस्मयजनक कर्तृत्व... धर्माच्या शुद्ध स्वरुपाची आमूलाग्र चिकित्सा...शिक्षणक्षेत्रातले मूल-गामी प्रयोग...ईश्वरनिष्ठा... तरीही धर्मबहिष्कृत ! साऱ्या अनु-भवाची गोळाबेरीज केवढी निराशाजनक होती ! अनुयायी डोईजड झालेले. आपल्या खाजगी जीवनातले निर्णयसुद्धा घेण्याचे स्वातंत्र्य नाही. अनुयानांना आपली प्रतिमा बरोबर समजलीच नाही. पत्नीने तर चक्क विपर्यास केलेला. सतत भांडणे...रागवारागवी...फार्स... जीव देण्याच्या धमक्या...भलतेसलते आरोप...अन् ते आरोप रोजच्या रोज दैनंदिनीत टिपून ठेवण्याचा चमत्कारिक प्रामाणिक-पणा ! सोन्याबरोबर चार तपांचा सहवास असूनही तिच्या दृष्टीने 'तो वेडा...दुष्ट...हृदयशून्य...कपटी...आणखी काय वाटेल ते !

अन् मुले ? त्यांना तरी वडिलांविषयी आदर होता का ? विश्व-शांतीच्या ऋचा रचणाऱ्या या महर्षींची मुले वडिलांना कितपत मानीत होती ? का त्यांना तो ब्रदर्स कॅरेमेझॉव्ह मधील बापाची प्रति-कृती वाटत होता ? काही सांगता येत नाही. पोटच्या पोरांचे प्रताप पाहून कपाळावर हात मारून घेण्याची वेळ होती. तत्त्वज्ञानापेक्षा शास्त्राचे महत्त्व अधिक आहे असे मत मांडून वडिलांना तात्त्विक शह देणारा सर्जी...उधळया इल्या...बापाच्या कीर्तीपायी आपल्या लेखन कलेचा प्रभाव पडत नाही म्हणून वडिलांवर सतत असंतुष्ट असलेला लिओ...टॉलस्टॉयच्या युद्धविरोधी तत्त्वज्ञानाला हरताळ फासण्याच्या एकमेव उद्देशाने लष्करात भरती झालेले धाकटे दोघे मुलगे – अण्ड्री, मायकेल...सर्वांनी वडिलांची मते खुंटीवर टांगून ठेवून वागायचा कट केला होता काय ? सर्वांना वडिलांच्या मृत्युपत्राविषयी जिज्ञासा !

संपत्तीची लसलस ! मृत्युपत्रावरून भांडणे ! अपरिग्रहाच्या तत्त्वज्ञानाचे अटीतटीने विवेचन करणाऱ्याच्या घरात संपत्तीची ही वखवख ! " बाप आहे म्हणून सोडून देतो, नाही तर या म्हाताऱ्याला फासावर लटकविला असता " हे उद्‌गार खुद्द पोटच्या पोराचे ! दोघी मुलींनी वडिलांच्या इच्छेविरूद्ध लग्ने केलेली. अगदी काळजाचा घड मानलेल्या लाडक्या माशाची सुद्धा लग्नाच्या बाबतीत बुद्धी फिरली होती. धाकटी साशा हाच काय तो एकमेव आधार ! साशा...

ती वडिलांची दाढी हळुवार हाताने विंचरून देत होती. डोळ्यातले पाणी निपटीत तळमळून विचारीत होती, 'पपा, काय देऊ तुम्हांला? चहा घेणार ?...पाणी देऊ का थोडेसे ? सांगा ना पपा...असे का अस्वस्थ दिसता ? काय हो हवे ?'

काय सांगायचे पोरीला ? बयो–आता तुझ्या पपाला काही नको आहे बरं ! सारी श्रेये पाऱ्यासारखी हातुन निसटून गेली आहेत. मनात नुसती उदासी ! केवढी प्रचंड विफलता ! घरात...आणि बाहेरही ! अग बेटा, माझ्या शब्दासाठी अनेकांनी हौतात्म्य पत्करले. सैबेरियाच्या भीषण तुरुंगात आपल्या उमलत्या तारुण्याचे वाळवण घातले ! मी मात्र घरात ऐशारामात राहिलो. सर्वांचा टीकाविषय बनलो.

घराचा सूर बदलता आलाच नाही. सबंध जगाने माझा ८० वा वाढदिवस साजरा केला. केवढी बिरुदावली ! महात्मा – महामानव –महर्षी–संत–कुलावंत–तत्त्वज्ञ–धर्मज्ञ–शिक्षणशास्त्रज्ञ !...या साऱ्या कीर्तीच्या कोलाहलातून मला सय येते ती हुतात्म्याची !

हुतात्म्यांच्या आठवणीने टॉलस्टॉयचे डोळे डबडबतात – ड्रुझ्‌झिनच्या आठवणीने तर हुंदके आवरत नाहीत.

ड्रुझ्‌झिन...एक साधा शिक्षक...
टॉलस्टॉयच्या विचारांनी भारावलेला...
सक्तीच्या लष्करभरतीस ठाम नकार देणारा...
त्यासाठी तीन वर्षे अंधार कोठडीची सजा भोगणारा...
दोन वर्षातच क्षयासारख्या रोगाने मृत्यूच्या दारात खेचला गेलेला...

अखेर डॉक्टर त्याला विचारतात,
'किती वर्षे तुरुंगात आहात ?'
'झाली दोन वर्षे'
'दोन वर्षे एकांतात व अंधारकोठडीत राहून खूप त्रास झाला असेल नाही ?'
'तसं काही नाही, सारे ठीक चालले होते!'
'असे कसे शक्य आहे ? स्वातंत्र्य हिरावून घेतल्यावर ठीक कसे चालू शकेल ?'
'पण मी स्वतंत्रच होतो!'
'ते कसे काय ?'
'कोणताही विचार करण्याचे स्वातंत्र्य मला होतेच की !'

पाणिदार वृत्तीचा तो हुतात्मा मृत्यूच्या पडद्याआड जातो. हौतात्म्य पत्करतो – टॉलस्टॉयला मात्र ती संधी कधीच मिळत नाही. हिमालयाच्या उंचीचे व्यक्तिमत्त्व असणाऱ्या या महर्षींना हौतात्म्याची सुवर्णसंधी सतत नाकारली जाते. झार गप्प ! कारण तसा तो चलाख आहे. जनमानसावर प्रेमाचे अधिराज्य गाजविणाऱ्या या दुसऱ्या झारच्या अंगाला तो स्पर्श करू इच्छित नाही. कारण त्यामुळे जो लोकगंगेचा उद्रेक होईल, त्याला तोंड देण्याची राजसत्तेला हिंमत नाही. टॉलस्टॉयने राजसत्तेचे अक्षरशः वाभाडे काढले, सरकारची कृष्णकृत्ये जगाच्या वेशीवर टांगली तरी झार मूग गिळून गप्प ! ¤

सबंध जगभर टॉलस्टॉयचे ललितसाहित्य शिरोधार्य मानले जात होते, पण खुद्द लेखकाला त्या अभिजात साहित्याचे काडीमात्र कौतुक वाटले नाही. अभिजात वाङ्‌मयाच्या हस्तिदंती मनोऱ्यात शेतकरी कामकरी आणि बहुसंख्य लोक सुखाने रमतात का ? त्यापेक्षा छोटचा छोटचा परीकथा आणि लोकवाङ्‌मय अधिक चांगले नाही का ? भोळेभावडे श्रद्धाशील यात्रेकरू लोकवाङ्‌मयाची कथावस्तू किती सहजतेने पुरवता ! फक्त त्यांच्यासाठीच लिहायला हवे होते.

श्वास मंद होत चालला आहे. त्याला अधिक चालना देण्यासाठी डॉक्टर इंजेक्शन देतात. टोचून टोचून त्या जराजर्जर देहाची नुसती चाळण होते. अशा प्रकारे कृत्रीम उपचारांचा टॉलस्टॉयला तिटकारा ! तात्त्विक विरोध ! पण लक्षात कोण घेतो ? उपचार केल्यावर श्वासाची संथ लय पुनश्च सुरू होते. साहित्य महर्षींची विचक्षण नजर पुनश्च अंतरंगाकडे रोखून पहाते. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातल्या अनेक विसंगती खुपू लागतात.

पिढीजात काउंट ! पण शेतकऱ्यांची ओढ ! त्यांच्याशी तद्रूप होण्यात 'काउंट' ही पदवी आड येते ? हवी कशाला ती पदवी ? दिली भिरकावून ! घरात भरविलेल्या शाळेतल्या छोटचा छोटचा पोरांना तो सांगतो,

'मी काउंट-बिउंट कोणी नाही बरं का ! माझे नाव लिओ निकोल्विच ! चला आत...म्हणा गाणी...ऐका गोष्टी...काढा चित्रे चला खेळायला...घ्या खुरपी...चला शेतावर...काढा गवत...अरे जरा बाजूला व्हा ! नांगर धरलाय ना मी !'

श्रमांची प्रतिष्ठा ! दुसऱ्यांच्या श्रमावर नाही जगायचे ! पाप आहे ते. उपजाऊ श्रम केलेच पाहिजे–प्रत्येकाने घाम गाळला पाहिजे. मग तो राव असो किंवा रंक ! श्रम करण्यासाठी हवे ते शिक्षणही घेतले पाहिजे ! या मताच्या समर्थनासाठी टॉलस्टॉयने चांभाराची शिकवणी ठेवली होती. तो नेमाने यायचा, बूट बनविण्याची विद्या 'युद्ध आणि शांती'च्या लेखकाला शिकवायचा !

फार अवघड होती ती विद्या ! ग्रंथलेखनापेक्षाही अवघड ! पहिला जोड यास्नायातल्या म्हाताऱ्या मोलकरणीला शिवून दिला. किती अगत्याने तिने वापरला बरे ! पण श्रीमंताने लाडावलेली पोटची पोरे मात्र बापाने शिकवलेल्या बुटाला नाके मुरडीत होती. कोणीही ते बूट वापरायला तयार नव्हते. पोरांचे एकवेळ सोडा ! पण तो तो कविमित्र फेट ! त्याला चांगल जोडा शिवून दिला, तर त्याने त्यावर लिहिले– संपूर्ण टॉलस्टॉय–खंड १४ अन तो जोडा प्रदर्शनासारखा पुस्तकांच्या कपाटांत ठेवून दिला ! श्रमाची महती पटावी म्हणून एवढा उपद्व्याप केला, पण कोणाच्या डोक्यात फारसा

प्रकाश पडलाच नाही. एकटी मार्था डिमड् अपवाद ! मॉस्कोतल्या शाळेतली नोकरी सोडून यास्नायाच्या परिसरात झोपडी बांधून रहाणारी मार्था डिमड्. तिच्या झोपडीपुढे राजवाड्याची काय किंमत ? पण असला उदात्त आनंद घरातल्या एकाही व्यक्तीला घेता आला नाही. नेहमी ३६ नोकरांची वर्दळ ! आया–दाया–शिक्षक–स्वैपाकी–वाढपी–गडी–माळी–मोतद्दार...

मोतद्दार !

हाय ! टिमथी...! तारुण्यातल्या प्रमाथी वासनेची ती जिवंत निशाणी ! त्या अनौरस मुलाससाठी टॉलस्टॉयने काय केले होते ? ॲक्झीनियासारख्या अडाणी बाईच्या पोटी टॉलस्टॉयची वंशवेल रुजावी हा का त्या टिमथीचा गुन्हा ? सदसद्विवेकाची टोचणी अस्वस्थ करीत होती ! औरस मुलांना सांभाळायला एवढा लवाजमा. शिक्षकांचा ताफा ! अन त्याला बिचाऱ्याला काय ? ॲंड्रीसारख्या बेवकूब पण औरस मुलाच्या गाडीचे सारथ्य !

का असा वागलो मी ? वाडवडिलांचे अनुकरण ? पण ते समर्थन न्याय्य आहे का ? माझा विवेक वाडवडिलांपेक्षा अधिक सूक्ष्म नाही का ?

सदसद्विवेक सतत जागा रहावा म्हणून टॉलस्टॉयने केवढे परिश्रम घेतले होते ! आत्मपरीक्षक तक्षकासारखा सतत जागा होता. दैनंदिनीत आपल्या वर्तणुकीचे विश्लेषण–मूल्यमापन–आत्मपरीक्षा स्वतःवर लादून घेतलेले काटेकोर नीतीनियम–त्यापासून तिळमात्र ढळले तरी आत्मपरीक्षणात स्वतःची घेतलेली कडक हजेरी ! अन् तरीही मनाचे ओढाळ जनावर ठाणबंद करता करता जीव रंजीस आलेला होता. वासना आवरणे महान दुर्घट होते. स्वतःशी प्रामाणिक रहाणे ही गोष्ट अत्यंत अवघड होती–पण त्यासाठीच तर दैनंदिनीत सतत अट्टाहास केला होता...जवळची संपत्ती गरिबांना वाटून टाकण्यासाठी किती आटापिटा करावा लागला होता. पत्नीचा असल्या दानधर्मांस विरोध ! तरीही दानधर्म, गरिबांना आणि दुष्काळग्रस्तांना सढळ हातांनी मदत दिली जात होती. १५००० डुखोबोर लोकांना कॅनडाला पाठविण्यासाठी एका कादंबरीचे अपरंपार मानधन दिलेले होते. हजारोंना मदतीचा हात देणारा टॉलस्टॉय, प्रतिकर्ण अशी ख्याती...

या विचाराने टॉलस्टॉयचे डोळे भरून येतात. कसली मदत.. ? कसला प्रतिकर्ण... ? नाही हो नाही ? एक असा प्रतिभावंत लेखक होता, की त्याला समव्यवसायी म्हणून तरी निदान मी मदतीचा हात पुढे करायला हवा होता. डोस्टोयव्हस्की...भुकेकंगाल...कर्जात बुडालेला...त्याच्या हातातोंडाची गाठ काही पडत नव्हती. अक्षरशः उपाशी पोटी त्याने ' क्राइम् ॲण्ड पनिशमेंट ' लिहिली...सारे माहीत होते मला. पण नाही केली मदत ! डोळ्यावर कातडे ओढून दुर्लक्ष केले. दुस्वास ? नाही ! स्पर्धा ? शक्य आहे !. तरीसुद्धा फाशीच्या खांबावरून मृत्यूला झुकांडी देऊन आलेल्या प्रतिभासंपन्न लेखकाची काहीच दाद घ्यायची नाही ? ती बोच आहे. सारखी सलते आहे .. अखेर डोस्टोयव्हस्की मरून गेला. सबंध जन्मात कधीं त्याचे तोंड पाहिले नाही. दोघे धर्मनिष्ठ ! दोघे श्रद्धाशील...पण मूकस्पर्धा ! उत्तुंग नैतिक उंची गाठल्यावरही स्पर्धेचे हीण नाही जाळून टाकता आले ! डोस्टोयव्हस्की गेल्यावर किती जीव हळहळला ! पण उपयोग काय ?

उपयोग.. खरेच ! साऱ्या उदात्त तत्त्वांचा असा पार्थिव उपयोग कधी दाखवून देता येतो का? सत्य, अहिंसा, अप्रतिकार, सद्सद्विवेक, श्रमांची प्रतिष्ठा, धर्माचे शुद्ध स्वरूप, ईश्वरनिष्ठा या साऱ्या मूलभूत मूल्यांचा व्यावहारिक उपयोग काय सांगणार ? सर्वजण जडवादाची बेडी अडकवून पार्थिवाशी खिळून आहेत. युद्धबंदीसाठी केलेले विवरण कितपत परिणामकारी होईल ?

क्रिमियन् युद्धातला नरमेध लोक विसरतील का ?

असंख्यांना मिळालेली वीरगती ! हजारोंनी जायबंदी झालेले जवान–तुटलेले हातपाय–आर्त किंकाळ्या–सरकारी यंत्रणेतून अतोनात पैसा खाणारे पुरवठा खाते–खोटे रिपोर्टस् लिहिणारे शहाजोग अधिकारी...कोणाचाच सद्सद्विवेक जागा नव्हता. उलट त्याला गाडून टाकून चैन करण्यातच लोकांना गंमत वाटत होती.कोणाच्याही हृदयात बोच नव्हती. आत्मपरीक्षण नावाची काही मानसिक प्रक्रिया असते याची जाणीवच नव्हती.

ती जाणीव सत्ताधाऱ्यांच्या मनात निर्माण करण्यासाठी कितीतरी तात्त्विक ग्रंथसंपत्ती निर्माण केली होती. द्यायचा तो वारसा जगाला देऊन टाकलेला होता. लोक सदुपयोग करतील अशी खात्री नव्हती, पण आशा मात्र होती. अखेरचा श्वास लागला होता. तोंडातून अधुरे शब्द येत होते...

' सत्य...मला त्याची सर्वांत महती वाटते... '

टॉलस्टॉय अखेरपर्यंत सत्य व विवेक यांची साधना करीत होता. चेरेट्कॉव्ह सायकल् ऑफ रीडिंगमधून सुविचार वाचून दाखवीत होता. टॉलस्टॉयचे नेत्र पैलतीरी लागलेले होते. मृत्यूच्या दरीची आता धास्ती वाटत नव्हती...मृत्यू ! त्याचीसुद्धा केवढी प्रदीर्घ तयारी करावी लागली होती ! गेली तीस वर्षे मृत्यूच्या धास्तीने तो बेचैन झाला होता. आता ती वस्तुस्थिती शांतपणे स्वीकारायची होती. मृत्यूपूर्वी मृत्युपत्र ! घरातल्या मंडळींना चोरून केलेले...तेही एक प्रचंड कटच होता...धर्मपत्नीला वंचित करण्याचा...केवढी पत्रापत्री! केवढी गुप्तता ! मृत्युपत्राची आठवण येताच सर्वांग शहारते. तो सारा मनस्ताप विसरण्यासाठीच तर गृहत्याग केला होता ! एकांतात जाऊन हिंदू संन्याशासारखे ईश्वरचिंतनात निमग्न व्हायचे होते. त्या आदर्शाची केवढी तळमळ ! ...२५ वर्षापूर्वीपासूनच लागून राहिलेली!

आता सारा एकांतच होता. मनःश्चक्षूपुढे ईश्वरी अंशाचे तेजोमय अस्तित्त्व जाणवत होते...घरघर लागली...बेशुद्धी ! सोन्या आली–उशाशी बसली...समजलेच नाही . सारे चित्त ईश्वरी प्रकाशाकडे केन्द्रित झाले होते. डोळ्यांच्या उघड्या कावातून ईश्वरी प्रकाश झिरपत होता. देहाचे जीर्ण वस्त्र फेकून टाकून टॉलस्टॉयची जीवनज्योत अखेर मावळली. तो दिवस होता ७ नोव्हेंबर १९१०–सकाळी पावणेसातची वेळ. डॉ. डुशेन्ने टॉलस्टॉयचे डोळे मिटले...एक अस्वस्थ आत्मा अनंतात विलीन झाला !

अखेरपर्यंत टॉलस्टॉय दोन पातळ्यांवर जगला. जगाच्या दृष्टीने

त्याची प्रतिमा अत्यंत उदात्त होती. पण त्याच्या स्वतःच्या दृष्टीने त्याचे मूल्यमापन फार वेगळे होते. नुसतेच वेगळे होते एवढेच नाही, तर ते सबंध जगाच्या नजरेसमोर यावे म्हणून प्रामाणिकपणे शब्दबद्ध केले गेले होते.– स्वतःच्या दैनंदिनीमधून ! त्यामुळे जगातील एकूणएक चांगल्या आणि वाईट विशेषणांचे धनी होण्याचे विचित्र भाग्य टॉलस्टॉयच्या नशिबी आले. जे दुर्गुण टीकाकारांच्या सूक्ष्म नजरेतून निसटले ते कठोर आत्मपरीक्षणात टॉलस्टॉयने स्वतःच स्वतःला बहाल केले. अखिल विश्वाच्या कोनाकोपऱ्यातून टॉलस्टॉयवर स्तुतिसुमनांची वृष्टी होत होती. परंतु त्या स्तुतिसंभाराला यत्किंचितही न भाळता आपण खरोखरीच व्यक्ती या दृष्टीने कसे आहोत त्याचे आत्मपरीक्षण टॉलस्टॉय करीत होता.

विश्वशांतीचे मार्गदर्शक, अलौकिक प्रतिभासंपन्न साहित्यिक, दलितांचे कैवारी, सत्याचे एकनिष्ठ उपासक, अभिनव शिक्षणशास्त्रज्ञ, अध्यात्मवादी, विश्वबंधुत्वाचा संदेश देणारे महर्षी, सत्याग्रह व असहकार या शांततामय प्रतिकाराचे तत्त्वज्ञान मांडणारे तत्त्वचिंतक,... आणि काहींच्या मते मात्र...स्वप्नात विहरणारा, व्यवहारशून्य, चक्रम असा होता काउंट लिओ निकोल्विच् टॉलस्टॉय. त्याच्या वरील सर्व प्रतिमा जगाच्या इतिहासात अजरामर व्हाव्यात इतक्या प्रभावी आहेत. कन्फ्यूशिअसने म्हटल्याप्रमाणे मनुष्य हा काही केवळ स्वर्गाचाच नव्हे तर पृथ्वीचाही पुत्र असतो. वाल्याचा वाल्मिकी झाला, तरी वाल्मिकीतला वाल्या काही पूर्णपणे नाहीसा होत नाही. तो जागाच असतो, आणि अवसर मिळेल तेव्हा डोके वर काढण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहात नाही. पार्थिव वाल्याला संपूर्णपणे नाहीसा करणारा वाल्मीकी फक्त पुराणातच आढळायचा ! वास्तवात असे ध्येयवादाने जीवन बदलून टाकणारे काही वाल्मीकी असतात, की ज्यांच्या ठिकाणी वाल्याचे अस्तित्व कोठे न कोठे तरी रेंगाळत राहिलेले असते. ऋषी म्हणून ते वंदनीय खरे, परंतु अखेर तीही माणसेच होती. सत्त्वरजतमाच्या त्रिविध प्रकृतीचे मिश्रण त्यांच्याही स्वभावात असणे अपरिहार्य होते. हे विसरल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे संपूर्ण आकलन होऊ शकत नाही.

काउंट लिओ निकोल्विच् टॉलस्टॉय म्हणजे सत्य, प्रेम, त्याग, शांती व सेवा या उज्ज्वल गुणांची पंचरशी मूर्ती होती. त्या मूर्तीच्या मागे उदात्ततेचे वलय झगमगत होते. साहजिकच या गुणसंपन्न महापुरुषाचे व्यक्तिमत्त्व हा सबंध जगाच्या कुतूहलाचा विषय ठरला. टॉलस्टॉयची असंख्य भाषातून अक्षरशः अगणित चरित्रे लिहिली गेली. त्यांपैकी पुष्कळशा चरित्रातून प्रतीत होणारी प्रतिमा सलग, प्रत्ययकारी व वस्तुनिष्ठ नाही. कारण टॉलस्टॉयचे चरित्र लिहिणारा एकतर त्याचा भक्त तरी असतो, नाहीतर कट्टर विरोधक तरी असतो. त्यामुळे या अभिनिवेशपूर्ण चरित्रांच्या पलीकडे गेल्याशिवाय टॉलस्टॉय या व्यक्तीची ओळख पटणे दुरापास्त होऊन बसते.

अशावेळी मदतीस येतात ते असंख्य संदर्भग्रंथ, स्मृतिग्रंथ, दैनंदिन्या, पत्रे, आठवणीवजा टिपणे इ. हे सर्व ग्रंथ अत्यंत वाचनीय आहेत. त्यातून टॉलस्टॉयच्या विकसनशील व्यक्तिमत्त्वावर झगझगीत प्रकाशझोत पडतो. त्यामुळे टॉलस्टॉयची अध्यात्मिक वाटचाल स्पष्ट जाणवते. आपली दैनंदिनी लिहिताना टॉलस्टॉयच्या सदसद्विवेकाने क्षणभरही डुलकी घेतलेली नाही. आत्मपरीक्षण व तत्त्वान्वेषण याचाच सारखा वेध घेतलेला दिसतो. जन्मभर पराकाष्ठेच्या प्रामाणिकपणाने टॉलस्टॉयने जे आत्मपरीक्षण केले, त्यालाच उद्देशून रोमाँरोलाँने त्याला 'अखिल विश्वाचा सदसद्विवेक' म्हणून गौरविले.

या गौरवाने डोळे मिटल्यावर काउंटेस सोफाया अॅण्ड्रीव्हेंना– टॉलस्टॉयची धर्मपत्नी–हिची दैनंदिनी वाचावी. त्यातले घरचे आहेर एका वेगळ्या दृष्टीने स्तिमित करणारेच आहेत. नवऱ्याची पद्धतशीर नालस्ती करण्याचे काम त्या एकनिष्ठ अर्धांगीने अगदी उत्साहाने आणि सातत्याने केले आहे. तिचे काही आरोप तर इतके विकृत आहेत, की ते लिहिण्यास तिच्याशिवाय कोणाचीही लेखणी धजावणे शक्य नाही. 'बाप आहे म्हणून सोडून देतो, नाहीतर केव्हाच या म्हाताऱ्याला फासावर लटकावला असता !' हे उद्‌गार सूर्यपोटच्या शनीश्वरांचे ! ही झाली घरची कथा ! बाहेरही विरोधक होतेच. टॉलस्टॉयला चक्रम, वेडसर, व्यवहारशून्य, अर्धवट (हाफमॅड) म्हणणाऱ्यांची संख्या मुळीच उपेक्षणीय नाही. किंबहुना ते सिद्ध करण्यासाठीच ग्रंथरचना करण्यास सरसावलेले लोकही पुष्कळ आहेत !

बरेवाईट श्रेय देणारी ही दोन टोके पाहिली म्हणजे अभ्यासक स्वस्थ बसू शकत नाही. टॉलस्टॉयच्या व्यक्तिमत्त्वाचे खरेखुरे अंतःस्रोत शोधण्याचे वेध लागतात, जिज्ञासा जागृत होते. अगणित ग्रंथातून सत्याचे कण कण पारखून घेऊन टॉलस्टॉयच्या वास्तव प्रतिमेचे आलेखन करण्याचा मनाला छंद जडतो.

वयाच्या पन्नासाव्या वर्षाच्या आसपास टॉलस्टॉयमध्ये अध्यात्मिक परिवर्तन झाले. तत्पूर्वीचा टॉलस्टॉय व अध्यात्मिक परिवर्तनानंतरचा टॉलस्टॉय यात जमीन-अस्मानाचे अंतर होते–अनेक प्रकारच्या विसंगती होत्या. पिढीजात श्रीमंत असूनही तो श्रमजीवी शेतकऱ्यासारखा जगला. धार्मिकदृष्ट्या बहिष्कृतीचा छाप बसला तरीही तो पराकोटीचा ईश्वरनिष्ठ राहिला. पूर्ववयात उनाड, उधळे, व्यसनाधीन जिणे जगूनही उत्तरायुष्यात त्याने नीतीचा आदर्श निर्माण केला. तारुण्यात राष्ट्रासाठी युद्धाच्या खाईत उतरलेल्या या राष्ट्रनिष्ठ जवानाने पुढे राष्ट्र ही कल्पनाच उधळून टाकली. त्याने जे अभिजात साहित्य लिहिले, ते जगाला शिरोधार्य वाटले तरी त्याला उपेक्षणीय वाटले...

या झाल्या वरवरच्या विसंगती ! याहूनही खोल आणि अधिक प्रखर अशा विसंगती टॉलस्टॉयच्या मनोरचनेतच होत्या. जोवर तो केवळ कलावंत साहित्यिक म्हणून जगत होता, तोवर...म्हणजे वयाच्या ४०-४५ वर्षांपर्यंत त्याच्या व्यक्तिजीवनात कोणतेही उद्रेकी किंवा लक्षणीय असे जीवननाट्य नव्हते. संसारी गृहस्थ आणि कलावंत या दोन भूमिकात जेवढा आंतर्विरोध सामान्यपणे संभवतो (आणि तोही फार नाट्यपूर्ण असतोच !) तेवढाच होता...व तो सुसह्य होता. नंतर मात्र जेव्हा ख्रिश्चिॲनिटीचा आमूलाग्र अभ्यास करून त्याने तत्त्ववेत्याची भूमिका घेतली, मानवतेच्या अपार करुणेमुळे जीवनाचा सूर बदलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा अभावितपणे टॉलस्टॉय अनुयायांच्या गोतावळ्यात सापडला. सुसंवद्ध व्यक्तिमत्त्वात चमत्कारिक आंतर्विरोध सुरू झाला. गृहस्थ, कलावंत, धर्मवेत्ता, उपदेशक, तत्त्वज्ञानी, राजसत्तेचा व धर्मसंस्थेचा प्रखर विरोधक, शिक्षणशास्त्रज्ञ इ. विविध भूमिका एकमेकांशी समांतर नव्हत्या.

त्यांनी एकमेकांना छेद देण्यास सुरुवात केली. इतक्या सर्व तलवारी एकाच व्यक्तिमत्त्वाच्या म्यानात राहणे अवघड होऊन बसले. कुटुंब आणि अनुयायी यांची रस्सीखेच सुरू झाली. मधल्या मध्ये टॉलस्टॉयचे मात्र अतोनात हाल झाले! मनावर असह्य ताण पडला.

कुटुंबप्रमुख व तत्त्ववेत्ता या भूमिका एकमेकांना सरळ छेद देऊन गेल्या त्यामुळे टॉलस्टॉयचे व्यक्तिजीवन अत्यंत करुणास्पद झाले. अखेर वयाच्या ८२ व्या वर्षी जरत्काऱ्सारख्या अवस्थेत, थरथरत्या पावलांनी त्यांनी गृहत्याग केला. त्या दिशाहीन प्रवासातच टॉलस्टॉयला मृत्यू आला.

आश्चर्याची गोष्ट ही की टॉलस्टॉयच्या अध्यात्मवादी, सत्यनिष्ठ, शांततापूर्ण प्रतिकाराच्या तत्त्वज्ञानाची पुसटशी खूण सुद्धा त्याच्या मायदेशात उरली नाही. त्या तत्वज्ञानाचा वारसा मिळणारा एकच एकलव्य निघाला. तो म्हणजे मोहनदास करमचंद गांधी. गांधीजींनी आचरणात आणलेले सर्व तत्वज्ञान टॉलस्टॉयच्या ग्रंथसंपदेत आधीच उद्‌घोषित झालेले होते, त्याचे प्रयोगही झालेले होते. गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली भारताने ब्रिटिश सत्तेशी जो लढा दिला, त्यासाठी सत्याग्रह, असहकार व शांततापूर्ण प्रतिकार ही जी अहिंसात्मक शस्त्रे वापरली ती हिंसक शस्त्रांपेक्षांही अधिक प्रभावी ठरली. टॉलस्टॉयच्या लिखाणातून स्फूर्ती घेऊन भारतातल्या या एकलव्याने शिष्यादिच्छेत्पराजयम् अशा तोडीचा पराक्रम गाजवून दाखविला. तो पहायला महर्षी टॉलस्टॉय जगते, तर त्यांच्या मनाला केवढा तरी दिलासा मिळाला असता.

जागतिक शांतीच्या ऋचा रचणारा, महात्मा गांधींना स्फूर्तिस्थानी असणारा हा महामानव होता तरी कसा? माणूस म्हणून तो कसा जगला, कसा वाढला, केवढी झेप घेतली?...

टॉलस्टॉयच्या विकनशील व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे ही कधी न संपणारी प्रक्रिया आहे. एक तर त्याचे व्यक्तिमत्त्व अतिशय गुंतागुंतीचे आहे, अनेक प्रकारच्या विसंगतीतून सतत वर्धिष्णु होत राहिलेले आहे. त्याविषयी निरनिराळ्या भाषांतून अपरंपार ग्रंथनिर्मिती झाली आहे, होत आहे. ते सर्वच्या सर्व वाङ्मय वाचणे ही गोष्ट मानवी सामर्थ्यापलीकडची आहे. माझ्या मर्यादित शक्तीनुसार टॉलस्टॉय यांचे वाङ्मय, चरित्रे, दैनंदिन्या, पत्रे, असंख्य स्मृतिग्रंथ आणि इतर संदर्भग्रंथ, समकालिनांची चरित्रे यांच्या अभ्यासातून टॉलस्टॉयचे व्यक्तिमत्त्व समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. माझी भूमिका विभूतीपूजकाची नाही. तशी भूमिका खुद्द टॉलस्टॉयला कधीच आवडली नसती. माझी भूमिका अभिनिवेशशून्य जिज्ञासूची आहे. टॉलस्टॉय हा माणूस म्हणून कसा जगला याचा मी शोध घेतलेला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे, ते शेवटी वाचकांनीच ठरवायचे आहे. [समाप्त]


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे<br>श्री. ग. माजगावकर | १–०० |
| २. | पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ३. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ४. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ५. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ६. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ७. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७–०० |
| ८. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| ९. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |
| १०. | पूर्णिया | अनिल अवचट | ६–०० |
| ११. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १२. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | ८–०० |
| १३. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १०–०० |
| १४. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १०–०० |
| १५. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १६. | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४–०० |
| १७. | अग्निपुत्र | वसंत पोतदार | १४–०० |
| १८. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५–०० |
| १९. | व्होल्गा जेव्हा लाल होते | वि. स. वाळिंबे | १८–०० |

आगामी प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| २०. | शतपावली | रवींद्र पिंगे |
| २१. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर |
| २२. | मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |
| २३. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे |

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३० दूरध्वनी : ५७३५९



# एक खपराच्या तुकडा

**म. अ. दळवी**

या शतकाच्या दुसऱ्या दशकात न्यूयॉर्कमध्ये मोटारींचा सुळसुळाट होऊ लागला. बग्गा आणि घोडागाड्या अजूनही नाहीशा झाल्या नव्हत्या. पण वेगवेडे आणि बेजबाबदार मोटार चालक नुकतेच आपलं अस्तित्व दाखवू लागले होते. लोक अशांबद्दल साशंक होऊ लागले होते. अद्याप स्वयंचलित वाहनधारा आणि नियम अंमलात नव्हते. वापरात ते येण्याचा प्रश्न उद्भवला नव्हता. अशी वाहनं अरिष्टांसारखी वाटू लागली होती. पण ती मोठ्या प्रमाणात उपयोगात येतील; त्यासाठी अधिनियम करावे लागतील आणि संरक्षक दलावर एक निराळी जबाबदारी पडेल असं उघड बोलण्याचं धाडस न्यूयॉर्कमधील पोलीस शाळेचे एक प्रमुख प्रशिक्षक बोलून दाखवीत. काही त्यांना अशा उद्गाराबद्दल हसत. त्यावेळी तरी अशा टीकाकारांची संख्या मोठी होती.

पण एक दिवस लौकरच उजाडला या प्रशिक्षकांस वरिष्ठांनी बोलावून घेतलं. आणि त्यांना एका अपघाताचा शोध करण्याची जबाबदारी देण्यात आली. कारण त्यांचा या क्षेत्रातील अनुभव मोठा होता. ज्ञान प्रगल्भ होते.

आदल्या रात्री आरोग्यदलाचे एक पर्यवेक्षक आपला रात्रीचा आपल्या हद्दीचा दौरा करून घरी परतत होते. 'चला; सुटलो एकदाचा! एक दिवस तर लोटला!' असा त्यांनी सुस्कारा सोडला असेल नसेल तोच भरवेगानं एक मोटारगाडी आली. रस्त्याच्या कुंपणाशी फुगडी खेळून त्या बगीला तिनं उडवून दिलं. पर्यवेक्षक फेकले गेले. घोडा बुजला होता. पण मोटारगाडी मात्र भरधाव निघून गेली होती. ती थांबली तर नाहीच; पण हवेत विरल्यासारखी नाहीशी झाली होती.

जवळच काही अंतरावर गृहसंरक्षण दलाचा एक शिपाई गस्त घालीत होता. मोटारीच्या चाकांचा तीव्र कचकचाट, तिचा वेग आणि कुणाचं तरी कण्हणं यामुळं एकदम जागरूक होऊन तो शिपाई तेथे जलद गतीनं आला. प्रथम त्यानं कण्हणाऱ्या पर्यवेक्षकांस ऋग्णालयात पाठविण्याची तयारी केली व त्यांना रवाना केलं. नंतर घोड्याला आपल्या गुरफटलेल्या लगामातून मोकळं करून त्याची व्यवस्था केली. नंतर बगीचा चक्काचूर झाला होता तेथे पुराव्याचे अवशेष कोणते. सापडतात का हे पहावयास सुरवात केली. तेथे जे जे काही सापडलं ते ते गोळा करून आपल्या अहवाला बरोबर पाठवून दिलं.

रस्त्यावर अपघात घडला होता. अपघात करणारा पळून गेला होता. रात्रीची वेळ असल्यामुळं पुराव्यासाठी कुणी साक्षीदार उपलब्ध नव्हते. आणि आरोग्य खात्यातील त्या पर्यवेक्षकांचं ऋग्णालयाच्या वाटेवर निधन झालं होतं, ज्यानं हा अपघात केला त्यावर

मानवी मृत्यूबद्दल काही कारवाई करता येईल का? या प्रश्नाच्या उलगड्यासाठी त्यांच्याकडं हा गुन्हा सोपविण्यात आला. त्यांची मतं या बाबतीत स्पष्ट होती. ज्ञान आणि अनुभव सुयोग्य होता. त्यांनी ते आवाहन स्वीकारलं होते. त्या काळी ते संरक्षक दलासाठी एक आवाहनच होतं. त्यांचे प्रयत्न अयशस्वी झाले असते तर? पण त्यांच्याकडून संरक्षक दलासाठी एक नवा इतिहास घडावयाचा होता. तो या आवाहनातून घडला गेला. सरंक्षण दलास स्वयंचलित गाड्यांचं स्वतःचं दल उभारावं लागलं नि अपघात हाताळण्याची स्वतंत्र जबाबदारी स्वीकारावी लागली.

त्यांनी त्वरित आपल्या कार्यास सुरुवात केली. बगीचे अवशेष त्यांनी तपासून पाहिले. नंतर त्यांनी गोळा केलेले काचांचे तुकडे काळजीपूर्वक तपासून पाहिले. काही उलटसुलट करून पहाता त्यांना असं आढळलं की ते आरशांचे आहेत. आणखी विचार करून असं आढळलं की ते मोटारीच्या दिव्याचे आहेत. सर्व तुकडे लावून एक सहा इंच व्यासाचा आरसा आणि एक आठ इंच व्यासाचा दिव्याचा असे ते आहेत. पण ते कोणत्या गाडीचे आहेत? ती गाडी कोठे आहे? त्यांच्या जिज्ञासू वृत्तीनं सूक्ष्म तुकडे देखील लावून पहाणी करावयाचं ठरविलं. या प्रयत्नांना यश लाभलं. हक्कसुरक्षा क्रमांक व नोंदचिन्ह होतं ते आढळलं. चौकशीतील पहिलं पाऊल त्यांनी टाकलं. सार्वजनिक ग्रंथालयातून अशी नोंदचिन्हं कोणत्या कारखान्याची आहेत ही माहिती त्यांनी मिळविली. माहितीत असं समजलं की, तो कारखाना गेल्या चार वर्षांपासून तसल्या काचा बनवीत नव्हता. काही काळ यामुळं विरसाचा गेला. लाभलेल्या वस्तूत दुसऱ्या दिवशी सापडलेला एक रबराचा तुकडा होता. त्याला अनुसरून आकृत्या काढल्या गेल्या होत्या. त्यामध्ये तो चाकाचा असावा असं सिद्ध होत होतं. मध्यंतरी सर्व दुरुस्ती कारखाने व तेलपंप धुंडाळण्यात आले. पण विशेष लाभदायक अशी माहिती मिळाली नाही. बगीच्या चुरडलेल्या एका तुकड्यात काही रंगकण सापडले. भिंगातून परीक्षण केल्यानंतर असं आढळून आलं की ते राखी रंगाचे कण होते. तो रंग बगीचा नव्हता. तेव्हा मोटार राखी रंगाची होती हा निष्कर्ष निघाला. तो उपयुक्त असाच होता. त्यांच्या स्वतःजवळ मोटारी संबंधानं जी टिपणं आणि माहिती होती त्यावरून मोटार साधारणतः कोणत्या नमुन्याची असावी याचा कयास त्यांनी बांधला. त्याप्रमाणं मोटारगाड्यांवर पाळत ठेवण्याचा इशारा सर्व सुरक्षा दलास देण्यात आला.

माहिती मिळत होती पण हवी त्या गाडीची नव्हती. बुचळण्याचा क्षण आता आला होता. चौकशीत स्थिरता आली होती. त्यामुळं तर्कवितर्क यांना जागा मिळत होती. पण त्यांचे प्रयत्न जोमाने चालले होते. न जाणो तो मोटारमालक न्यूयॉर्क सोडून गेला असेल! शोधाचं क्षेत्र विस्तारीत करण्यात आलं.

तसं करण्यामुळं काहीसा फायदा झाला. जवळच्याच एका शहरात मोटारीच्या दुरुस्तीच्या एका कारखान्यात राखी रंगाची, त्या नमुन्याची आणि जिच्या तेलाच्या टाकीची दुरुस्ती व दिव्याची काच बसवून हवी होती अशी गाडी आली होती. पण सुरक्षा दलाचे अधिकारी येण्यापूर्वी दोनच दिवस मोटारमालकास तिचा ताबा देण्यात आला होता. संशोधनाचे परीश्रम घेऊन गाडीचा तपास तर लागला पण ती लाभली मात्र नाही. हा विरस त्यांना खूपच लागला. त्यातल्या त्यात समाधान होतं ते एकाच गोष्टीचं, की चौकशी योग्य मार्गानं चालली होती. वेळ तेवढी यावयाची होती.

त्या कारखान्यात उपयोगाची माहिती जी मिळाली तीमध्ये मोटारमालकाचा पत्ता, मोटारीचा क्रमांक आणि मालकाचं नाव होतं. पण त्या पत्त्यावर मालक नव्हता. तेथील आसपासचे लोकही तितकेसे मदत देण्यास उत्सुक नव्हते. त्या नावाचा इसम तेथे रहात असे पण काही दिवसापूर्वीच तो तेथून निघून गेला होता. तरीही चौकशी अधिकारी आपल्या शोधात येणाऱ्या व्यत्ययांनी नामोहरम झाले नाहीत. उलट मोटारमालकास आपण करीत असलेल्या चौकशीची चाहूल लागू नये म्हणून दक्षता बाळगण्याच्या सूचना संबंधित इसमांस देण्यात आल्या होत्या.

त्यांच्या प्रयत्नास एक दिवशी यश आलं! त्यांना हवी असलेली एक गाडी एका कारखान्यात आढळली. त्यांनी गाडीजवळ जाऊन सूक्ष्म तपासणी केली. आणि मालक येईपर्यंत ते शांतपणं प्रतीक्षा करू लागले. मालकास विशेष घाई नसावी. बराच वेळ लोटल्यानंतर तो तेथे आला. गाडीत बसला. तेवढ्यात ते पुढं झाले.

'आपण—?' त्यांनी नम्रतेनं विचारलं.

'होय! काहीसं तुसडं उत्तर आलं, 'आपणास काय पाहिजे?'

त्यांनी म्हटलं, 'मी एक पोलीस अधिकारी आहे. आपणास मला काही विचारावयाचं आहे!'

'ठीक आहे. विचारा! उडवाउडवीच्या स्वरात समंती देण्यात आली.

संभापणातून अपघाताच्या रात्री आपण अपघात स्थळी कधीच नव्हतो. अमूक ठिकाणी होतो वगैरे उत्तरं त्यांना लाभली त्यामुळं त्यांचं समाधान झालं नव्हतं. पण आपल्या संभाषणात त्यांचं लक्ष मोटारीच्या चाकाकडं पुन्हा गेलं. त्या चाकातून रबर थोडं फाटून बाहेर आलं होतं. संभाषण तसंच चालू ठेवून मोठ्या सावधानतेनं त्यांनी पुढं आलेल्या रबराचा तुकडा तोडून आपल्या खिशात ठेऊन दिला, अंमळशानं संभाषण संपविलं.

'झालं का?' मोटार मालकानं उतावीळ होऊन विचारलं. गाडी सुरू केली आणि तो निघून गेला. 'मूर्ख कोठले!' असे अस्पष्ट उद्‌गार काढून तो आपण कसं त्यांना चकवलं या समाधानात गुंग झाला.

ते त्वरित आपल्या कचेरीत आले. त्यावेळी त्या मालकाला अटक करण्याइतका सबळ पुरावा नव्हता. पण आता ते उत्सुक होते. त्यांनी आपल्या जवळच्या पूर्वीच्या रबराचा तुकडा व थोड्या वेळापूर्वी स्वतः मिळविलेला तुकडा प्रयोगशाळेत पाठवून दिला. कारण जर हे दोन्ही तुकडे एकाच घडणीचे असले तर त्यांना अटकेसाठी हवा असलेला पुरावा अधिकृत रीतीनं लाभणार होता.

काही दिवसानंतर त्यांच्या हाती रबराच्या तुकड्यांवरील अहवाल आला. 'होय ते तुकडे एकाच प्रकारचे आहेत.' असा शेरा अहवालावर होता. त्यांनी आपला अहवाल वरिष्ठास सादर केला आणि मोटार मालकास अटक करण्यासाठी आपल्या हाती सबळ पुरावा आहे असंही त्यांनी आता ठामपणं कळवलं. इतक्या दिवसांचे त्यांचे परिश्रम सफल ठरले होते, पण—

पृष्ठ ४२ वर




## उत्तरार्ध

: १० :

परंतु तिरस्कार करून भागण्यासारखं नव्हतं ! निगूडा वस्तीचा नेता होता. त्याची शक्ती अचाट होती. एकट्याने त्या शक्तीला आव्हान देण्याचे सामर्थ्य उदगामध्ये नव्हते. आणि सारी वस्ती निगूडाच्या पाठीशी होती. त्याचा अर्थ त्या वस्तीचे उदगावर प्रेम नव्हते; जीव नव्हता असा नव्हे. परंतु पहिला मान निगूडाचा होता. दुसरा उदगाचा. निगूडा नसला तरच उदगाला महत्त्व होते. आणि निगूडा नाही ही कल्पना करण्यास देखील कोणी धजत नव्हते.

तसे पाहिले तर उदगाचे देखील निगूडावर प्रेम होते. परंतु त्याच्या डोक्यात शिरलेली पूरियाची कल्पना त्याला मुळीच पसंत नव्हती !

परंतु उदगाची अशी नापसंती दिसताच निगूडा भयंकर चिडला. आणि त्याने रागावून मोठ्याने हाक मारली,

'उदगा !'

उदगा त्याच्या समोरच उभा होता. निगूडाच्या रागाचा पारा त्याच्या लक्षात आला ! त्याने आपली दृष्टी वर केली. आणि निगूडाच्या नजरेला नजर भिडविली, मग त्याला म्हणाला,

'काय म्हणतोस ?'

'पूरियाला हेरून काढली पाहिजे.'

'परंतु तिच्यावाचून आपल्या वस्तीचं काही अडत नाही !'

'वस्तीचं नाही, माझं अडतं.'

'पण त्याकरिता तू वस्तीवर संकट ओढवून घेत आहेस ?'

'हॅः त्या संकटाला तोंड द्यायची शक्ती या माझ्या छातीत आहे.'

—असे म्हणून त्याने आपली छाती फुगविली आणि पुढे म्हणाला,

'ती शक्ती माझ्या मनगटात आहे !'

—आणि त्याने आपल्या हाताची दोन्ही मनगटे उदगापुढे केली. आणि मुठी आवळल्या. त्याबरोबर त्याने दोन्ही दाढा एकमेकींवर गच्च आवळल्या. आणि कपाळावर आठ्यांचं जाळं उभं केलं ! पुनः दातओठ खात तो म्हणाला,

'बोल, माझ्याबरोबर येणार का नाही ?'

त्यावर उदगा काहीच बोलला नाही. त्याच्या असे मख्खपणे गप्प बसण्याचा अर्थ निगूडाच्या लक्षात आला. आणि त्यामुळे पहिल्यापेक्षा तो दुप्पट चिडला. मग एकदम ओरडला,

'भ्याड ! मुर्दाड !'

तसा उदगाही चवताळून उठला,

'कुणाला म्हणतोस भ्याड ?'

'नुसतं भ्याड नाही—मुर्दाडही !'

'कोण मुर्दाड ?'

'तू !'

'मी ? हॅः आणि मुर्दाड?'

'नाही तर काय ? जगतोस कशाला ? मरून जा ! टाक नदीत उडी. नाही तर जा कड्यावरून जीव झोकून दे ! म्हणे वस्तीला धोका आहे !'

'नाही तर काय ? केडाला विचार ?'

'केडाला कशाला तुझ्यात गोवतोस ? वस्तीला पूरियापासून धोका नाही. तुझ्यासारख्या भ्याडापासून आहे !'

—उदगाला निगूडाचे शेवटचे वाक्य फार लागले. त्याच्या काळजाला झोंबले. अचाट शक्ती त्याच्याजवळ नसली तरी जी होती तिचा त्याला अभिमान होता. शेवटी जगण्याकरिता शक्तीचीच खरी गरज आहे हे तो ओळखून होता. आणि तिच्याविषयी सारखा अभिमान बाळगणे त्याच्या रक्तातच खेळून राहिलेले होते.

निगूडाने त्या अभिमानावरच प्रहार केला होता. त्यामुळे त्याचे रक्त उकळू लागले होते. परंतु नेत्याविरुद्ध हात उचलायचा नाही ही शिस्त होती !

शेवटी उदगाने पुनः एकदा अत्यंत धिमेपणाने निगूडाकडे पाहिले. पुनः एकदा त्याच्या नजरेत नजर मिळविली. मग तो दोन पावलं पुढं सरकला. अगदी निगूडाच्या छातीशी भिडला. त्याने त्याचे दोन्ही हात हातात घेतले.

—आणि निगूडाच्या म्हणण्याला त्याने मूक संमती दर्शविली ! तरी त्याच्या डोक्यातून तिडीक गेली नव्हती. मन निगूडाविषयी साफ झाले नव्हते. ◻

## ः ११ ः

निगूडचा हेतू उदगाच्या डोक्यात घोळत होता. त्याच्या मनात तुटके फुटके विचार येत होते. निगूडा वर्चस्व गाजवतो, निगूडा आज्ञा करतो, निगूडाच्या आणि आपल्यामध्ये काहीतरी खटकत चालले आहे अशाच आशयाचे विचार उदगाच्या मनात येत होते.

—कालच्या शिकारीच्या वेळेस निगूडाने निमूवाला एकदम वर उचलली होती, हे त्याला आवडलं नव्हतं आणि आता तर तो पुन्हा पुरियाचाही नाद सोडायला तयार नव्हता ! आणि त्यालाही कुत्र्या-सारखं बरोबर यायला सांगत होता. निगूडाच्या शक्तीखाली, त्याच्या नजरेखाली उदगा दडपला जात होता. मध्येच आपल्या ताकदीचा अदमास घेत होता.

निगूडाविरुद्ध बंड करण्याचं मधून मधून सारखं त्याच्या मनात येत होतं !

निगूडा वस्तीचा राजा झाला तो प्रसंग उदगाला आठवत होता. त्या वेळची त्याची तगमग त्याला आठवत होती. एका अचाट शक्तीच्या दडपणाखाली चेंदला जाण्याची भावना त्याला डाचत होती. त्याच्यात तशी ताकद कमी होती असं नाही. परंतु त्याचा पिंड बरोबरी करण्याचा नव्हता. जगण्याकरिता झगडावं लागत होतं. प्रत्येक ठिकाणी काही तरी पणाला लावावं लागत होतं. आणि सारी शक्ती पणाला लावून कित्येक वेळा येणाऱ्या संकटांवर मात करावी लागत होती. याची जाणीव त्याला सतत होत होती. तरीही प्रत्यक्ष झगडयात त्याचं मन रमतच नव्हतं ! तो झगडा इतरांप्रमाणे त्याच्या जीवनाचा स्थायीभाव होऊच शकत नव्हता ! त्याचं डोकं निराळं होतं. त्याच्या मेंदूत स्फुरणाऱ्या विचारांची जात निराळी होती. परंतु त्या काहीशा नाजूक विचारांना भोवतालच्या परिस्थितीतून वाट काढता येत नव्हती ! कधी कधी त्याचे विचारच त्याला उमगत नव्हते. आणि कधी कधी तर ते त्याच्या मस्तकालाही पेलत नव्हते ! मग तो पुरता गांगरून जात होता. वेडयासारख्या काही तरी हाल-चाली करीत होता. तरीही त्याच्यातलं काही तरी चकाकत होतं. पोटात होणाऱ्या गुदगुल्यांच्या रूपाने काही तरी नवीन उमलू पाहात होतं. गच्च भरलेल्या छातीतून काही तरी रसरसत होतं !

आताही त्याला तसंच काही तरी होत होतं. या वेळी शांत रात्र पडली होती. आदल्या रात्रीपेक्षा तिचं स्वरूप फारच निराळं होतं. आकाश स्वच्छ होतं. आणि भला मोठा गोल गरगरीत चंद्र अगदी स्थिरपणे चकाकत होता. त्या प्रकाशातली शांतता उदगाला चोहोकडून व्यापून उरली होती. दूरवर पसरलेला माळ त्याला काही तरी नेहमीपेक्षा निराळं सांगत होता ! त्या तशा भर रात्रीही त्याला विश्रांतीची गरज भासत नव्हती. दिवसभर, थकवा आणणारं विशेष कामही झालेलं नव्हतं—तेवढयात शेवटच्या झोपडीतून एक आकृती बाहेर पडतांना त्याला दिसली. पलीकडच्या डेरेदार झाडाकडे ती झुकत होती. तिला पाहाताच उदगा एकदम उठून उभा राहिला. चार पावलांनी त्याने तिचा पाठलाग केला. आणि ऐन झाडाच्या धूसर सावलीत तो तिच्यासमोर जाऊन उभा राहिला. ती निमूवा होती. सडपातळ, परंतु गुटगुटीत. तिच्या साऱ्या अवयवांतून तारुण्य नुसतं तटतटत होतं. उदगाला पाहाताच ती चमकली. एकदम थबकून जागच्या जागी उभी राहिली. तेवढयात उदगाने तिचा उजवा हात घट्ट धरला. आणि एका झटक्यात त्याने तिला छातीजवळ ओढली. त्याच्या शरीरातून आता गरम रक्ताचा प्रवाह जोरात वाहू लागला होता. दुसऱ्या क्षणात त्याने तिला उलटी पालटी करून जमिनीवर निजविली. आणि तिच्या शेजारी तिच्या छातीला टेकून तो बसला. आता त्याच्या प्रत्येक हालचालीतला रगेल वजनदारपणा तिला नव्यानेच प्रतीत होऊ लागला होता.

निमूवा धडधडत होती. थरथरून त्याच्याशी काही तरी बोलत होती. तोही तिला रोधलेल्या श्वासातून काही तरी सांगत होता.

—चांगली एक घटका ती दोघं त्या झाडाखाली बसून होती !

मग त्याने निमूवाला तो आणि निगूडा सकाळी पुरियाच्या मागावर जाणार असल्याचं सांगितलं. ते तिला अगोदरच कळलेलं होतं. म्हणूनच तर ती उदगाजवळ मघापासून अगदी शांतपणे पडून होती ! मग निगूडाच्या धसमुसळ्या वागण्याविषयी तो तिला बराच वेळ समजावून सांगत होता. तो जे काही म्हणत होता ते तिलाही पटत होतं.

निगूडा भलत्या ठिकाणी हात घालीत होता. उगीचच्या उगीच स्वतःवर आणि इतरांवरही संकट ओढवून घेत होता. त्याच्या वस्तीवर पुरियाच्या निमित्ताने झालेली टेहळणी त्याच्या डोळ्यांपुढे होती. जाणूनबुजून जिवावर धोका ओढवून घेण्यात त्यांना भीती वाटत होती !

पण त्याला काही इलाज नव्हता. निगूडा आपल्या मिठीतून सुटत चालला आहे हे निमूवाला पक्कं समजलेलं होतं. आणि त्याच्या वर्च-स्वाची धग उदगाला सारखी चटके देत होती.

मग दोन निरनिराळ्या कारणांनी एकत्र आलेल्या दोन जीवांची बराच वेळ खलबतं झाली. त्या भावनेनं ती इतकी एकजीव झाली की काही काळ देहभान विसरून बसली. मग भानावर आली तेव्हा चंद्र बराच खाली झुकला होता. उदगाला झोप येत होती. निमूवालाही झोपडीत जाणं आवश्यक होतं. पण एकमेकांपासून त्यांना दूर व्हावसं वाटत नव्हतं ! त्या झोपडया मात्र त्यांना फार दूरच्या वाटत होत्या.

उदगा आता झाडाच्या खोडाजवळ सरकला होता. आणि अण-कुचीदार दगडाने झाडाची साल कुरतडीत होता. कसला तरी आकार खोदीत होता. त्याचे हात थरथरत होते. हाताला कसलं विशिष्ट वळण नव्हतं. परंतु मस्तकातून, छातीतून, पोटातून, डोळ्यां-तून काही तरी ओसंडत होतं. काही तरी नवीन निर्माण करण्या-करिता धडपडत होतं. निमूवा त्याच्या हालचालीकडे बेभान होऊन पाहात होती. एक सर्वस्वी निराळाच मानव तिला उदगाच्या ठिकाणी दिसत होता ! त्या बेभान अवस्थेतच केवळ खुणेनं ती त्याला काही-तरी विचारीत होती. आणि त्याच्याकडे जास्तच आकर्षिली जात होती !

—परंतु आपण त्या खोडावर कसले संस्कार करीत आहोत हे त्याचं त्यालाही उमगत नव्हतं !

निमूवाच्या तर ते डोक्यात शिरणंच अशक्य होतं ! दगडाची अणकुचीदार लेखणी झाडाच्या मऊ गुळगुळीत सालीवरून फिरत होती. आडव्या उभ्या रेषांमधून कसल्या तरी आकाराचा जिवंतपणा फक्त निमूवाला जाणवत होता. आवतीभोवती जे काही आपण पाहातो, ते या अस्पष्ट रेषांमधून काही तरी डोकावत आहे

याची जाणीव तिला येत होती. आणि तिला मजा वाटत होती. तिचा जीव हरखून गेला होता ! उदगा हा कोणी तरी वेगळा माणूस आहे. नेहमीच्या माणसात असतं त्यापेक्षा त्याच्यात काही तरी निराळं आहे ! पण नेमकं ते निराळं, निराळं म्हणजे काय हे मात्र तिला समजत नव्हतं ! हेरता येत नव्हतं ! ती नुसती मुग्धपणे चकाकते डोळे त्याच्यावर रोखून सारखी एकटक त्याच्याकडे पाहात होती. त्याने खोदलेल्या उभ्या आडव्या रेषांतील अस्पष्ट परंतु आगळ्या आकृतीकडे पाहात होती !

झाडाच्या खोडावर रेघोट्या वाढत होत्या. आकृत्यांच्या खाचा-खोचा प्रकट होऊ पाहात होत्या ! आणि निमूवाच्या पोटात गुदगुल्या होत होत्या ! त्या अवस्थेतच उदगाच्या पाठीमागे उभी राहून तिने आपले दोन्ही हात त्याच्या खांद्यावर ठेवले. खूप जोरात गदगदून दावले. मग त्याच्या डोक्यावरच्या लांब लांब केसांतून बोटे फिरविली. तरीही तिला समाधान वाटत नव्हते. उदगा खपरीचे टोक फिरविण्यात गुंग झाला होता. जणूं त्याची समाधी लागली होती. बाहेर चोहोकडे पिठोरी चांदणं सांडलेलं होतं. वेगवेगळ्या वनस्पतींच्या फुलांचे आणि गडद पानांचे गंध हवेत मिसळले होते. आणि ते गंध धुंदी चढवीत होते !

उदगाच्या केसांतून बोटे फिरविताना निमूवा स्वप्नात बोलल्या-प्रमाणे म्हणाली,

'हे काय आहे ?'

परंतु उदगाला ते ऐकूच गेले नसावे !

तो आपले कामच करीत होता. मग त्याला गदा गदा हलवून निमूवाने त्याची समाधी जणू भंग केली. आणि त्याच्या डोळ्यात नजर भिडवीत ती पुन्हा म्हणाली,

'हे काय आहे ?'

आता त्याला ते ऐकू गेले होते. आणि निमूवा काय विचारीत आहे हे समजलं होतं. परंतु आपण काय करीत आहोत हे मात्र त्याला समजलेलं नव्हतं ! कसल्या तरी रेघोट्या ओढाव्याशा वाटत आहेत. आतून कसल्या तरी ऊर्मी उसळत आहेत. आणि संपूर्णपणे त्या ऊर्मीच्या आहारी जाऊन आपण काही तरी निराळे करीत आहोत येवढंच त्याच्या लक्षात येत होतं; परंतु त्याला नेमकं काय म्हणावं ते मात्र कळत नव्हतं. म्हणून त्याने निमूवाकडे पाहून फक्त मान हलविली !

—मग ते दोघंही उठले, हळू हळू दूर झाले. ¤

## : १२ :

निगूडाची टोळी जेव्हा आपल्या भाले हत्यारांनिशी निघाली तेव्हा पूर्व दिशा नुकतीच फुटली होती. रस्ता असा कुठेच उमटला नव्हता. परंतु केवळ सरावाने त्यांना दिशांचं ज्ञान झालेलं होतं. आता कोणत्या दिशेने जायचं हे बऱ्याच वेळा निघण्यापूर्वीच एकदम ठरत असे. अनेक वेळा त्यांना हे मार्गदर्शन रिशा करीत होती. तिला या वस्तीत फार आदर होता. कारण रात्रीच्या गाढ झोपेत पूर्वी मेलेले अनेक शूर लोक तिला भेटत असत ! आणि संकटांची पूर्वचिन्हं तिला रात्री झोपेतच सांगत असत ! सकाळी उठल्याबरोबर ती ही बातमी लोकांना सांगत असे.

म्हणूनच रिशा वयाने वृद्ध असली तरी तिला सर्वशक्तिमान समजले जात असे !

काल तिला रात्री पूरिया दिसली होती. एका घोर जंगलात, एकटी भटकताना ! मग सकाळीच तिने एका दिशेकडे हात फेकून निगूडाला तिकडे जाण्याचा इशारा दिला होता, आणि त्याप्रमाणे निगूडा निघाला होता.

पहिला डोंगर चढून गेल्यानंतर चोहोकडे भयानक जंगल पसरलेलं दिसू लागलं. परवाच्या पावसामुळे कड्यांवरून कोसळणारे पाण्याचे धबधबे फेसाळत शेकडो फूट खाली कोसळत होते. जागजागी मोठ-मोठाले पाण्याचे ओहोळ ओलांडून त्यांना जावं लागत होतं. गर्द झाडीतून जाताना दडस अंधारामुळे आणि भयानक शांततेमुळे त्यांना भीती वाटत होती. म्हणून मग चोहोकडे अत्यंत सावधपणे लक्ष ठेवीत त्यांची पावलं पुढे पडत होती. कुठे थोडंसं खुट्ट झालं की ते हवकून उभे राहात होते; आणि पूर्ण माग घेतल्याशिवाय पुढे सरकत नव्हते. असं बराच वेळ चालल्यानंतर दाट झाडीतून ते एका मोठ्या पटांगणात आले. त्यापलीकडे जाण्याकरिता त्यांना समोरचा मोठा डोंगर चढून जावं लागणार होतं.

ते ज्या वेळी डोंगराच्या पायथ्याशी येऊन भिडले तेव्हा दूर-वरच्या झाडीतून डोंगरांना वळण घेऊन एक रानडुक्कर जात असलेला त्यांना दिसला. तो एकटाच रानडुक्कर पाहिल्याबरोबर त्यांचे डोळे आनंदाने चमकले. मग त्यांनी खरोखरच तो एकटा आहे याची खात्री करून घेतली आणि त्यानंतर अत्यंत सावधगिरीने पुढचे पवित्रे टाकण्यात आले. डुक्कराच्या पाठलागाला सुरुवात झाली !

जवळ जवळ दोन घटका ते त्या परिसरांत फिरत होते. त्या दरीत ऊन आता नुसतं नाचत होतं. प्रत्येकजण घामाघूम झाला होता. परंतु तो डुक्कर अजून त्यांच्या तावडीत सापडला नव्हता. त्याला सोडून जाणंहि धोक्याचं होतं. आणि त्याला मारण्यांतहि कमी धोका नाही हे त्यांना त्या दोन घटकांत पूर्णपणे समजून चुकलेलं होतं. तो कळप चुकलेला डुक्कर आहे हे उघड होतं. जर त्याच्या शिकारीची चाहूल लागली तर आसपासची जनावरं गप्प बसणार नव्हती. आणि त्यामुळे निगूडाच्या टोळीचा जीव चांगलाच धोक्यात येणार होता.

शेवटी एका दरडीच्या मेचक्यात त्यांनी डुक्कराला अडविला. एका मोठ्या झाडाच्या खोडाच्या आडोशाला धापा टाकीत तो उभा होता. मध्येच त्या टोळीकडे क्रूर नजरेनं पाहात होता. आणि तिथून निसटण्याची संधी हुंगीत होता ! परंतु तेवढ्यात निगूडाने गळ्यातलं धनुष्य काढलं. चामडीच्या वादीची चिवट दोरी ताणली. आणि लखलखणाऱ्या पात्याचा बाण चढवला.

—दुसऱ्या क्षणाला तो तीर सणसणत गेला आणि खपकन त्या झाडाच्या खोडातच घुसून बसला ! त्या आवाजाने आणि जवळ येऊन भिडलेल्या जिवावरच्या धोक्याने डुक्कर बेभान झाला. आता तो निगूडाच्या टोळीवर सरळपणे मुसंड मारण्याच्या पवित्र्यात उभा होता. त्याच्या नुसत्या धगधगत्या डोळ्यांकडे आणि वासलेल्या जबड्याकडे पाहून निगूडाची टोळी बावरली होती. संकट टळत

नाही हे त्यांना उमगलं होतं. आणि प्रत्येकाची पाचावर धारण बसली होती. निगूडाचा तीर चुकतो म्हणजे काय? आता त्यांचा त्राता कोण होता !

—परंतु दुसऱ्याच क्षणी डुक्कराने घेतलेली झेप जागच्या जागीच रोधली गेली. उदगाने अनपेक्षितपणे मारलेला तीर खच्‌कन डुक्कराच्या छातीत घुसला होता ! त्यासरशी त्याने हवेत एक उडी घेतली आणि खाली कोसळून पडण्यापूर्वी दहा हात तो टोळीजवळ धावला ! डुक्कराच्या मुसंडीचा वेग उदगाने आपल्या भाल्याने रोधून धरला. आणि त्या धुडाला त्याने जमिनीवर लोळवलं !

काही क्षणातच हे सारं घडून गेलं असेल ! एकाच क्षणी निगूडाने उदगाकडे चमकून पाहिलं आणि उदगाचीही नजर तेव्हा निगूडावरच खिळलेली होती ! दोघांनीही एकमेकांच्या नजरेतील अर्थ ओळखला होता !

आज उदगाने निगूडावर मात केली होती. एक प्रकारे तो माजलेला डुक्कर मारून उदगाने निगूडाला आपल्या शक्तीचं आव्हानच दिलं होतं. निगूडाचा तीर न चुकता जर पहिल्या प्रथमच उदगाने ती शिकार झोडली असती तर निगूडाला त्याचं काही वाटलं नसतं ! पण आता त्याच्या चुकीवर उदगाने विजय मिळविला होता ! आपल्या वस्तीत वरचढपणाची फक्त उदगाकडूनच निगूडाला धास्ती होती. ती धास्ती आजच्या प्रसंगाने खरी ठरविली होती. त्यामुळे नुकत्याच घडलेल्या भीषण प्रसंगाचा निगूडाला पार विसर पडला होता. आणि त्याचं डोकं अपमानाच्या आणि क्रोधाच्या भावनेनं नुसतं उकळत होतं ! बाकीचे लोक मात्र त्या मरून पडलेल्या धूडाकडे पाहून खूप होत होते. बऱ्याच दिवसानंतर त्यांना आज डुक्कराचं मास खायला मिळणार होत !

ज्याच्या हाताने शिकार झाली त्यानेच तिचा पहिला लचका तोडायचा असा तिथं संकेत होता. म्हणून उदगाला आता तो मान मिळणार होता. परंतु त्याअगोदर ज्याच्या हातून शिकार झाली त्याला वस्तीच्या राजाकडून अगोदर शाबासकी मिळायला हवी होती ! ती अजूनपर्यंत मिळाली नव्हती ! टोळीतील सारी माणसं निगूडाकडे त्या हेतूनं पाहात होती. डिवचलेल्या, भांबावलेल्या निगूडाला काय करावं ते सुचत नव्हतं. मात्र उदगाने त्याच्या साऱ्या भावना ओळखल्या होत्या. मग तोच मोठ्या दिलदारपणे धावतच निगूडाजवळ गेला. आणि त्याने आपले दोन्ही हात निगूडापुढे फैलावले ! मग मात्र एका निमिषात त्याने उदगाला कडकडून मिठी मारली ! परंतु त्या मिठीतूनही एक प्रकारचं भय श्रवत असल्याचा भास उदगाला होत होता !

एकीकडे निगूडावर विजय मिळविल्याचा आनंद, काही क्षणापूर्वी मृत्यूने पसरलेल्या अकाळविक्राळ जबड्याचं भय आणि आता निगूडाचा, आपल्या नेत्याचा स्वाभिमान दुखवला गेल्याचंही भय. या साऱ्या एकात एक गुंतलेल्या भावना उदगाच्या मनात गरगर फिरू लागल्या. त्याला नेमकं काय करावं, कसं वागावं हे अगोदर सुचलंच नव्हतं. बराच वेळ अशा अवस्थेत गेल्यावर मात्र निगूडाच्या छातीकडे, चेहऱ्याकडे पाहिल्यावर त्याच्या साऱ्या भावना आणि त्यांचा कल्लोळ विरून गेला ! आणि त्याने निगूडाला गच्च मिठी मारली ! मग मिठी सोडवून घेत तो मागे सरला आणि गदगदलेल्या आवाजात त्याने हाक मारली,

'निगूडा !'

निगूडाने वर पाहिलं. उदगाच्या नजरेत नजर रोवली आणि गंभीर आवाजात तो म्हणाला,

'उदगा !'

त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडल्यावर सर्वांच्याच जिवात जीव आला. उदगालाही हायसं वाटलं. त्या प्रसंगामुळे आलेले मनावरचे आणि शरीरावरचे ताण ढिले पडले आणि मोकळ्या दिलदार मनाने उदगा निगूडाला म्हणाला,

'हे यश तुझंच आहे !'

परंतु निगूडाचे मन म्हणावे तेवढं निवळले नव्हते ! खुनशी पुरुषाची रग आणि स्वाभिमानी पुरुषाचा मानभंग आत कुठे तरी रेंगाळतच होता ! परंतु ते सारं आतल्या आत दाबीत निगूडा म्हणाला,

'यश माझं नाही तुझंच आहे ! भिकेचा मलिदा मला नको !'

त्यावर उदगा म्हणाला,

'नेम माझा बसला असेल. परंतु ती शिकवण तुझी आहे ! तुझ्या हाताखालीच मी शिकलो आहे.'

'ते काही का असेना. माझा नेम आज हुकला !'

'परंतु तुझे रक्षण पाठीशी होते म्हणून मी नेम मारू शकलो !'

उदगाच्या या बोलण्यावर सर्वांनी माना हलविल्या आणि निगूडाच्या नावाचा जयजयकार केला ! त्या जयजयकारात मात्र निगूडाचा माग रेंगाळणारा मानभंग पार विरघळून गेला !

—आणि तो पूर्ण निर्मळ बनला !

निगूडाचे बदललेले स्वरूप पाहिल्यावर सर्वांच्या जिवात जीव आला. आता या दोघात चांगली जुंपणार. कुणाचा तरी जीव जाणार. त्यामुळे आपलं, वस्तीचं काही भलं होणार नाही; याची सर्वांना धास्ती वाटू लागली होती. परंतु सुदैवाने ते वातावरण निवळलं होतं.

या आनंदातच ती सारी टोळी मग बराच वेळ नाचत राहिली ! ◻

## : १३ :

मग तो सारा डुक्कर फाडून त्याचे तुकडे केले, ताजं गरम रक्त प्रत्येकजण थोडं थोडं प्याला ! काळजाचे तुकडे उदगा आणि निगूडाने वाटून घेतले. मग विस्तव तयार करून त्यांनी ते मास चांगलं भाजलं आणि त्यावर मनसोक्त ताव मारला.

तियल्याच एका डोंगरमाथ्यावर एक डौलदार झाड होतं. त्या उंच ठिकाणी झाडाच्या सावलीखाली घटकाभर पडायचं त्यांनी ठरविलं आणि ते वर चढू लागले. त्यांना तो सारा प्रदेश नवखा होता. तो पाहून त्यांची मनं जशी मोठी होत होती तसंच त्यांना भयही वाटत होतं !

माथ्यावर चढून गेल्यावर तर पृथ्वीचं एक आगळंच स्वरूप त्यांना दिसू लागलं. त्या एकंदर स्वरूपाचा इतरांच्या मनावर काहीच परिणाम झाला नाही. ते आपले सावली गाठून खुशाल लोळू लागले. अन्नाची नशा त्यांच्यावर चढत चालली होती. परंतु त्या भोवतालच्या

नवख्या परिसराकडे पाहून उदगाचं डोकं गरगरू लागलं. त्या उंच-वटचावरून अगदी दूरवर विरुद्ध दिशेला निळचा डोंगरावर टेकलेलं आभाळ पाहून तर त्याची मतीच कुंठीत झाली !

मग तो कितीतरी वेळ अंगाभोवती फिरून दूर दूर दृष्टी फेकीत होता आणि त्या दृष्टीतून अधाशासारखं काही तरी घटाघट पीत होता ! ती खोल दरी, वळणावळणाने वाहणारे स्वच्छ पाण्याचे झरे, गच्च हिरवेगार झाडी, पर्वतांचे मोठमोठाले कडे आणि त्या अगदी दूरवर नजरेच्या टप्प्यातून निसटणारी ती धूसर किमया पाहून त्याला काहीच सुचत नव्हतं ! एका अत्यंत वेगळचा, तरल, अगम्य अवस्थेत तो गेलेला होता. त्याला भोवतालची काहीच जाणीव राहिलेली नव्हती. असा किती तरी वेळ तो त्या वेगळचाच धुंदीत मस्त होता. मग बऱ्याच वेळाने तो तिथून उठला, दूर दूर गेला आणि डोंगराच्या एका उभ्या शिलेवर अणकुचीदार दगडाने घाव घालू लागला !

—उदगाच्या डोक्यावरचे केस विस्फारलेले होते. त्याचे डोळे राकट होते. छातीवर अस्वलाच्या केसासारखं केसांचं जंजाळ माजलेलं होतं. त्याचे दोन्ही हात पाशवी शक्तीनं तटतटले होते, तरीही या वेळी त्या उभ्या शिलेवर त्याच्या हातातील अणकुचीदार दगडाचे घाव अत्यंत नाजुकपणे बसत होते. त्याचा हात सारखा थरथरत होता ! त्या नाजूक घावातून काय निर्माण होणार होतं हे त्याचं त्यालाच उमगत नव्हतं !

चांगल्या दोन घटका गेल्यावर निगूडाच्या आरोळचा त्याच्या कानावर पडल्या तेव्हाच तो त्या पूर्वीच्या परिसरात नव्याने अवतरला. आणि भारावलेल्या नजरेनं, धुंद वृत्तीनं तो टोळीकडे धावत गेला !

मग निगूडात आणि त्यांच्यात काहीतरी बोलणं झालं.

दिवस बुडायच्या आत परत जागेवर जायला हवं होतं. आजच्या दिवसात पूरियाचा शोध लागू शकत नव्हता ! निगूडाची इच्छा तसंच पुढं जावं अशी होती. पण पुढे जाण्यात धोका आहे असं उदगाचं आणि इतरांचंही मत होतं ! उदगा त्याला हे पटवून देत असता त्याला आपल्या वस्तीची आठवण येत होती आणि मिळविलेली डुक्कराची शिकार, त्यातले चारपाच लचके निमूवाला देण्याची त्याला तीव्रतेनं इच्छा होत होती.

म्हणूनच त्याचं मन पुढे जाण्यास तयार होत नव्हतं. शिवाय शिकार केल्यापासून निगूडाच्या बदललेल्या वृत्तीचा ठाव त्याला घेता येत नव्हता !

शेवटी सर्वांचं मत पडलं की, मुक्कामाला वस्तीवर जावं आणि दिवस उगवायच्या आत पुन्हा मग पूरियाच्या शोधाला निघावं ! त्याचवेळी निघताना वस्तीवर मुक्कामाला येणार नाही म्हणून वस्ती-वरच्या लोकांना सांगून निघावं !

निगूडाला हे मान्य करावंच लागलं. पण आतून तो का कुणास ठाऊक, उदगावर सारखा जळत होता.

ते वस्तीवर पोहोचले तेव्हा चांगलीच रात्र पडली होती. परंतु चंद्राच्या प्रकाशात सारा परिसर स्पष्ट दिसत होता. अशातही एकदम परत फिरावं आणि सारी रात्र पूरियाच्या शोधात घालवावी असं निगूडाला सारखं वाटत होतं.

त्याच्या मनाची अवस्था आज विचित्र झाली होती. एकीकडे उदगाकडून आज वरचढ झाली होती आणि शेवटी ज्या हेतूने तो निघाला होता तोही साध्य झाला नव्हता. आज त्याचं कोणीच काही ऐकलं नव्हतं. अत्यंत सामान्य माणसासारखं त्याला आज वागविलं गेलं होतं असं त्याला वाटत होतं. एकाएकी तो इतका खाली कसा काय फेकला गेला ? त्याचं सारं मूळ उदगाच्या आजच्या पराक्रमात होतं. म्हणून इथून पुढे उदगाविषयी एक विचार ठरवून टाकणं अवश्य होतं ! कारण उदगाची वरचढ त्याच्या मस्तकात गप्प बसूच शकत नव्हती !

ते वस्तीवर पोहोचले तेव्हा निमूवा, रात्री उदगा आणि ती ज्या झाडाखाली बसली होती, त्याच ठिकाणी उदगाची वाट पाहात बसली होती आणि उदगाने रात्री झाडाच्या बुंध्याशी खोदलेल्या सालीकडे एकाग्रतेनं पाहात होती. तेव्हाच उदगा हळूच तिच्या मागून गेला आणि तिच्या केसाला धरून त्याने तिला जमिनीवर लोळविली ! ¤

: १४ :

रात्रीच्या अंधारात उदगाला निगूडाचे जळजळीत डोळे स्वच्छ दिसत होते. चंद्र नुकताच मावळून चोहोकडे काळोख पसरला होता. बाहेरच्या ओटयासारख्या उंचवट मैदानात उदगा झोपला होता. दिवसभराच्या थकव्याने त्याला झोप येत होती. परंतु आज झोपणं धोक्याचं आहे याची जाणीव त्याला झालेली होती. दुपारपासून निगूडाचं आणि त्याचं खटकलेलंच होतं. त्यातून पुन्हा निमूवा उदगा-कडे वळली आहे याची जाणीव निगूडाला झालेली होती. पूरिया त्याला मिळत नव्हती आणि या साऱ्याचा राग उदगावर होता. म्हणूनच उदगाला आज शांतपणे झोपणं धोक्याचं होतं. घटका दोन घटकापासून निगूडाच्या साऱ्या हालचाली उदगा पाहात होता. निगूडाच्या मनात फार मोठी खळबळ माजलेली त्याला जाणवत होती. त्याच्या साऱ्याच हालचाली फार भयप्रद होत्या.

हळूहळू तो उदगाकडे सरकत येत होता. निजल्या निजल्याच जणू झोपेत सरपटल्यासारखा सरपटत होता. त्याची सारी हालचाल उदगा टिपीत होता !

तो जेव्हा उदगाच्या अगदी छातीजवळ येऊन उभा राहिला तेव्हा उदगा तटकन उठून उभा राहिला. उभा राहून निगूडाकडे एकटक पाहू लागला. उदगा जागा होता या एकाच प्रचीतीने निगूडा एकदम थरथरला. त्याच्या हातातलं मऊ दगडाचं परंतु तीक्ष्ण हत्यार अभावितपणे गळून पडलं आणि तो नुसताच उदगाकडे पाहू लागला !

असे काहीच क्षण गेले असतील. तेवढ्यात उदगा निगूडापासून दूर झाला. त्याच्याशी सामना देण्याची त्याला इच्छाच झाली नाही ! पाहाता पाहाता तो त्या काळोखात कुठे तरी निघून गेला. पार दिसे-नासा झाला !

मग अशाच आणखी दोन घटका निघून गेल्या. उघडा पडलेला निगूडा आता मनात चांगलाच चरकला होता. भ्यालाही होता. उदगाचा काटा काढायचा त्याने मनाशी विचार केलेला होता आणि तो त्याचा हेतू सपशेल उघडा पडला होता. शत्रू चाल न करताच निघून गेलेला होता. हा त्याच्या आयुष्यातील पहिलाच प्रसंग होता. हा पहिलाच शत्रू होता, ज्याने चालही केली नव्हती आणि शरणाग-

तीही पत्करली नव्हती! निगूडाला वाटलं होतं की सहजासहजी उदगाचा काटा निघणार नाही. चांगली झटापट होईल. प्रसंगी जिवालाही धोका निर्माण होण्याची त्याला भीती होती. कारण तो उदगाला चांगलाच ओळखीत होता. परंतु आताच्या अगदी शांतपणे नाहीशा झालेल्या उदगाची मात्र त्याला ओळख पटलेली नव्हती, आणि ती पटली तेव्हा तो हतबुद्ध झाला. दिङ्मूढ होऊन झाडासारखा तटस्थ उभा राहिला!

आता सकाळचे वारे वाहू लागले होते. रात्रीची किरकिर केव्हाच बंद झाली होती. वस्तीतला एक एक माणूस उठत होता. मुलं रडून त्यांच्या आयांना जाग देत होती. रिशा आणि केडा दोघंही उठून बसले होते. मग उदगाही झोपेवाचून उठला. नदीवर जाऊन आला. तिथंही आसपास त्याने निगूडाची चाहूल घेतली. शेवटी कानकोंडल्या आवाजाने त्याला त्याने पाच सहा हाका मारल्या. तरी प्रतिसाद मिळाला नाही! त्यामुळे तर तो फारच गांगरून गेला. कारण उदगाची प्रतिसाद त्याच्या इतकी परिचयाची झाली होती की, आता ती ऐकू न आल्यामुळे त्याला त्या शांततेची भयंकर भीती वाटली!

मग मात्र निगूडाची पक्की खात्री झाली की, उदगा कुठे भटकला, वस्तीला दुरावला! ही जाणीव त्याला अनपेक्षितपणे झालेली होती. वस्तीवरची एक शक्ती कमी झाल्याची वेगळीच हुरहूर त्याला त्या सकाळच्या प्रहरी चांगलीच जाणवू लागली. पुन्हा त्या झपाट्यातच त्याने उदगाला आणखी चार पाच हाका मारल्या!

तरीही उदगाची चाहूल कुठेच लागली नाही!

मग मात्र तो मुकाट्याने वस्तीवर परतला. आता त्याचे इतर शिणकरी तयार झाले होते. बाहेर पडायची तयारी करीत होते. निगूडाने त्यांना उदगा नाहीसा झाल्याचं सांगितलं. तशी रिशा मोठ्याने ओरडली! केडाही निगूडावर सारखा गुरगुरू लागला. त्या अनुभवी माणसांना शक्तीची खरी किंमत माहीत होती.

शेवटी निगूडा चार पाच शेलक्या माणसांना घेऊन बाहेर पडला. इतरांना त्याने साऱ्या सूचना दिल्या. त्यांची वाट न पाहाण्याविषयी बजावलं आणि आज पहिल्या प्रथमच त्या वस्तीवर उदासीनतेची, वेगळ्याच भीतीची छाया पसरली!

उदगा आणि निगूडात पडलेली फूट हे चांगलं लक्षण नाही, याची जाणीव वस्तीला होऊन चुकली होती. आणि भीतीने त्यांचा जीव सारखा खालीवर होऊ लागला!

उदगा कुठे नाहीसा झाला याचं साऱ्यांनाच कोडं पडलं! केडा आणि रिशा भांबावल्या नजरेने दूरवर जाणाऱ्या निगूडाच्या टोळी-कडे पाहात राहिले. त्यांच्या पाठीच्या आकृत्या दूर दूर जात होत्या. आणि अस्पष्ट होत होत्या. शेवटी ती टोळी उताराला लागली. त्यांच्या कमरेखालचा भाग दिसेनासा झाला. मग खांद्याखालचा. त्यानंतर त्यांची डोकीच काही वेळ काळ्या ठिपक्यासारखी दिसत होती. शेवटी तीही अदृश्य झाली!

आणि केडाला भयंकर अस्वस्थ वाटायला लागलं. आज हे असं काय झालं हेच त्याला कळेना. त्याने केविलवाण्या नजरेनं रिशाकडे पाहिलं. परंतु केडाची दुबळी दृष्टी जाणवताच तीही गांगरून गेली!

त्यानंतर केडाने मागे राहिलेल्या कालच्यापैकी काही लोकांना हाका मारल्या. ती माणसं धावत येऊन केडापुढे उभी राहिली. मग केडाने विचारलं,

'काल शिकारीच्या वेळी काय झालं?'

एकाने सांगितलं,

'उदगात आणि निगूडात बाचाबाची झाली!'

'कशावरून?'

'शिकारीवरून!'

'नीट सांगा काय काय झालं ते?'

केडा ओरडला.

त्यानंतर प्रत्येकाने कालची सारी हकीकत केडाला सविस्तरपणे सांगितली.

ती ऐकून केडाचा धीर आणखी खचला. आणि आपल्याशीच बोलल्याप्रमाणे तो म्हणाला,

'उदगा आता या वस्तीत राहाणार नाही!'

त्याच्या बोलण्याकडे रिशाचं सारं लक्ष होतं. आदल्या दिवशी झालेल्या शिकारीच्या वेळचं दृश्य तिच्या दृष्टीपुढे साकार झालं. आणि तिलाही त्यातला अर्थ उमगला!

निगूडाने हे चांगलं केलं नाही हे तिच्या वृद्ध मनाला चांगलं जाणवलं. आणि अत्यंत निराशेने मान हलवीत केविलवाण्या आवाजात तीही म्हणाली,

'उदगा आपल्याला आता हरवला!'

—आणि ते खरे ठरले!

◻

## : १५ :

दुसऱ्या दिवशी उदगा लपत छपत वस्तीवर आला आणि निमूवाला बरोबर घेऊन निघून गेला. आता त्या वस्तीच्या दोन महत्त्वपूर्ण असामी नाहीशा झाल्या होत्या. माणसाच्या जीवनाप्रमाणेच वस्तीचंही जीवन असतं आणि ते जीवन जपणं फार महत्त्वाचं असतं याची जाणीव मागच्या पिढीतील केडा वगैरेंना जशी पूर्णपणे झालेली होती, तशी नव्या दमाच्या निगूडाला नव्हती. वेगवेगळ्या स्वभावाची, वेग-वेगळ्या हिकमतीची आणि निरनिराळ्या हुन्नराची माणसं ज्या वस्तीत एकवटली असतील, ती वस्ती अतिशय पराक्रमी समजली जात असे. एका दृष्टीनं तिला महत्त्व येत असे. त्या दृष्टीनं पाहिलं तर वडीगाची वस्ती फार पुढारलेली होती. तिच्यातील माणसांचे आचारविचार, पराक्रम, इतकंच नव्हे तर शरीराची ठेवण देखील बघण्यासारखी होती. पूरियाचं शरीरसौष्ठव आणि तिचा पराक्रम म्हणूनच निगूडाच्या मनात भरला होता.

निगूडाच्या वस्तीत पूरियाच्या खालोखाल निमूवा होती. साऱ्या स्त्रियात तरुण निमूवाला त्यामुळेच एक आगळं महत्त्व होतं. ती निमूवा देखील आता उदगाबरोबर नाहीशी झाली होती.

या घटनेला काही महिने लोटून गेले. त्या प्रथमावस्थेतील मानवाच्या जीवनात काही विशेष बदल घडून येत नव्हता. नित्याचेच व्यवहार, शिकार, खाणं-पिणं आणि झोपणे. उदगा गेल्यामुळे निगूडाचा एक हातच नाहीसा झाल्यासारखं झालं होत. पूरियाच्या शोधाला दूर दूर भटकण्याचं त्याचं काम रेंगाळत रेंगाळत चालूच होतं!

उदगा आणि निमूवा जंगला जंगलातून भटकत होते. त्यांना कुठे निवारा मिळत नव्हता. एखाद्या वस्तीची जवळीक करावी असे त्यांच्या मनात येतच नव्हतं. परंतु संकटांना तोंड देण्याकरिता केवळ दोघांनी राहणं धोक्याचं आहे हे त्यांना क्षणोक्षणी पटत होतं परंतु उदगाचं वेड त्या साऱ्या संकटावरही मात करून उरत होतं. त्याला भटकण्याची लहर आली की तो निमूवाला घेऊन दिवस दिवस नुसता भटकत राही, मिळेल ते खाई, वाहत्या पाण्यात मनसोक्त डुंबून घेई आणि रात्रीचा निवारा एखाद्या मोठ्या झाडाच्या रुंद रुंद फांद्यांवर हिकमतीनं आडवं होऊन मिळवी.

रात्री तो स्वस्थपणे पडलेला असताना त्याला कधी कधी केडाच्या, रिशाच्या आणि वस्तीवरच्या इतरांच्याही आठवणी येत. त्याचं मन तेव्हा गलबलून जाई. उत्कटतेने वाटे की, या अशा रात्री धावत निघावं आणि केडाला मिठी मारावी ! त्याच्या पांढऱ्या शुभ्र दाढीला कवटाळावं. त्याच्या डोळ्यांतून ओघळणारं खारट खारट पाणी प्यावं ! असल्या आठवणींच्या भावना अनावर झाल्या की, तो तटकन उठून बसे. निमूवाला ओढून आपल्या जवळ घेई. आणि मग तिलाच कुरवाळीत कुरवाळीत मनातील भावनांचा डोंब विझवून टाकी !

त्या रात्री ते झोपत असतानाच जरा थेंब पडले होते. झाडाच्या दडस पानांनी बराच वेळ त्यांना थोपवून धरलं होतं. पण मग पावसाचा किंचित जोर वाढल्यावर गार थेंब सरळ त्या दोघांवर ओघळू लागले. त्यांना उठून बसावं लागलं, ते थेट सकाळ होईपर्यंत ती दोघं एकमेकांजवळ बसून होती. मध्येच पाऊस थांबला होता तरी गार वारा झोंबत होता. आणि त्यामुळे झोप येत नव्हती. सकाळी फटफटल्यावर त्यांना जरा हुशारी वाटली. दोघंही ताज्या दमाने खाली उतरले ! आणि मागे पुढे पाहात रमत गमत चालू लागले !

कालच्या या हलक्या पावसामुळे त्यांना काही तरी वेगळंच वाटू लागलेलं होतं. पाऊस म्हटला की भीती. जिवाला धोका. त्या विजा कडाडणं, मुसळधार पावसात सारं काही वाहून जाणं आणि भिजून भिजून शरीराची रया जाणं. पाऊस म्हटला की चार चार, आठ आठ दिवसांची शिकारीची खोटी व्हायची ती निराळीच. कारण चोहोकडे गुडघा गुडघा चिखल झालेला असला म्हणजे कुठे बाहेर पडणं धोक्याचं होतं ! शिवाय माणसांच्या जाण्यायेण्यानं पडलेल्या वाटा बुजून जात आणि मग अंधारात चाचपडल्यासारखं चालावं लागे. जनावरांची पावलं ओळखून जो शिकारीचा मार्ग काढता येत असे तेही पावसाने अशक्य होत असे. परंतु कालच्या रात्रीचा पाऊस मात्र अगदीच वेगळा होता. अगदी हलका फुलका ! त्याने फक्त जमीन किंचित ओलावली होती. जमिनीवरची हिरवळ अधिकच टवटवीत दिसत होती. झाडांची पानं, निरनिराळी फूलं आज या भिजलेल्या वातावरणात उदगाला काही आगळीच दिसत होती !

तो पृथ्वीचं ते स्वरूप पाहून मोहून गेला होता. निमूवाने तर तेवढ्यात अनेक रंगांची फूलं, नाजूक पण लांब लांब पानं जमा केली होती. आणि केसात, कपाळावर, गळ्यात, मनगटात बांधली होती. त्या वेगळ्या शृंगारामुळे ती काळीसावळी आणि ओबडधोबड तरुणी अगदी खुलून दिसत होती ! तेवढ्यात उदगाचं तिच्याकडे लक्ष गेलं. आणि तो तिच्याकडे सारखा पाहातच राहिला ! मग तो लगेच तिच्याजवळ गेला. तिच्या केसातली काही फूलं त्याने काढून फेकून दिली. आणि त्यांच्या जागी फक्त हिरवट पिवळ्या, कोवळ्या कोवळ्या पानांचे तुरे खोवले. त्या फुलापानांच्या सरमिसळीने निमूवा अधिकच खुलून दिसू लागली. या बाबतीतली उदगाची योजकता तिलाही पटली आणि त्यामुळे तिच्यात एकदम जो बदल झाला त्यामुळे उठलेल्या मनातल्या ऊर्मी ती दाबू शकली नाही. ती एकदम उदगाभोवती नाचू लागली !

त्या सकाळच्या प्रहरी त्या दोघांचा मग बराच वेळ नाच चालला. त्यानंतर एका अती उंच झाडावर चढून उदगाने काही मोठमोठाली फळं काढली ती चवीला अती उत्तम होती. मग दोघांनी ती फळंच पोटभर खाल्ली आणि मग भटकंतीस सुरुवात केली. ते जेव्हा नदीच्या जवळ आले तेव्हा तिथं जरा जमिनीत जास्त ओल आलेली त्यांना दिसली. नदीकाठीही फुलांची झाडं फूलली होती. काही मोठमोठाली पिवळी धमक फुलं तर खच्चून जमिनीवर पडली होती. काही अती लांब लांब पानंही ओल्या जमिनीवर पडली होती !

निसर्गाचं ते सारं ओघळलेलं सौंदर्य पाहून उदगा नुसता दंग झाला होता ! त्या भारावलेल्या अवस्थेतच त्याने जमिनीवर पडलेलं ते लांबट पान वर उचललं. आणि तो नजर खिळवून खाली पाहातच राहिला ! ओल्या जमिनीत ते पान रुतल्यामुळे त्याची स्पष्ट आकृती उमटली होती. अगदी बारीकसारीक रेषा देखील ! आजपर्यंत उदगाने हा चमत्कार कधीच पाहिला नव्हता. मोठ्या खुषीत येऊन त्याने निमूवाला जवळ ओढली आणि तिचं डोकं खाली दाबून तिला त्या पानाची आकृती त्याने मोठ्या अपूर्वाईनं दाखविली.

जणू चिकण मातीतच दुसरं पान जन्मलं होतं ! निमूवा त्याच्याकडे एकटक पाहात राहिली. पृथ्वीवरील हा चमत्कार यापूर्वी तिने कधी पाहिला नव्हता ! ती प्रतिकृती पाहून तिचं मन मोठं झालं. तिला त्याचा काहीच अर्थ कळला नव्हता; परंतु तिचं मन प्रसन्न झालं होतं ! अशी मन:स्थिती निगूडाच्या वस्तीवर असताना तिची कधीच झालेली नव्हती ! नेहमी त्याच त्याच काळज्या, विवंचना, तीच दृश्ये, तीच माणसे आणि तेच तेच व्यवहार ! हे सारं आज कुठे तरी गळून पडलं होतं–कुठे तरी हरवलं, नाहीसं झालं होतं. आणि नवीनच काही तरी गवसलं होतं. ते काय आहे हे त्या दोघांनाही सांगता येत नव्हतं; परंतु त्याच्या चाहुलीची झुळूक हळूवारपणे त्यांच्या मनावर फिरत होती.

बराच वेळ त्या पानांच्या आकृतीकडे पाहून शेवटी निमूवा म्हणाली,

'हे काय आहे !'

परंतु ते काय होतं हे उदगाला तोंडाने सांगता आले नाही !

आणि मग त्याला एक प्रकारचा चळच भरला. त्याने खाली रुतलेली फूलं उचलली. पाकळ्यांची आकृती खाली उमटलेली होतीच. ती आकृती पाहण्याकरिता तो आणखी थोडा पुढे झाला आणि त्याला त्याच्या स्वत:च्याच पावलाची आकृती जमिनीवर उमटलेली दिसली ! आपल्या स्वत:च्या पायाची आकृती पाहिल्याबरोबर तर तो फारच खुलला. आणि भराभर आकृत्या उमटवीत तो त्या नदीचा सारा काठभर फिरला. निमूवालाही त्याने भरमसाठ फिरवली.

आज एक नवीनच गोष्ट त्याला समजली होती! त्यामुळे त्याचं मन आनंदाने नुसतं फुलून निघालं होतं! त्या धुंदीत मग तो कुठे कुठे फिरला, त्याचं त्याला भानच राहिलं नाही. एका मोठ्या दरीतून ती दोघं पार पलीकडे जाऊ लागली तेव्हा ती दोघंही आपल्याच नादात मस्त होती! तेथील साऱ्या परिसराचं एक आगळंच रूप त्यांच्या समोर उलगडलं होतं. यामुळे त्यांचे डोळे दिपून गेले होते. मने भरून आली होती. त्यांची शुद्ध बुद्ध पार हरपून गेली होती!

--नाही तर जवळच्याच गुहेतून त्यांना नक्कीच एका स्त्रीच्या कण्हण्याचा आवाज ऐकू आला असता! ◻

: १६ :

निगूडा आणि त्याच्या बरोबरचे लोक आता वस्तीपासून बऱ्याच अंतरावर आलेले होते; एक मोठा कडा त्यांच्यामध्ये आडवा पडलेला होता. तिथून त्यांना पलीकडे जायचं होतं. परंतु तसंच खाली उतरणं फार कठीण होतं. आलेल्या रस्त्याने तसंच परत जाऊन सबंध डोंगराला वळसा घालून पुन्हा खालच्या बाजूला त्या जागी येणंही तितकंच कठीण होतं. मध्येच मोठमोठाल्या जाळ्या दिसत होत्या. त्यातून श्वापदं असणंही शक्य होतं. त्या कड्याखालून वाहणाऱ्या नदीचं पात्र फार विस्तीर्ण होतं. निळं-काळं स्वच्छ पाणी तिथून अत्यंत गंभीरपणे वाहत होतं. नदीच्या पैलतीराकडील प्रदेश अत्यंत सपाट, गवताळ दिसत होता. कडा उतरून, ती नदी ओलांडून पलीकडे त्यांना जायचं होतं.

परंतु पुढे जाण्याकरिता काय करावं हेच त्यांना सुचत नव्हतं. त्याच स्थितीत कड्याबाहेरच्या टोकावर खाली दरीत लक्ष लावून निगूडा काही तरी विचार करीत होता. तेवढ्यात दरीच्या खाली लोंबणाऱ्या झाडाच्या एका फांदीवरून एक लहानसा प्राणी सरसरत खाली उतरताना निगूडाने पाहिला. आणि त्याच वेळी त्याच्या डोक्यात एकदम काहीतरी चमकून गेलं!

मग साऱ्यांनी मिळून एका मोठ्या झाडाची चिवट साल काढली. त्या सालीचं एक टोक वर धरून, एका माणसाने खाली लोंबणाऱ्या सालीच्या दुसऱ्या टोकापर्यंत त्या लहानशा प्राण्याप्रमाणे सरसरत खाली जायचं; असं त्यांनी ठरविलं. आणि शेवटच्या माणसाने सालीचं वरचं टोक खंबीरपणे झुडपाला गुंतवून खाली यायचं. मग बराच वेळ प्रयत्न करून ती सारी माणसं खाली दरीच्या तीरावर पोहोचली. त्यांच्या साऱ्यांच्या चेहऱ्यावर आज एक वेगळाच आनंद नाचत होता.

एक मोठी युक्ती त्यांना सुचली होती आणि ती त्यांनी राबवली होती!

नदीच्या पाण्यात लाकडांचे ओंडके टाकून त्यावरून ते हळू हळू दुसऱ्या तीरावर जाऊन पोहोचले. आणि मग मागे वळून डोळे भर-भरून त्या डोंगराच्या सुळक्याकडे, त्या खोल दरीकडे आणि निळ्या काळ्या नदीच्या विस्तीर्ण पात्राकडे एका प्राथमिक विजेत्याच्या नजरेनं पाहू लागले. तिथून पुढे ते कित्येक मैल चालून गेले. त्यानंतर त्यांना तिथे अत्यंत दाट जंगल लागलं. तिथे त्यांनी अगदी जरूरी पुरतीच अत्यंत जुजबी शिकार केली. आणि पुन्हा ते पुढे चालू लागले.

आता त्यांना पुन्हा समोर पसरलेल्या डोंगरावर चढायचं होतं. एव्हाना त्यांनी तीन चार वस्त्या टेहेळल्या होत्या. परंतु पूरियाचा पत्ता लागलेला नव्हता!

निगूडा निराश होत चालला होता. तशांत दिवसही मावळला. मग त्या रात्री त्याच जंगलात एका मोठ्या झाडावर चढून त्यांनी रात्र काढली.

तीन-चार दिवस ते भटकत होते. निगूडाच्या बरोबरीची माणसं आता कंटाळली होती. वस्तीपासून फारच दूर झुकल्यामुळे त्यांचा आधार तुटला होता. त्याची त्यांना भीतीही वाटत होती.

परंतु निगूडा पुढे जाण्याचा हट्ट सोडायला तयार नव्हता. तो आता खूप चिडला होता. अंतर्बाह्य चिडून निघाला होता. शेवटी चालण्याच्या नादात त्याच्या भोवती चोहोकडून डोंगराचा वेढा पडलेला त्याला दिसला तेव्हा ते सारेजण पुरतेच गांगरून गेले. मग भांबावलेल्या स्थितीत त्यांना कुठं जावं हेच कळेना. सुचेना!

आता मात्र इथून पुढे ते गेले असते तर पुन्हा कधीच त्यांना स्वतःच्या वस्तीवर पोहोचता आलं नसतं! दिशांचा त्यांना हळूहळू विसर पडू लागलेला होता!

तेवढ्यात एक लांडगा समोरच्या डोंगराच्या कपारीत घुसलेला त्यांना दिसला. लगेच त्यांची शिकारी वृत्ती जागृत झाली. आणि लांडग्याच्या पाठलागाला सुरुवात झाली. त्याचा माग काढीत त्या निमुळत्या दरीतून ते आत घुसले, आणि तिथेच डावीकडच्या दाट झाडीत त्यांना एक गुहा दिसली. तेवढ्यात लांडगा कुठेतरी अदृश्य झालेला होता! त्यांचा संशय होता की, तो गुहेत लपलेला असणार. परंतु त्या गुहेचं तोंड बरंच बंद होतं. अतिशय लहानशी फट फक्त दिसत होती. निगूडाने समोर जाऊन हळूच त्या फटीतून डोकावून आत बघण्याचा प्रयत्न केला. आत बराच अंधार असल्यामुळे स्पष्ट काहीच दिसू शकलं नाही. परंतु आतून कशाच्या तरी हालचालीचा आवाज येत होता!

आत काय आहे हे पाहाण्याची साऱ्यांनाच इच्छा झालेली होती.

मग मोठ्या शिताफिने त्यांनी गुहेच्या तोंडावरचा दगड बाजूला केला. दुसऱ्या दोघातिघांनी आतून हल्ला झाला तर बचावाचे पवित्रे घेतले. तो दगड जेव्हा बाजूला झाला तेव्हा आतलं दृश्य पाहून निगूडा एकदम स्तब्धच झाला! जागच्या जागी खिळून राहिला!

आत एकटी पूरिया अस्ताव्यस्त पडलेली होती. तिच्याजवळ तिनेच तयार केलेली काही हत्यारं पडलेली होती. ती सारखी तळमळत होती. तिचं पोट खूप मोठं दिसत होतं. जड झालेल्या आवाजात ती विव्हळत होती. गळाठून पडलेली होती!

दगड बाजूला झाल्यावरोबर तिनेही एकदम चमकून समोर पाहिलं! कुणी तरी शत्रू आला, प्राण जाणार या भयाने तिने एक किंकाळी फोडली. परंतु दृष्टीच्या टप्प्यांत आलेल्या माणसातला निगूडा जेव्हा तिला दिसला तेव्हा तर तिची भीतीनं गाळणच उडाली!

परंतु निगूडा मात्र त्या दृश्याकडे कमालीच्या शांततेने पाहात होता. खरं म्हणजे त्यावेळी पूरियाला पाहिल्याबरोबर त्याला त्वेष चढायला

पाहिजे होता. ज्या तऱ्हेनं पूरियानं त्याला गुंगारा दिला होता त्यामुळे तो भयंकर डिवचला गेला होता. आता पूरिया दिसल्याबरोबर त्याने तिचा चोळामोळा करायला हवा होता. परंतु तिचं ते स्वरूप, ती अवस्था, भयाण एकाकीपणांत तिनं घालविलेले दिवस, तिच्या भोवतालची एकंदर परिस्थिती, या साऱ्यांचा मिळून त्याच्या मेंदूवर एक वेगळाच परिणाम होत होता. असल्या प्रकारचे गूढ गंभीर फेरफार आजपर्यंत त्याच्या मेंदूत कधी झालेले नव्हते !

— म्हणूनच त्या वेळी तो भांबावून गप्प होता तोपर्यंत पूरिया भानावर आली होती. धडपडत उठून बसली होती. आणि टकमका, चक्रावलेल्या नजरेनं निगूडाकडे पाहात होती. जोरदार प्रतिक्रियांचा पहिला आवेग ओसरल्यावर तिला बराचसा धीर वाटू लागला. आज किती तरी काळाने ती माणसांचे हात, पाय, केस, डोळे, छाती, कमरा आणि चेहरेमोहरे पाहात होती ! एका चुकलेल्या माणसाला माणसाचा कळप सापडला होता ! सापडला होता खरा परंतु तो हव्या त्या माणसांचा नव्हता तर दुष्ट शत्रू असणाऱ्या माणसांचा होता. ज्याच्या चेहऱ्याकडे पाहाण्याची देखील तिला इच्छा होत नव्हती तो निगूडा तिच्यासमोर आज उभा होता. त्यानेच तर तिचं स्वातंत्र्य नष्ट केलं होतं. दुःखाच्या, भयंकर एकांताच्या खाईत त्यानेच तिला लोटलेलं होतं !

आज सात आठ दिवसांपासून तर तिच्या पोटात काही देखील नव्हतं. पोट कमालीच्या बाहेर वाढल्यामुळे शिकारीला तिला बाहेर पडता येणच शक्य नव्हतं. आता ती फक्त मरणाचीच वाट पाहात पडलेली होती. निगूडा जवळची शिकार पाहिल्याबरोबर तिच्या तोंडाला पाणी सुटलं. निगूडाने ते ओळखलं आणि तिच्यापुढे मासाचे काही तुकडे टाकले. त्याच्याकडून मिळालेलं मास तिला खावसं वाटत नव्हतं परंतु पोटात तर भुकेचा नुसता डोंब उसळला होता !

निगूडाने आणि त्याच्या साथीदारानी एका मोठ्या झाडाची अर्धी साल काढली. आणि त्या अर्धगोलाकृती सालीत त्याने पूरियाला जाम निजविली. वरून झाडांच्या लवचिक फोकांनी तिला चांगली बांधली. हे सारं करीत असताना ती थकलेली, संकटाच्या माऱ्यानं शिणलेली आणि आता एका जिवाला पोटात बाळगल्यामुळे पराधीन झालेली रानटी, जहांबाज स्त्री गप्प होती ! थोड्याच वेळात तिला अलगज खांद्यावर टाकून ती माणसं चालू लागली !

भर दुपारचं उन्ह तळपत होतं. तिच्या उताण्या पोटावर उन्हाचा मारा सारखा होत होता. आणि तिच्या डोळ्यांना आकाशातला तो तळपता सूर्य बघवत नव्हता. तिचा जीव सारखा कासावीस होत होता. पोटातून कळा निघत होत्या. निगूडा मधून मधून तिच्याकडे बघत होता. अशी बराच वेळ तिची तळमळ बघितल्यावर त्याने जवळच्या एका माणसाला पाणी घेऊन येण्यास सांगितलं. निगूडाच्या तोंडचे ते पाण्याविषयींचे शब्द ऐकताच पूरियाने एकदम त्याच्याकडे पाहिले. पोटभर पाणी प्याल्यावर तिचा आत्मा शांत झाला. आणि माणसाच्या सहवासाची किंमत तिच्या लक्षात आली.

दोन तीन दिवस चालून चवथ्या दिवशी सूर्य मावळण्याच्या वेळी ते आपल्या वस्तीजवळ पोहोचले. वस्तीवरचे लोक त्यांना फार दूरपासून हेरीत होते. या नवीन पद्धतीनं येणं अजून त्यांच्या परिचयाचं झालेलं नव्हतं ! आडवं येवढं मोठं धूड या लोकांच्या खांद्यावर कोणत्या वस्तूचं आहे याची त्यांना कल्पनाच करता येत नव्हती. बरं त्यामुळे ही माणसं आपलीच आहेत का कोणी शत्रू आहेत हेही ओळखता येत नव्हतं. त्या मावळत्या सूर्याच्या फिक्कट प्रकाशात क्षितिजावरून येणाऱ्या आकृत्यांकडे वस्तीवरचे सारे लहानमोठे लोक हैराण होऊन पाहात होते !

शत्रू असला तर एकीकडे बचावाची तयारी करीत होते. त्यांच्यात एक प्रकारचं कुतूहल आणि एक प्रकारची घबराटही निर्माण झालेली होती !

जेव्हा हे लोक अगदी जवळ पोहोचले तेव्हा त्यांनी निगूडाला एकदम ओळखलं. मग मुलामाणसांनी त्याच्या नावाचा मोठमोठ्याने जयघोष केला ! गेल्या कित्येक दिवसांपासून त्यांच्या वस्तीचा राजा त्यांच्यापासून दुरावला होता !

झोपड्यांच्या मध्यभागी पटांगणात या लोकांनी ती डोली ठेवली, तेव्हा आतील पूरिया लोकांना दिसली, रिशा व इतर स्त्रिया एकदम पुढे झाल्या आणि पूरियाला सोडवू लागल्या. त्या वेळी पूरिया वेदनांचा असह्य ताप सहन केल्यानंतर येणाऱ्या गुंगीत होती. रिशाने एकदा तिच्या पोटावरून हात फिरवून पाहिला. आणि तिला उठून बसवायला इतर बायांना सांगितलं. पूरियाची प्रसूतीची वेळ अगदी जवळ येऊन ठेपली होती.

उठून बसल्यावर ती भोपळाभर पाणी प्याली. परंतु थोड्याच वेळात ते पाणी उलटून पडलं. तिला उन्हाची चांगलीच बाधा झालेली होती. मग थोड्यावेळाने त्यांनी तिला एका गार झोपडीत नेऊन निजवली.

निगूडाला पूरियाच्या जिवाची काळजी वाटत होती आणि साऱ्या वस्तीला मात्र एक वेगळीच काळजी वाटत होती. निगूडा परत येण्याची ते वाटच पाहात होते. मग पूरियाची सारी व्यवस्था लागल्यावर केडाने निगूडाला झाडाखाली ओटीवर नेलं. त्याच्या भोवती मग इतर सारे लोक गोल बसले. आणि अत्यंत गंभीरपणे विषयाला सुरुवात झाली.

केडाने निगूडाला सांगितलं की, पूरियाला इथं आणण्यात आपल्या वस्तीवर एक फार मोठा धोका आलेला आहे ! आपल्याला स्वतःचे जीव वाचवावयाचे असतील तर पूरियाला लवकर इथून कुठेतरी दूर सोडून द्यायला हवं.

पण केडाचं म्हणणं निगूडाला पटत नव्हतं. किती प्रयासाने त्याने तिला मिळविली होती ते त्याचं त्यालाच माहीत होतं. शिवाय भ्याडपणा तर त्याच्या जवळपास फिरकू शकतच नव्हता. तर मग त्याच्या मनात कसलीही भीती शिरणं केवळ अशक्य होतं !

त्याने संतापून मान हलविली आणि केडाचं म्हणणं धुडकावून लावलं.

मग सर्वांनी मिळून निगूडाच्या विरुद्ध एकच गिल्ला केला. किती तरी वेळ त्या पेटत्या गोंधळाचा अर्थ निगूडाला समजला नाही. थोड्या वेळाने जरा शांत झाल्यावर पुन्हा केडाने त्याला सांगितलं—

—उदगा निघून गेला होता तो परत आला नव्हता. वस्तीवरून निमूवाही नाहीशी झाली होती.

उदगाचा आणि निमूवाचा उल्लेख झाल्यामुळे त्याला त्या दोघांच्या

आठवणी झाल्या आणि त्याच्या मनाला बराच धक्का बसला. पण लगेच तो पुनः सावरला.

त्यानंतर थोडा वेळ मध्ये थांबून केडाने पुन्हा वस्तीवर टेहेळणी झाल्याचं सांगितलं. आता तर खुद्द वडीगानेच वस्तीवर टेहेळणी केलेली होती !

वडीगाला पाहिल्याबरोबर वृद्ध केडाची देखील नजर फाकली होती ! एवढा मोठा धिप्पाड आणि भयानक माणूस त्याने अजून पाहिला नव्हता ! त्याच्यापुढे निगूडा अगदीच थिटा पडला असता.

वडीगाने जवळ जवळ दोन घटका वस्तीवर टेहेळणी केली होती. पूरियाचा संपूर्ण शोध घेतला होता. आणि ती नाही अशी खात्री करून घेतल्यावर ते लोक परतले होते !

या बातमीने निगूडा बराच वेळ स्तब्ध बसून राहिला. केवळ डोळे मिटून तो बसला होता. उलट सुलट विचार करण्याची सध्या त्याच्या मेंदूला ताकदच राहिलेली नव्हती ! पाच सहा दिवसांच्या सतत श्रमांचा खूप ताण त्याच्या शरीरावर आणि मेंदूवरही पडलेला होता. या बातमीने विश्रांतीऐवजी पुनः झुंज देण्याची तयारी करायला हवी हे निश्चित केलेलं होतं. शिवाय वडीगाशी झुंज म्हणजे ती काही सामान्य झुंज नव्हती, वडीगाची प्रसिद्धी तो ऐकून होता !

—परंतु या वेळी त्याला भयंकर भूक लागलेली होती. अगोदर साऱ्यांवर ओरडून त्याने खाण्याची तयारी करायला लावली. मग सारी माणसं शिकार भाजण्यात व्यग्र झाली. थोड्याच वेळात त्या वस्तीत अग्नीची ऊब भरली. भाजलेल्या मासाचा वास दरवळू लागला. आणि पोराटोरांसकट सारी वस्ती खुशीत न्हाऊन निघाली !

खाणं संपण्याच्या बरंच अगोदर आतून बायांची गडबड कानी येऊ लागली. मग साऱ्यांचं लक्ष त्या झोपडीकडे वेधलं.

बऱ्याच वेळाने पूरियाला मुलगा झाल्याची बातमी त्यांच्या कानावर आली !

सारं खाणंपिणं आटोपल्यावर निगूडा शांतपणे पूरियाच्या विचाराभोवती गुंगून पडला. मधूनच उदगाचीही त्याला आठवण येऊ लागली. वडीगाच्या चालीमुळे तर त्याला उदगाची फारच आठवण होत होती !

उदगा कुठे गेला असेल ? आणि इतका काळ लोटल्यावर वडीगाची आपल्या वस्तीवर टेहेळणी का व्हावी ? आणि नेमके पूरियाच्या शोधाकरिता गेल्यावरच का व्हावी ? त्यांतूनही स्वतः वडीगाने येऊन जावं यात निगूडाला बराच अर्थ वाटत होत" !

बराच वेळ असाच विचार करून शिणल्यावर त्याच्या डोक्यांत थोडा थोडा प्रकाश पडू लागला. या साऱ्या हालचालींचा उदगाच्या एकदम नाहीसा होण्याशी काही तरी संबंध असावा असा त्याला संशय येऊ लागला. मग मात्र त्याला उदगा हातचा निसटला याचं फार वाईट वाटलं ! परंतु इतकंही असून उदगा वडीगाच्या वस्तीला मिळणं अशक्य आहे, असंही त्याचं मन त्याला सांगत होतं !

खरं काय असावं आणि काय नसावं याचा निर्णय लागण्याच्या आतच त्याला झोप लागली. आणि थोड्या वेळाने तर तो चक्कपणे घोरू लागला !

¤

: १७ :

पूरिया झोपडीत अंधारात आपल्या बच्चाला कुशीत घेऊन पडली होती. त्याची वळवळ, त्याचं बारीक, किरटं रडणं, त्याच्या हाताच्या इवल्याशा मुठीकडे पाहाताना, तिने जंगलात एकटी फिरत असतांना पाहिलेल्या एका पाखराच्या तीन इवल्याशा पिलांची तिला आठवण होत होती. आणि तिला गुदगुल्या होत होत्या. शत्रूच्या गोटांत देखील तिला आपल्या बच्चाचा सहवास सुखवीत होता ! त्या इवल्याशा मुलाने डोळे उघडले की त्या काळचा बुबुळांकडे पाहून तिला वडीगाची आठवण होत होती. आणि त्या पोराला कुठे ठेवू आणि कुठे नको असं तिला होत होतं !

मागे जंगलात एकटी भटकत असतांना पोटाचं ओझं जसजसं वाढू लागलेलं होतं, तशी ती घाबरत होती. आणि दम छाटीत होती. ते एक फार मोठं संकट त्या वेळी तिला वाटत होतं. पण आज त्या बच्चाकडे पाहातांना तिला त्या वेळच्या संकटांचा पार विसर पडला होता !

तसंच मागे एकटी भटकत असतांना, आणि शून्यपणे गुहेत स्वतःला कोंडून घेऊन बसली असतांना तिच्या अपरिपक्व मनात मागचे काही विचार तुरळकपणे तरळून जात होते. तिच्या वस्तीची तिला आठवण येत होती. वडीगाच्या सहवासाची, त्याच्या बलिष्ठ अलिंगनांची, त्याच्यापासून मिळालेल्या शारीरिक सुखाच्या तिला आठवणी येत होत्या. त्यानंतर वस्तीवरची इतर माणसंही तुरळकपणे तिला आठवत होती. कधी कधी तर एकटेपणाचं दडपण असह्य झालं की, अक्षरशः तिच्या डोळ्यांपुढे निगूडाच्या वस्तीवरची माणसं देखील येऊन ठाकत होती ! कधी कधी तिला स्वप्नं देखील पडत होती. आणि कित्येकदा वडीगाबरोबर ती स्वप्नात शिकारीला गेली होती ! पहिल्या वेळी जेव्हा तिला असं स्वप्न पडलं, तेव्हा ती खाडकन जागी झाली. आणि त्या काळचा रात्री एकटीच वडीगाला शोधीत धावू लागली.

—वडीगा आपल्याजवळ आला कसा ? आणि आता एकदम नाहीसा झाला कसा हेच तिला समजेना ! म्हणून उरलेली सारी रात्र तिने वडीगाच्या शोधांतच घालविली !

मग सकाळ झाली. चोहोकडे प्रकाश फाकला. पक्ष्यांची किलबिल सुरू झाली. एका काटेरी झुडुपांत एका पक्ष्याचं घरटं होतं. त्या घरट्याकडे दोन्ही पक्षी आळीपाळीनं उडत होते आणि चोचीतलं खाद्य आळीपाळीनं आपल्या पिलांना भरवीत होते !

तिच्या गुहेसमोरचं ते काटेरी झुडूप, त्यावरचं ते घरटं, त्यांतली ती लाल लाल पिलं, आणि त्यांना भरविणारे ते दोन पक्षी, पुढे किती तरी दिवस पूरिया पाहात होती. तेव्हा तिचा तो एक आवडता छंदच झालेला होता.

आपल्या मुलाच्या स्पर्शात तल्लीन असताना तिला जंगलातल्या प्रसंगाच्या किती तरी आठवणी येत होत्या !

—निगूडाचे सारे व्यवहार पूर्वीप्रमाणेच चालले होते. पूरियाला हस्तगत केल्याच्या कैफात तो गुंग होता. एकीकडे त्याला वडीगाची धास्ती वाटत होती. म्हणून आताशा तो मुद्दामच लांबलांबच्या शिकारीवर जात नव्हता ! आपल्या माघारी वडीगा आला तर

पूरियाला घेऊन जाईल व आपली वस्तीही उद्‌ध्वस्त करील याची त्याला काळजी वाटत होती.

मग कुठे नदीत मासे धर, पक्षी मार, पुढच्या जंगलातील कंदमुळं उकरून आण, असेच साधे व्यवहार तो करीत राहिला होता.

चार महिन्यात त्या वस्तीवर काहीसुद्धा नवं जुनं घडलं नाही. पूरिया मात्र हळू हळू शरिराने आणि मनाने बदलत होती. तिचं मूल आता बरंच मोठं झालं होतं. त्या मुलापुढ तिला आता इतरांची काही देखील पर्वा वाटत नव्हती !

या वस्तीत आणि विशेषतः निगूडाच्या सहवासात तिचं मन मुळीच रमत नव्हतं ! पण नुकत्याच एका मोठ्या भयानक तुरुंगवासाचा तिने अनुभव घेतलेला होता, त्यामुळे आता निदान आपण माणसांच्या तरी सहवासात आहोत याचं तिला समाधान वाटत होते; परंतु निगूडाला वश होण्याची कल्पनादेखील तिच्या मनात शिरत नव्हती. तिच्या स्वतःच्या वस्तीवर ती नुसतीच वडीगाची लाडकी नव्हती तर वडीगाच्या खालोखाल तीच शक्तिमान होती. तिचं काळीज जरी स्त्रीचं होतं तरी धाडस पुरुषाचं होतं !

आपल्या जीवनात पुरुषाच्या आलिंगनाचं सुख तिनं उपभोगिलं होतं तसंच धाडसी जीवनही उपभोगिलं होतं. आणि सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे, स्त्री जातीतील त्या पहिल्याच स्त्रीने भयानक एकांतही भोगला होता.

म्हणून आता ती जी माणसात आली होती ती पार बदलून आली होती ! तिथं वावरत असलेल्या पाचपन्नास बायांच्या, आणि मागच्या काही पिढ्यातील स्त्रियांच्याही जे अनुभवात आलं नसेल ते सारे अनुभव घेऊन पूरिया एक प्रकारे समृद्ध ाली होती !

आता ती हळू हळू काही कामही करू लागली होती !

गेल्या दोन दिवसापूर्वी तर तिने एकाएकी धाडकन नदीत उडी घेतली होती आणि दोन चार घंटे मनसोक्त पोहून सारं अवघडलेलं, दुबळं झालेलं अंग मोकळं करून घेतलं होतं. तिच्या या कृत्याचा तिथल्या स्त्रियांवर एक वेगळाच परिणाम झाला होता. तिच्याकडे पाहून पूरियाची वस्ती ही निश्चित आपल्या वस्तीपेक्षा चांगली असली पाहिजे असं वाटू लागलेलं होतं !

आणि त्या दिवसापासून निगूडाचंही मन परत तिच्यावर खिळून राहिलं होतं. प्रथम त्याने तिला पाण्यात पोहतांनाच पाहिली होती !

आजही पूरियाला पाण्यात पाहून तो बेभान झाला होता आणि त्यानेही नदीत उडी ठोकली होती, परंतु तो नदीत आल्याबरोबर पूरिया पाण्याबाहेर आली, आणि कडक उन्हात अंग वाळवीत बसली. सारं अंग वाळल्यावर ती झोपडीत परतली, आणि मुलाला कुशीत घेऊन शांतपणे पडून राहिली.

निगूडा मात्र अंतर्बाह्य तापला होता. अपमानाने आणि कामवासनेनं तो पुरताच पेटून निघाला होता. मग तो सरळ पूरियाच्या झोपडीत घुसला. तेव्हा एखाद्या व्यालेल्या वाघिणीसारखी पूरिया त्याला दिसली. तिचे डोळे निखाऱ्यासारखे आग ओकीत होते. आणि तिचे लांब सुटलेले केस मागून येऊन तिच्या निबर छातीला चिकटले होते. क्रोधाने सारखी वरखाली होणारी तिची छाती निगूडा पाहातच राहिला. त्या वेळी तरी तिच्या अंगाला हात लावण्याची त्याची हिंमत झाली नाही !

परंतु त्याचे मन तिच्या सहवासातून दूर होण्यासही तयार होत नव्हते. तिच्या लाल डोळ्यांची आणि रागावून बेभान झालेल्या चेहऱ्याची त्याला मुळीच भीती वाटत नव्हती ! तो एका वस्तीचा नेता होता. उत्तम शिकारी होता. जीव धोक्यात घालून विजय मिळविणारा धाडसी वीर होता. तो एका सामान्य स्त्रीला भिणे शक्यच नव्हते !

मग आताच पूरियावर सरळ हल्ला करण्याचे त्याला का धाडस होत नव्हते ? आतापर्यंत एखादी गोष्ट हस्तगत करण्याकरिता त्याचे मन कधीच कचरलं नव्हतं ! मग आजच पूरियाच्या बाबतीत अशी कच खाणाऱ्या मनात असे काय बदल घडून आले आहेत हेही त्याच्या लक्षात येत नव्हतं !

उलट एकीकडे तिचा त्याला राग आलेला होता, संताप आलेला होता; आणि दुसरीकडे मात्र तिच्याविषयी त्याला काही तरी वेगळेच वाटत होते ! खोल कुठे तरी मनात तिच्याविषयी आपुलकीचं काही तरी दडून बसलेलं होतं—आणि आता या क्षणी त्या आत आत दडलेल्या भावनेने त्याच्या साऱ्याच शरिराचा जणू तावाच घेतला होता ! आणि एखाद्या शक्तिमान व्यक्तिपुढे उभं राहावं तसं आपण पूरियापुढे उभे आहोत अशी जाणीव त्याला जेव्हा एकदम झाली तेव्हा तर तो मनात खूपच चरफडला !

आणि त्या उद्दाम उर्मीच्या भरात त्याने हाक मारली,

'पूरिया !'

त्याच्या आवाजातला कंप आणि भेदकता दोन्हीही तीक्ष्ण शस्त्राप्रमाणे होती. त्या आवाजाबरोबर पूरियाच्या जवळ परंतु तिला अगदी भिडूनच बसलेल्या तिच्या छोट्या मुलाने एकदम घाबरून वर बघितलं. त्याची आणि निगूडाची दृष्टादृष्ट झाली आणि त्या मुलाचे ओठ रडण्याकरिता फुगीर होऊ लागले. परंतु निगूडाचा त्याला एवढा धाक बसला होता की, त्याच्या रडू येणाऱ्या भावनावरही कोणी तरी जडशीळ दडपण ठेवल्याप्रमाणे ते रडे आतल्या आतच अडकून पडले !

आणि ते मूल टकमक निगूडाच्या चेहऱ्याकडे नुसते पाहातच राहिले !

पूरियाचे ऊर खालीवर होऊ लागले. आणि तिचाही संताप अनावर झाला. त्याला काय उत्तर द्यावे हे क्षणभर तिला सुचले नाही; पण पुढे सुचले तेव्हा अगदी सर्व राग मनातल्या मनात दाबून ती फक्त एवढेच म्हणाली,

'काय आहे ?'

'मी तुझ्या समोर उभा आहे !'

'ते दिसलं ! पुढं काय ?'

'तू नदीवरून जीव घेऊन पळून का आलीस ?'

'त्याचं कारण तू क्रूर आणि दुष्ट आहेस !'

'पण आता माझ्याशिवाय तुला दुसरं कोण आहे ?'

निगूडाचे असे निराधार करणारे वाक्य ऐकून त्याला काय उत्तर द्यावे हे बराच वेळ पूरियाला सुचले नाही. परंतु तिला त्याची भीती मुळीच वाटली नाही. उलट आपला अपमान होत आहे यामुळे ती चिडली होती. परंतु आपला मुलगा आपल्या जवळ आहे या एका भावनेमुळे ती बरीच शांत होती. ती जर एकटी असती तर या

क्षणाला तिने निगूडाशी चांगलीच झटापट केली असती !

आपल्या मुलाकडे पाहात ती निगूडाला एवढेच म्हणाली,

'तू बाहेर हो. नाही तर मांजरासारखं तुझं नरडं फोडीन !'

तिचं ते बोलणं आणि नजरेतला खुनशीपणा पाहून निगूडाला पुढे काही बोलण्याचे धाडस झाले नाही! फक्त आपल्या डाव्या तळव्याने त्याने तिच्या पायावर एक जोराचा प्रहार केला; आणि दुसऱ्याच क्षणी तो तिच्यापासून विजेसारखा नाहीसा झाला !

आता पूरियाचा मुलगा बराच मोठा झाला होता. झोपडीतल्या झोपडीत रांगत होता. परंतु अजूनही पूरियावर सक्त पहारा होता ! बाहेर कंदफळांच्या मोहिमेवर सारे निघाले तरी बरोबर निगूडा असे आणि पूरियावरोवर आणखी स्त्रिया असतच ! एकीकडे काम करताना दुसरीकडे पूरियाच्या कामावर आणि तिच्या हालचालीवर नजर ठेवली जात असे !

आज पुन्हा निगूडा कामवासनेनं पेटला होता. एकीकडे जरी तो कंद उपटण्याचे काम करीत होता, तरी त्याचं सारं लक्ष पूरियाच्या हालचालीकडेच होतं. तीही कंदफळं उपटीत होती. तिची छाती, डोळे, मांड्या, यावेळी तिचं सारंच काही निगूडाला वेगळंच दिसत होतं. त्याला ते सारं हवं हवंसं वाटत होतं. कामावरचं त्याचं लक्ष पार उडत चाललं होतं. इतर सारी माणसं मात्र कामाचा झपाटा उडवीत होती.

तेवढ्यात पूरिया एकदम उठून उभी राहिली. बेभान होऊन चोहोकडे पाहू लागली. समोरच्या झाडावर एक माकडी आपल्या पिल्लाला छातीशी धरून पाजीत होती आणि मोठ्या ममतेनं त्याच्या भुरकट डोक्यावरून हात फिरवीत होती ! पूरियानं तिच्याकडे पाहिलं आणि तिचं सारं शरीर एकदम तटतटून उठलं ! तिच्या साऱ्या शरीरातून शिरशिऱ्या उठत होत्या आणि चेहरा तांबडा पडू लागला होता. ही स्थिती तिला अधिक वेळ सहनच करवली नाही. मघापासून निगूडा तिच्या या हालचालीकडे पाहात होता. तेवढ्यात पूरियाने आपल्या हातातला एक कंद जोरात दूर भिरकावून दिला आणि दोन्ही हात छातीवर दाबून ती जोरजोरात छाती चोळू लागली. एका क्षणात तिची सबंध छाती दुधाच्या पांढऱ्या धारांनी फेसाळून निघाली.

तो दुधाचा पांढरा रंग पाहाताच ती धावतच सुटली, तिच्या मागे चार दोन स्त्रिया आणि स्वतः निगूडाही धावू लागला. वस्तीवर गेल्यावर अगोदर त्या दुधाच्या ओल्या ओल्या चिकट हाताने तिने आपल्या बच्चाला उचललं आणि त्याला छातीशी घट्ट घट्ट आवळून धरलं ! तो एकच क्षण ! तिचं सारं शरीर मोकळं झालं. सर्व शरीरभर कसले तरी प्रवाह वाहत आहेत आणि आपल्याला गुदगुल्या करीत आहेत अशी तिला भावना झाली आणि तिच्या चेहराभर हंसू फुललं !

—आणि ते मूल घटाघटा तिची छाती चुरून दूध पिऊ लागलं ! ◻

## : १८ :

हे सारे दृश्य पाहिल्याबरोबर निगूडाच्या डोक्यात प्रकाश पडला. आणि पूरियाच्या छातीला चिकटलेल्या त्या पोरावर तो दातओठ खाऊ लागला. पूरियाचा सारा जीव त्या पोरावर होता आणि ते पोर निगूडाच्या प्रतिस्पर्ध्याचं होतं. त्या पोराच्या अनुषंगाने जशी निगूडाला वडीगाची आठवण झाली तशीच पूरियालाही होत असली पाहिजे आणि त्याच एका आधारावर ती एवढ्या तोऱ्यात वागत असावी एवढा तर्क त्या प्रसंगामुळे निगूडाला लढविता आला.

पूरियाला संपूर्ण दुबळी केल्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. तोच एक विचार मग निगूडाच्या मनात राहिला !

त्यानंतर एके दिवशी संधी साधून त्याने रानबोक्यासारखं त्या पोराला पकडलं आणि झाडाच्या खोडाला दोन तीन वेळा आपटून खळखळणाऱ्या नदीच्या प्रवाहात टाकून दिलं !

आपलं मूल नाहीसं होण्याने पूरियाच्या मनाला फार मोठा धक्का बसला. ती सुस्त होऊन सुन्नपणे दोन दिवस झोपडीतल्या अंधारातच पडून राहिली. इथं शक्तीचा काही उपयोग नाही हे तिच्या ध्यानात आलेलं होत. स्त्रीमधला आणखी एक दुबळेपणा आता तिच्यापुढे उघडा झाला होता !

बसल्या बसल्या तिला सारख्या आपल्या मुलाच्या आठवणी येत होत्या. त्याचं तुरू तुरू चालणं, ओठावर ओठ घट्ट दाबून इवल्याशा मुठी घट्ट आवळणं, पूरिया दिसली की खळखळून हसणं आणि अनावर वेगाने तिच्याकडे धावत जाणं, काही खाताना भांडण करणं आणि आपल्या शक्तीची चमक दाखविणं, त्याची सारी अंगलट पूरियासारखी होती; परंतु त्याचे डोळे आणि हनुवटी वडीगासारखी होती. त्यामुळे त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं की, पूरियाला वडीगाची आठवण येत होती ! आपल्या वस्तीची आठवण येत होती, आणि मग तर तिला इथली सारी माणसे दूरची वाटत होती. निगूडा तर शत्रूच वाटत होता.

परंतु मूल गेल्यापासून जणू ती पूर्णपणे मालवली होती ! तिच्या कुठल्याही हालचालीत जीवच राहिला नव्हता ! फक्त आतून मुलाची जोराने आठवण झाली की तिला रडू कोसळत होतं. मग ती कधी मुसमुसून रडत होती, तर कधी मोठमोठ्याने ओक्साबोक्सी रडत होती !

येवढ्याच तिच्या हालचाली आणि तिचे अस्तित्व उरले होते !

—तेवढ्यातच हल्ला आल्याच्या बातमीनं साऱ्या वस्तीला एकदम हादरा बसला होता ! मग दोन तीन तरुण साथीदारांना घेऊन निगूडा पूरियाच्या झोपडीत घुसला. अत्यंत क्रूरपणे त्याने तिला चहूकडून जखडून टाकलं आणि भाले, बर्ची, तीर वगैरे हत्यारं घेऊन ते धांवतच बाहेर निघून गेले.

वडीगा आपल्या शेलक्या पाच दहा जवानांनिशी निगूडाला टक्कर द्यायला आला होता. त्याला निगूडाच्या माणसांनी चहूकडून एकदम घेरून टाकलं. थोड्याच वेळात त्या दोघा शत्रूंत लढतीला सुरुवात झाली. एका मोठ्या, नेहमीच्या वडाच्या झाडाखाली ही लढत चालली होती. साधारण तीन चार घटका दोघांचे लोक घामाघूम होऊन लढत होते. निगूडाची दोन तीन माणसं टरारा फाटून मातीत लोळली होती. वडीगा तीक्ष्ण हत्यारांनी हल्ल्यावर हल्ले चढवीत होता. त्यांना परतविताना निगूडाची फार त्रेधा उडत होती. वडीगाएवढा थोराड माणूस त्यानेही अद्याप पाहिला नव्हता !

आता तर त्या दोघांतच जुंपली होती. एकमेकांवर निकराने भाल्याचे वार होत होते. आणि तेवढ्याच सफाईनं ते परतविलेही जात होते !

शेवटी वडीगाच्या भाल्याचं तीक्ष्ण टोक निगूडाच्या डाव्या दंडाला चाटून गेलं. आणि दुसऱ्याच क्षणाला एका तीक्ष्ण हत्याराचा मारा त्याच्या मस्तकावर व्हायच्या आतच, वर चढून बसलेल्या निगूडाच्या दोन माणसांनी वडीगाच्या अंगावर उडी घेतली. आणि हत्याराचं जळजळीत, लखलखीत टोक त्याच्या धडधडणाऱ्या छातीत घुसवलं !

एका लाल गडद रक्ताच्या चिळकांडीबरोबर वडीगाचं धूड जमिनीवर कोसळलं. वडीगाला रक्ताच्या थारोळ्यात बुडलेला पाहिल्याबरोबर त्याच्या राहिलेल्या साथीदारांच्या नजराच फाकल्या. आणि आल्या वाटेनं ते धूम पळत सुटले. पाहाता पाहाता दिसेनासे झाले. घटका दोन घटकातच तळमळून वडीगा प्राणास मुकला !

—आणि वडीगाच्या मृत्यूच्या कैफाने निगूडा बेभान झाला. खंडीभर श्वापदांचं शौर्य आपल्या अंगात आहे याची जाणीव त्याला गुदगुल्या करू लागली !

त्या सबंध दिवसात मग निगूडाच्या वस्तीवर खूप नाचरंग झाला. खाणंपिणं झालं. पूरिया मात्र एका विलक्षण स्थितीत त्या साऱ्या धमालीकडे पाहात राहिली. तिचा मेंदू पार बधीर झाला होता. जगण्या मरण्याचं रहस्य तिला उलगडत नव्हतं. आपली सत्ता किती मर्यादित आहे एवढ्या एकाच जाणिवेनं तिच्या मनात पिंगा घालायला सुरुवात केली. तिचा मुलगा नाहीसा झाला होता. तिचा वडीगा निष्प्राण होऊन जमिनीवर पडला होता. रानावनात ती एकटचाने जीवन कंठू शकत नव्हती. सहवास हवा होता आणि तडजोडही हवी होती. केवळ दुसऱ्याची होऊन राहाण्यापलीकडे तिला व्यक्तित्व राहिलेलं नव्हतं.

एकांतवासात निसर्गाच्या शक्तीशी सामना देताना ती दुबळी ठरली होती, आणि आज शक्तीवान पुरुषाच्या शक्तीशी देखील तिला सामना देता येत नव्हता !

जगायचं असेल तर सामना देऊन जगण्याची धमक पाहिजे. नाही तर मरणाची तयारी पाहिजे. आता पराधीन होऊन जगणं किंवा झगडा करून मरणं या व्यतिरिक्त तिसरा मार्ग नव्हता !

निगूडाच्या हालचालीकडे ती अत्यंत भेसूर नजरेनं पाहात होती. ती स्त्री पूर्णपणे भेदरली होती, खरी खरी निराधार झाली होती. बधीर, सुन्न होऊन आतल्या आत नुसते उसासे टाकीत होती. आता निगूडाविषयी वाटणारा तिटकारा कुठच्या कुठे गेला होता. आता फक्त त्याच्याविषयी भीती उरली होती. तिच्यात असलेल्या धीर, शक्ती, स्वातंत्र्य या साऱ्या भावनांची जाणीव कुठे तरी विरघळत चालली होती !

—आणि त्याच अवस्थेत, त्याच रात्री तिच्या झोपडीत शिरलेल्या निगूडाच्या व्यक्तित्वाचा तिने, अत्यंत थंडपणे, नव्यानेच उदीत झालेल्या सोशिक वृत्तीने, थरथर कापणाऱ्या हरिणीच्या पवित्र्यात स्वीकार केला. त्या साऱ्या व्यवहारातून मग तिच्यात जे काही उरलं ते अत्यंत पराधीन, अत्यंत दुबळं, सोशिक, गंभीर स्त्रीत्व उरलं ! ती सबंध रात्र पूरिया तळमळत होती. तिला झोप येत नव्हती. छोट्या मुलाच्या आठवणी येत होत्या. वडीगाच्या मृत्यूचा तर तिला विसर पडणेच शक्य नव्हते ! त्याच्या साऱ्या हालचाली तिच्या डोळ्यांसमोर ताज्या होत्या. —परंतु आता या माणसांतच तिला राहायचं होतं ! निगूडाशी तिला मिळतं जुळतं घेणं आवश्यक होतं आणि आता रात्री त्याच्या सहवासात स्वतःच्या मनाविरुद्ध ती तेच करीत होती !

मग उंडारलेला निगूडा मोठ्या सकाळीच दुप्पट शौर्याने मोठ्या शिकारीस निघाला !

## : १९ :

तो साऱ्या जंगलातून, रानावनातून, दऱ्याखोऱ्यातून थडाथडा चालत होता. सात आठ माणसं त्याने आपल्याबरोबर घेतली होती. कालच्या विजयाची धुंदी अजून त्याच्या डोळ्यांतून उतरलेली नव्हती ! आज त्याला कशाचीच पर्वा वाटत नव्हती. स्वाभाविक अंगवळणी पडलेली दक्षता घेण्याची जाणीव देखील बधीर झालेली होती.

मोठमोठ्यांदा आरडत ओरडत ते चालले होते. मध्येच एखाद्या उंच झाडावर तीर सोडीत होते. मग विसावलेली पाखरं भराभर भराभर उडत होती. भीतीनं घाबरून जात होती. पाहाता पाहाता त्या दिग्विजयी मानवापुढून अदृश्य होत होती.

मग दूर कमरेइतक्या पिवळ्या कुरणात चरत असलेली हरणं, त्यांचं लक्ष वेधीत. थोडीफार धावाधाव होऊन, पांगापांग होऊन त्यांच्या निसटून जाण्याच्या वाटा हिकमतीनं रोखल्या जात. आणि शौर्याने फुललेल्या छातीजवळून धनुष्यातले बाण सुटत होते. सावजांच्या जिव्हारी जाऊन घुसत होते. मग तो सारा कळपच गलितगात्र होत होता. हैराण होऊन उधळू लागत होता. त्या शूर मानवांपासून स्वतःचा बचाव करण्याच्या हरप्रकारच्या धडपडीतून, कळपातून देखील फुटून निघत होता. आणि फुटून निघालेलं ते सावज नेमकं जमिनीवर लोळवलं जात होतं !

त्यांची ती जीव घेऊन पळून जाण्याची तऱ्हा पाहाताच निगूडाला आसुरी आनंद होत होता ! मग मोठ्या आवेशानं तो भाल्याचं टोक क्षणाक्षणाला हवेत खुपसून नाचत होता ! जखमी होऊन तळमळणाऱ्या हरिणाकडे पाहून तो खदखदा हसत होता.

आणखी पुढे सरकल्यानंतर एका नदीच्या अफाट पात्राजवळ ते आले. तिथं त्यांची चाहूल ऐकल्याबरोबर तीरावर स्वस्थपणे ऊन खात पडलेली कासवं पाण्याकडे धावण्याची एकच घाई करू लागली. त्यांची ती संथ गतीनं चाललेली धावपळ पाहून निगूडाला चेव चढला. एखाद्या चित्त्याच्या चपळाईनं तो तीराकडे धावत गेला. आणि त्यातल्या एका भल्या मोठ्या, अवजड कासवाला त्याने आपल्या भाल्याच्या तीक्ष्ण टोकाने उलटं केलं ! उलटं न होण्याची त्या कासवाची धडपड फारच केविलवाणी दिसत होती. निगूडाच्या शक्तीशी टक्कर घेण्याचं सामर्थ्य त्या बिचाऱ्यात नव्हतं ! मग पोट आकाशाकडे करून पडलेल्या त्या कासवाच्या पोटात ऐन मध्यभागी निगूडाने आपल्या भाल्याचं पातं खुपसलं. आणि छातीतून उतू जाणाऱ्या उन्मादाच्या जोषात त्याने त्या कासवाला तशाच स्थितीत वर हवेत उंच उचललं. आणि तो त्याला गरागरा फिरवू लागला !

तेवढ्यात नदीच्या पलीकडल्या तीरावरील झाडीतून चार लांडगे निगूडाकडे पाहात पाहात जीव घेऊन पळत सुटले. ती भोचक परंतु

क्रूर जात देखील आपली दहशत बाळगून आहे ही भावना मनात आल्याबरोबर निगूडाची छाती आणखी वीतभर फुगली. आणि पुन्हा जोरजोरात तो त्या बिचाऱ्या कासवाला हवेत फिरवू लागला.

आता ऐन दुपार झालेली होती. चोहोकडून ऊन चटाचटा करीत होतं. पोटातली भूक चढत होती. असा फारच थोडा वेळ गेला असेल. तेवढ्यात निगूडाला दिसून आलं की, चोहोकडे थोडा थोडा काळोख पडत आहे ! मग ती माणसं कावरी बावरी होऊन सभोवती पाहू लागली. वर आकाशात तर एकही ढग नव्हता ! मग अंधार का पडत होता ?

ती रात्र होण्याची तर वेळ नव्हती. मग अशी एकाएकीच रात्र का होऊ लागली आहे हे निगूडाला उमगेना. इथंच या ठिकाणीच रात्र पडली, अंधार कुट्ट झाला तर निवाऱ्याला जागा देखील नव्हती ! जवळपास तर एखादं देखील मोठं झाड दिसत नव्हतं.

रात्र होण्याचं हे संकट जितकं अनपेक्षित होतं तितकंच प्रत्येकाच्या पोलादी काळजात देखील भीतीचा धसका निर्माण करणारं होतं ! निगूडाचा तर आतापर्यंतचा सारा कैफ क्षणार्धात वितळून गेला होता.

मागे एका रात्री झालेल्या वादळाची त्याला एकदम आठवण झाली. ते विजांचे लोळ, अजस्र ढगांचा कडकडाट, पावसाचा राक्षसी मारा, आणि नदीच्या खवळलेल्या, फेसाळलेल्या पाण्याचा आवाज—हे सारं पाहून आणि ऐकून त्याला तेव्हा जितकं भय वाटलं होतं, त्यापेक्षाही कितीतरी पटीनं अधिक भीती आता त्याला वाटू लागली. कारण आज आता यावेळी ते केवळ पाच-सात जणच एका भयाण अरण्यात सापडलेले होते. पुढे काय होणार आहे याची त्यांना काहीच कल्पना करता येत नव्हती. निगूडाच्या हातातलं कासव आता कुठल्या कुठे गळून पडलेलं होतं. हळूहळू सारखा अंधार मात्र वाढत होता !

मग पुन्हा एकदा त्या साऱ्यांनी आपली भेदरलेली भिरभिरती दृष्टी वर आकाशात फेकली. आणि ते सूर्याकडे पाहू लागले. तेव्हा सूर्याचा नेहमीपेक्षा निराळा अती लहान तुकडाच विलक्षण तेजाने चकाकत असल्याचं त्यांना दिसलं. सूर्याकडे पाहिल्याबरोबर त्यातल्या चार-पाच जणांच्या डोळ्यांना टचकन पाणी आलं. ते पाणी पुसण्याकरिता त्यांनी हाताच्या मुठी वळवून डोळ्यांवर चोळल्या. आणि दुसऱ्याच क्षणाला त्यांच्यासमोर सारा अंधार झाला ! अंधार, अंधार म्हणत ते मोठमोठ्यांनी ओरडू लागले. निगूडाच्याही डोळ्यांना पाणी आलेलं होतं. परंतु अजून त्याच्या डोळ्यांपुढे अंधार पसरला नव्हता ! बाकीच्या दोघांना त्याने तेच विचारलं. त्यांनाही अजून झावळं झावळं दिसत होतं !

—मग बाकीच्या चौघांनाच का दिसत नव्हतं ?

त्या चौघांकडे पाहाताच निगूडाचा भीतीनं थरकापच उडाला !

हळू हळू चोहोकडे अंधार पसरू लागलेलाच होता. पुन्हा सूर्याला काय होतंय म्हणून देखील त्याच्याकडे पाहाण्याची त्यांना हिम्मतच होत नव्हती ! कारण त्या चौघांना अजिबात दिसत नव्हतं. त्याचं मूळ काहीतरी वरच्या सूर्यातच असलं पाहिजे एवढी भावना त्यांना झालेली होती. मग त्या अनपेक्षितपणे पसरलेल्या भीतीच्या वातावरणात त्या चौघा आंधळ्यांना तिथेच सोडून निगूडा आणि त्याचे दोन साथीदार जीव घेऊन वाट फुटेल तिकडे पळत सुटले ! कितीतरी वेळ ते सारखे सैरावैरा धावत होते. मागून त्या आंधळ्या साथीदारांच्या किंकाळ्या त्यांच्या कानांवर आदळत होत्या. शेवटी त्या देखील विरून गेल्या ! आणि मग चोहोकडे संपूर्ण अंधार पसरला !

लगेच ते तिघं एका मोठ्या झाडावर चढून बसले. अजूनपर्यंत त्यांनी काही खाल्लेलं देखील नव्हतं. आता किती वेळ त्या झाडावर तसंच पडून राहावं लागणार याची त्यांना कल्पना नव्हती. ही काही तरी फार मोठी आपत्ती आहे; आणि त्यातून आपला जीव वाचण्याची शक्यता नाही एवढी जाणीव त्यांना झाली होती. आणि प्रत्येकजण त्या भीतीनेच अर्धमेला झालेला होता !

परंतु थोडाच वेळ त्या कुट्ट अंधारात गेल्यानंतर पुन्हा हळू हळू प्रकाश फाकू लागला. या साऱ्या घटनांचा निगूडाच्या मनावर एवढा परिणाम झाला होता की, त्याला आपलं काय होणार आहे हेच समजेना ! एवढ्या मोठ्या अफाट विश्वात आपण किती लहान, निर्बल आहोत अशी नव्या जाणिवेची भावना त्या एकाच घटनेनं त्याच्या मेंदूत प्रसूत झाली !

आता वातावरणात चोहोकडे उजेड फाकला होता. पक्षी एकदा घाबरून झाडावर, आडोशाला बसले होते ते पुन्हा उडू लागले. थोडं थोडं ऊनही फाकू लागलं. परंतु वर मान करून सूर्याकडे पाहाण्याचं त्यांना भय वाटत होतं ! थोडासा उजेड होताच परत ते तिघं सुसाट धावत सुटले. ते सारखे दोन घटका धावतच होते. धावताना त्यांना कशाचंच भान नव्हतं ! धावून धावून ते अगदी घामाघूम झाले होते. आता चोहोकडे अगदी पहिल्यासारखाच उजेड, ऊन, ऊष्णता, सारं काही जाणवू लागलेलं होतं.

मग फार मोठं धाडस करून त्या तिघांनी एकदाचं सूर्याकडे पाहिलं. आणि चांगले घटकाभर मग त्या तळपणाऱ्या सूर्याकडेच पाहात राहिले ! विश्वाच्या त्या एकंदर गूढतेनं जे आव्हानं दिलं होतं, ते त्यांना स्वीकारता आलेलं नव्हतं ! निगूडा एक विजेता मानव तिथं अगदी थिटा पडला होता !

त्या घडामोडीनं त्याचा मेंदू मात्र चांगलाच हादरला होता ! कोणत्यातरी प्रगल्भतेकडे वळण्याचा मार्ग शोधीत होता !

आतां ते तिघेजण डोंगराच्या एका माथ्यावर चढले होते. भोवताली आणि खाली दूरवर पसरलेला तो विस्तीर्ण प्रदेश पाहून निगूडाला काहीतरी वेगळंच वाटत होतं. त्याच्या नेहमीच्या भावनेला, दृष्टीला एक फार मोठा हादरा बसला होता.

मागे एकदा डुक्कराची शिकार करून ते एका डोंगरमाथ्यावर चढले होते, तेव्हा त्यांच्याबरोबर उदगा होता. आता या एकंदर वातावरणाकडे पाहून निगूडाला ती मागची आठवण फार तीव्रतेनं झाली. तेव्हाची उदगाची ती शांत, धिमी आणि कोणतीही वखवख नसलेली छबी आठवली. आणि उदगा आपल्यापासून गेला याचं त्याला आता फार वाईट वाटलं !

अशाच विस्कटलेल्या मनानं तो त्या माथ्यावर चोहोकडे भटकत राहिला. त्यानंतर हळूहळू ते सर्वजण त्या डोंगराच्या पायथ्याला आले. तिथं चोहोकडे दाट जाळ्या पसरल्या होत्या. चार पाच डोंगरांच्या रांगा तिथं येऊन भिडल्या होत्या. तिथलं सारंच वातावरण अतिशय संथ आणि गंभीर होतं. एका कड्यावरून पाणी कोसळत होतं; परंतु पुन्हा सपाटीवरून शांतपणे खाली वाहत जात होतं. तिथूनच थोडंसं आत गेल्यावर त्याला तिथं एक मोठी गुहा दिसली. त्या गुहेच्या अगदी तोंडाजवळ एक उंच परंतु किडकिडीत झाड होतं. त्या झाडाकडे लक्ष जाताच, त्याच्यावर जे दृश्य दिसलं त्यामुळे निगूडाला एकदम हादराच बसला आणि तो खिळून जागच्या जागी थबकला !'

माणसाच्या हाडांचा एक सापळा त्या झाडाच्या एका फांदीला लटकला

होता. आणि हवेत डहाळीबरोबर हलत होता ! —इथं एवढ्या निबिड अरण्यात माणूस कसा काय आला आणि झाडावर चढून कसा मेला ?

हे कोडं निगूडाला सुटेना ! आता त्या दरीतून सोसाट्याचा वारा वाहू लागला होता. या वाऱ्यामुळे मघाचं ते शांत गंभीर वातावरण ढवळून निघत होतं. आकाशात चोहोकडे ढग जमत चालले होते. सूर्य पुनः त्या भुरकट ढगात लोपत चालला होता. आणि चोहोकडे शिराळाच्या पट्ट्या फिरत होत्या. इथं अंधार तर त्या डोंगरावर ऊन असा लपंडाव चाललेला होता. त्यामुळे वातावरणाला एक प्रकारची भेसूरता येत चालली होती. त्यातच वाढत चाललेल्या वाऱ्याचा भयानक आवाज नाचत होता.

त्या सनाट्यांतून स्वतःला थोडं बाजूला घेण्याकरिता म्हणून त्याचे पाय त्या गुहेकडे वळले. आणि तिथेही त्यांना एक भयंकर दृश्य दिसलं. गुहेचा दगड बाजूला कलंडून गेला होता. आतल्या अर्धवट प्रकाशात आणखी एका माणसाच्या हाडांचा सापळा आडवा पडलेला होता. त्या काळवंडलेल्या अंधारात तो सापळा फारच भयंकर दिसत होता.

त्याकडे एकटक पाहात ते तिघंही तिथं कुठल्या तरी अज्ञात शक्तीच्या दडपणाने खिळून उभे होते. तेवढ्यात आतून एक रानबोका तोंड विस्फारित बाहेर आला, आणि घाऱ्या डोळ्यांनी त्या माणसाकडे पाहात पाहात झाडीत निघून गेला !

बऱ्याच वेळाने निगूडा गुहेच्या थोडं आत शिरला. त्या हाडांच्या सापळ्याजवळच दगडावर कोरलेल्या काही आकृती दिसत होत्या ! आताच बाहेर गेलेल्या रानबोक्याप्रमाणे एक तिथल्या एका दगडावर हुबेहूब कोरलेला दिसत होता ! एवढ्या कोंदट, भीतीदायक वातावरणातही ते दृश्य पाहून निगूडाला काही तरी निराळंच वाटलं ! मग आणखी बारीक दगडावरच्या बऱ्याच आकृती त्याने पाहिल्या. बिबट्याचा नख्या उघडलेला पंजा, माकडाचं गोंडेदार शेपूट, झाडांची वेगवेगळ्या आकारांची पानं–आणखी कितीतरी वस्तु तिथे कोरलेल्या होत्या.

हे सारं वेगळंच दृश्य पाहून निगूडाचा मेंदू अक्षरशः गरगरू लागला. ते कोरीव काम त्याने मागे एक दोन वेळा आपल्याच वस्तीवरच्या अनेक झाडांच्या बुंध्यावर, दगडांच्या चौथऱ्यांच्या पृष्ठभागावर, काही दगडांच्या हत्यारावर देखील पाहिलेलं होतं. त्यात आणि येथील या कोरीव कामात काय साम्य आहे हे त्याच्या मेंदूत शिरण्यासारखं नव्हतं ! मात्र हे एकदम सारंच्या सारं दृष्टिसमोर आल्यावरोबर त्याला उदगाची आठवण झाली ! भिरभिरत्या नजरेनं तो आजूबाजूला पाहू लागला. आणि तेवढ्यात, तिथेच एका बाजूला पडलेला एक भाला त्याला दिसला. मग त्याच्याच पलीकडे दुसरा दिसला !

कसलाही दुसरा विचार मनात येण्यापूर्वीच त्याने ते दोन्ही भाले चटकन उचलून हातात घेतले. आणि एकाएकी तो मोठमोठ्याने ओरडू लागला. उदगाच्या नावाने सारख्या हाका मारू लागला ! तो भाला, ते तीर, ती हत्यारे, सारं सारं उदगाचं होतं, निमूवाचं होतं ! निगूडाला पक्कं माहीत होतं !

मग त्याच्या एकदम डोक्यात आलं की तो हाडांचा सांगाडा उदगाचाच असला पाहिजे ! आणि समोरच्या झाडावरचा दुसरा निमूवाचा असला पाहिजे. तो हे असले दगड कोरीत असता एखाद्या श्वापदाने त्यांच्यावर हल्ला केला असला पाहिजे ! –उदगा मेला !

पण तो जिवंतच आहे असा सारखा त्याला भास होत होता. त्याची मूर्ती लख्ख त्याच्या डोळ्यांपुढे उभी राहिली होती ! ती भक्कम छाती, तिच्यावरचं केसांचं जाळं, दंड, हात, पाय, डोक्यावरचे लांब लांब काळे काळे कुळकुळीत केस आणि त्याचा तो चेहरा– निगूडाची नजर मग त्या रानबोक्याच्या चित्रावरून, बिबट्याच्या पंजावरून, माकडाच्या शेपटीवरून आणि कोरलेल्या, झाडाच्या चित्रविचित्र पानांवरून आळीपाळीनं फिरत राहिली. आणि शेवटी हाडांच्या सापळ्यावर स्थिरावली.

त्याच्या मेंदूत कसल्या तरी अतिशय वेगवान हालचाली होत होत्या. छातीत कसला तरी आवेग दाटत होता. आणि त्या आवेगाच्या जोरदार झपाट्यातच त्याने एकदम उदगाच्या सापळ्यावर झेप घेतली. कडाडून, त्या सापळ्यालाच मिठी मारली ! आणि एक मोठ्या विचित्र आवाजाचा, वेगवेगळ्या, अनेक नव्या जुन्या भावनांच्या मिश्रणाने दाटलेला हुंदका त्याच्या तोंडून बाहेर पडला !

मग काही वेळ सारखे हुंदक्यामागून हुंदके दाटत गेले. त्यातच तो शूर रानटी मानव विरघळत गेला आणि तिथूनच त्याच्या त्या आतापर्यंतच्या ओबडधोबड व्यक्तित्वावर अनेक कोंब फुटले, एक नवाच पैलू तिथं आकार घेऊ लागला !

**स मा प्त**

---

# एक रबराचा तुकडा : पृष्ठ २७ वरून

पण मोटारमालकाचा शोध करावयास गेलेले इसम परत फिरले. तो कुठं गेला होता हे कुणालाच सांगता येत नव्हतं, पण ते गांगरले नाहीत. त्यांची प्रयत्नांची चिकाटी अवर्णनीय होती. आश्चर्य असं होतं की गाडी मात्र जागेवरच होती. ती मालकानं हलवली नव्हती. त्यांनी तेही आवाहन स्वीकारलं. मालक मोटारविना फार दूर वा फार काळ रहाणार नाही अशी त्यांची खात्री होती. आपल्या प्रत्यक्ष भेटीनंतर तो थोडा फार हादरला असणारच असंही त्यांना मनोमन वाटत होतं. विचारांती असा माणूस पळून जाण्यापेक्षा कायदा सल्लागाराकडं जाणं जास्त संभवनीय आहे. आणि कोणताही चांगला वकील त्याला हेच सांगेल की या प्रकारातून त्याची सुटका होणे कठीण आहे. त्यांनी त्याच्या पत्त्यावर चौकशी न करता आजुबाजूंची दुकानं आदी नित्याच्या ठिकाणी चौकशी सुरू केली. एके ठिकाणी त्यांना हवी ती माहिती लाभली. तो कोणत्या वकिलांच्या कचेरीत सल्ल्यासाठी जातो ते त्यांना समजलं, तिथं त्यांनी स्वतः जागता पहारा ठेवला.

एके दिवशी दुपार टळल्यानंतर एक इसम या कचेरीकडं जाताना त्यांना आढळला तो परिचित होता. त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेऊन सांगितलं, 'महाराज आपणास मी अटक करीत आहे !'

तो काहीच बोलला नाही. तो सर्व समजला. त्यांच्या बरोबर मुकाट्यानं तो गेला. सुरक्षा दलानं वाहतूक संकलनाच्या क्षेत्रात पहिलं पाऊल टाकलं ! त्यांनी हा नवा इतिहास घडवला होता. अन तो सुद्धा केवळ परिश्रमानं आणि अक्कल हुशारीनं मिळविलेल्या एका रबराच्या तुकड्यानं ! ! [ आधारित ]

# पाक्षिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. १६ ते ३१ जानेवारी १९७४**

## महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात बदल होईल

अंतरिक्षातील रवी हा श्रेष्ठ ग्रह असून तो राजकारणी आहे. रवी नुकताच मकर राशीत प्रविष्ट झाला आहे. याला मकर संक्रमण म्हणतात. यावेळी मकर संक्रात असते. ही संक्रात बरा व वाईट असा दुहेरी परिणाम घडवून आणते. माणसाच्या व राष्ट्राच्या जीवनातही. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात यावेळी बदल होईल किंवा त्यादृष्टीने जोराच्या हालचाली व खदखद सुरू होईल. हे बदल काही बाबतीत धोरणाला कलाटणी देणारे ठरतील. महाराष्ट्रात जनतेत असंतोष आहे. पण पोट निवडणुकीत यश मिळणे कठीण आहे. यश असेल ते त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे असेल. बेळगाव सीमा प्रश्न लांबणीवर पडणार असून महाराष्ट्राला "थोडासा" न्याय मिळणार आहे. पण तत्त्वाला धरून हा प्रश्न सोडवावा ही महाराष्ट्राची मागणी मान्य होणार नाही. कोणत्याही तत्त्वावर हा प्रश्न सुटणार वा सोडवला जाणार नाही. देशाच्या राजकारणात असंतोषाचा उच्चांक गाठला जाईल. पंतप्रधान इंदिरा गांधीच्या प्रभावाला अनेक प्रकारे धक्के बसू लागणार आहेत. उत्तर प्रदेशात त्यांनी रचलेला डावपेच थोड्याफार प्रमाणात उधळण्याची चिन्हे दिसू लागतील. पण राशीत (त्यांच्या) रवी असल्यामुळे त्यांची भाषा मात्र धमकीची राहील. केंद्र सरकारातही असंतोष खदखदू लागणार आहे. नियोजन मंडळाला एखादा जोराचा धक्का बसण्याची शक्यता आहे. रेल्वे मंत्री मिश्रा पंतप्रधानांच्या मर्जीतून उतरू लागतील. जगातील एखादा नेता पडद्याआड जाण्याची शक्यता आहे. भुट्टोंना धोका आहे. ◻

### मेष : औद्योगिक प्रगती

माणसांच्या जीवनात दैव चमत्कार घडवून आणते हे कुणीच नाकारू नये. स्वतःला पुरोगामी समजणारी मंडळी जाहीरपणे भविष्याची टर उडवतात आणि हळूच नियतकालिकातील भविष्य न विसरता वाचतात असा माझा अनुभव आहे. अर्थात याबद्दल त्यांना दोष देण्याचा हेतू नाही. सांगायचे तात्पर्य इतकेच की, दैव माणसाला चुकत नाही. किंबहुना दैवच माणसाला घडवीत असते. मित्रहो ! येते पंधरा दिवस आपल्या आयुष्यात बरेच काही चांगले घडवून जाणार आहेत. यापुढे तुमच्या जीवनात ज्याप्रमाणे निराशा राहाणार नाही त्याचप्रमाणे उध्वस्त झालेल्या मनोराज्याचे अवशेषदेखील मुळीच उरणार नाहीत. उलट महत्त्वाकांक्षेची नवी नवी क्षितिजे तुमच्यासमोर चमकू लागणार आहेत. हा पंधरवडा आपणास उद्योगांच्या औद्योगिक क्षेत्रात नवा पर्वकाळ ठरणार आहे हे लिहायला मला आनंद वाटतो. गेल्या १४ दिनांकास रवीचे मकरसंक्रमण घडले आहे. तुमच्या दशमस्थानी मकर राशीत हे संक्रमण पडले आहे. दशमस्थान हे नोकरी धंद्याचे क्षेत्र आहे. तेथे रवी आला आहे. तो अनेक चमत्कार घडवून आणणार आहे. तुमच्या औद्योगिक योजना आकार घेऊ लागणार आहेत. अनेक अडचणीमुळे थबकलेले उद्योग आता प्रगतीचा वेग घेणार आहेत. पैसा तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, जागा, कामगार वा मालक सहकार्य उत्तम पैकी मिळणार आहे. तुम्हाला नवा कारखाना, वर्कशॉप अगर इतर काही सुरू करायचे असेल तर त्याला हा काळ अनुकूल आहे. आर्थिक बाबतीत आता अडचणी नाहीत. आपण पदवीधर असून नोकरीच्या शोधात असलात तर आपली इच्छा पुरी होईल. चालू नोकरीत प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. वरिष्ठ जागी बदली होण्याचा योग आहे. यादृष्टीने दि. २५ ते ३१ हा काळ लक्षात घ्यावा. वाहन खरेदीचा जबरदस्त योग या वेळी आहे. सुख, आनंद व आर्थिक स्वास्थ्य घेऊनच हा काळ येत आहे. **महिलांस** : तुम्ही स्वतःच कुढत बसण्याचे सोडून द्या. चारचौघात वेळ घालवा. नोकरी, व्यवसाय, पैसा या साऱ्यासाठी हा पंधरवडा अत्यंत अनुकूल आहे. ◻

### वृषभ : राजकारणात उदय

तुम्हाला साडेसाती असली तरी काही ग्रह अनुकूल आहेत. होत आहेत. मंगळ अजून व्ययस्थानी आहे याची जाणीव ठेवावयास हवी. मात्र तो त्याच्या स्वतःच्या घरात असल्यामुळे तुमचे फारसे नुकसान करणार नाही. दि. १४ जानेवारीस रवी मकर राशीत आला आणि तो तुमच्या भाग्यवर्धनाला उपकारक आहे. शुक्र हा तुमचा स्वामी आहे. कापड, सौंदर्य-प्रसाधने, तांबा-पितळ भांडी शेतीची आयुधे, सोने असा धंदा वा व्यापार तुमच्या हिताचा व तुम्हाला लाभदायक ठरतो. हे लक्षात घेऊन तुम्ही जर नव्या वर्षीच्या या पहिल्या महिन्यात काही योजना आखल्या तर ते तुम्हाला फायद्याचे ठरणार आहे. वर उल्लेख केलेला कोणताही धंदा जर सध्या चालू असेल तर त्याची भरभराट होणार आहे. त्याच्या विस्तारासाठी नवे क्षेत्र तुम्हाला गवसणार असून सरकारी कृपा व भांडवली कृपा तुम्हाला लाभणार आहे. एखादी उच्चपदस्थ सरकारी व्यक्ती तुमच्या

सहवासात याचवेळी येईल व तुमच्या या उद्योगाला मार्गदर्शन सहाय्यही करील. संप, टाळेबंदी, नोकरांची अडवणूक, पैशाची अडचण व मंदी अशा त्रासानी गेले अनेक दिवस तुम्हाला ग्रासले होते. आता ते ग्रहण सुटले आहे. वर उल्लेख केलेला एखादा नवा उद्योग तुम्हाला काढायचा झाला तर त्यासाठी हा काळ अनुकूल आहे. तुमच्या याबाबतीतील मनोरथ यावेळी सफल व्हावेत. स्वप्ने साकार व्हावीत. नोकरीच्या दृष्टीने हा पंधरवडा तसा प्रतिकूल नाही. वरिष्ठांकडून तुमच्या कामाला अनुकूल शिफारसपत्र जरूर मिळेल. पण कामाने जीव मेटाकुटीस येईल. ताण अतिशय वाढेल. सरकारी-नोकरीत याचा प्रत्यय जास्त येईल. प्रमोशन—बढतीची मागणी मात्र अवश्य करावी. आर्थिक स्थिती साधारणच राहील. जमा व खर्चाची तोंडमिळवणी करणे कठीण होईल. अनपेक्षित खर्च फार होईल. तुम्ही राजकारणात आज असलात तर मात्र तुमचा उपेक्षित काळ संपून तुमचा उदय काळ सुरू झाला आहे याची तुम्हाला प्रचिती येईल. राजकारणात प्रवेश करण्यात येत असलेल्या अडचणी दूर होऊन तुमचा प्रवेश सुकर होईल. **महिलांस** : खर्चांत व चैनीत काटकसर करणे आवश्यक होऊन बसेल. उद्योगात तुमच्यावरचे बेकारीचे संकट यावेळी तरी टळेल. लग्नाचेही जमण्यास अनुकूलता आहे. ◻

## मिथुन : तब्येतीला जपा

सुरुवातीचा मथळा पाहून जरा चमत्कारिक वाटेल. पण तुम्ही काळजी करू नका. परमेश्वर तुमचा हितकर्ता आहे. मनोभावे कुलदेवतेला शरण जा. ती अभय देईल. यावेळी रवी शनीचा होणारा योग आरोग्याच्या दृष्टीने फारसा उपकारक नाही. म्हणून थोडी जाणीव दिली एवढेच. पहिला शनी तुम्हाला त्रास होऊ देणार नाही. असो. आठवा रवी मकरेत आहे व तो संक्रमण घडवीत असतो. एक तब्येतीचा प्रश्न सोडला तर हा रवी तुमच्यासाठी बरेच काही अनुकूल घेऊन आला आहे. प्रामुख्याने आर्थिक व्यवहारात काही भरीव, चांगले व हितकारक घडावे अशी ह्याची इच्छा आहे. रेस म्हटली की सोवळेपणाने एकदम दूर पळून जाण्याचे काहीच कारण नाही. ग्रह अनुकूल असला तर 'लक्ष्मी' सुवर्णपायानी घर भरून टाकील. तसा काल आला आहे. तुम्ही बुद्धीवान व विद्वान आहात. पण तुमच्याकडे आजवर या लक्ष्मीने अवकृपा केली. आता ती कृपा करणार आहे. स्थावर जंगम इस्टेटीचे तंटे तुमच्या बाजूने निकाली निघून तुम्हाला घबाडच मिळेल. मात्र मूळ कुंडलीत ग्रह तसे उच्चीच हवेत. दुसरे एक महत्त्वाचे स्थित्यंतर घडून येईल. अकस्मातपणे तुम्हाला परदेशी जाण्याचा योग येईल व तुमच्या बौद्धिक कौशल्याला नवे दालन उपलब्ध होऊ शकेल. तुम्ही नोकरीत आजवर बरेच श्रम केले आहेत. काही वेळा वरिष्ठांची मर्जी तर काही वेळा गैरमर्जी तुमच्यावर झाली. आता मात्र आर्थिक व बढतीला पोषक असे वातावरण निर्माण होईल. मालकाकडून व कंपनीकडून तुम्हाला नवे वाहन दिले जाईल. प्रकाशन, वृत्तपत्र व कागदाशी संबंधीत अशा ठिकाणी नोकरी करीत असाल तर कागदटंचाईचा तुम्हाला फटका बसणार नाही. डिसचार्ज वा लेऑफ इतरांना मिळेल. पण तुम्हाला मिळणार नाही. तुम्ही एखाद्या पक्षाचे राजकीय कार्यकर्ते असाल तर तुम्हाला 'सरकारी पाहुणचार' मिळणार आहे. मंत्री, खासदार, आमदार असाल तर लोकांच्या घेरावात सापडाल. या वेळी तुम्ही जर एखादा उद्योग नव्याने सुरू करायचा ठरवला. असेल तर खूप वणवण करून शेवटी यश पदरी पडेल. **महिलास** : तीर्थयात्रा व रम्य निसर्गाच्या ठिकाणी सहल करण्याचा योग आहे. नोकरीत सुख व समाधान मिळेल. मनासारखे काम मिळेल. बढती बदलीचाही योग आहे. ◻

## कर्क : मंगलकार्यात खर्च

कर्क राशीच्या समोर मकर रास आहे व तिथे सध्या गुरु आहे. तो तुम्हाला शुभ आहेच. एक-दोन दिवसापूर्वीच मकरेत रवी आला आहे तो तुमच्यासाठी काही तरी भले करू इच्छित आहे. विशेष करून तुमच्या संसारी जीवनात काही मंगलदायक गोष्टी घडून येण्याची शक्यता आहे. रवी, गुरु प्रतियोग तुम्हाला तसा प्रतिकूल नाही. तुमच्या घरात वा मित्राच्या घरात इतकेच काय तुमचे स्वतःचे विवाहकार्य होणे असेल तर ते याचवेळी पार पडेल. शनी व केतू बारावे आहेत. ते तुमच्या हातातील शिल्लक सारखी कुरतडत रहाणार असले तरी या वेळेचा हा पैसा मंगल कार्यासाठी खर्च होईल. तुमच्या उदारहस्ते एखादी देणगीदेखील तुम्हाला द्यावी लागेल. राशीत रवी व समोर गुरु. तुम्ही तरुण असाल, कॉलेजात वा शाळेत असाल तर तुम्हाला प्रेमाचा संदेश मिळेल. तुम्ही हमखास प्रेमात पडणार आहात हे निश्चित. नोकरीच्या दृष्टीने तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणामकारक प्रभाव पडणार असून त्यामुळे नोकरीतील बढती, बदली प्रमोशनसारख्या लाभदायक घटना घडून येतील. सध्याची तुमची त्रासदायक स्थिती सुधारेल. शैक्षणिक (आर्ट) पदवीधर, संशोधक, कलाकार यांचे दैन्य व वणवण दि. २३ नंतर संपणार आहे. त्यांच्यासाठी नवे दालन मोकळे होईल. तुम्ही कवी वा चित्रकार असाल तर प्रसिद्धीचा योग आहे. कोणत्याही प्रकारच्या स्वतंत्र उद्योगात न पडणे बरे. तुम्हाला मदत देणारे आयत्यावेळी हात आखडता घेतील व त्यामुळे तुमचा बेत अर्धवटच राहील. चालू धंद्यात संप, स्लो काम यासारखे प्रयोग सुरू होतील. त्यामुळे प्रगतीला मोठा खो बसेल. पण गुरुचे पाठबळ व रवीचे सामर्थ्य यामुळे यावेळी मोठ्या कौशल्याने तुम्ही पार पडाल. आर्थिक स्थिती थोडीफार विस्कळीत होईल. कर्ज काढावे लागेल. परंतु प्रतिष्ठेला मात्र तडा जाणार नाही. पैसा मिळण्यात अडचण उभी राहणार नाही. तुम्हाला यावेळी वाहनाचा योग आहे. पत्नीकडून चांगली मदत होईल. पत्नीला नोकरी मिळेल. **महिलास** : प्रेमात यश येईल. मैत्रिणीकडून कौतुक होईल. नोकरीत बढतीचा योग आहे. विक्रेत्याची नोकरी असेल तर प्रगतीचे शिखर गाठाल. चार पैसे हाती येतील. ◻

## सिंह : राजकारणात सरशी

सिंह रास ही प्रामुख्याने रवी धर्माची. अर्थात पाचवीला राजकारणच पुजलेली रास आहे. या राशीची माणसे कोणत्याही इतर क्षेत्रात चमकत असली तरी राजकारण हाच त्यांचा मुख्य गुण असतो. रवी हा सध्या मकरेत आला आहे. हा रवी तुम्हाला अनेक विक्रम करावयाला लावणार आहे. बराच काळ तुम्ही उमेदीचे जीवन भोगलेत. तुम्ही

ज्यांना हात दिला तेच तुम्हाला बाजूस सारून तुम्हाला उपदेश करू लागले. पण आता पुन्हा फासे तुमच्या हाती येणार आहेत. गावातील राजकारण असो, प्रांताचे राजकारण असो नाहीतर देशाचे राजकारण असो, तुम्ही एकदम आघाडीवर चमकणार आहात. तुम्ही मंत्रिमंडळात असाल तर यावेळी महत्त्वाचे खाते तुमच्याकडे येईल. यावेळी कोणतीही निवडणूक असो, यश तुमचे व ध्रुव्वा विरोधकाचा हे निश्चित. तुम्ही जपायला हवे ते तब्येतीला. मानसिक स्वास्थ्याला ग्रहण लावणारा असा हा काळ आहे. घरात, बाहेर, नोकरीत कुठे ना कुठे एखादा प्रश्न तुमची मन:स्थिती बिघडवून टाकील. यातून नुकसान जरी झाले नाही तरी त्रास होईल. लिव्हर, पित्त, उष्णता, पोटदुखी यासारखे आजार थोड्याफार प्रमाणात उद्भवतील व खर्च होईल. प्रामुख्याने यावेळी मातोश्री, सासू वा सासरे यांच्याबद्दल थोडीफार काळजी निर्माण होईल. लग्नकार्याचे विचार सध्या तरी मनात आणू नयेत. प्रेमात फसवणूक होईल. तुम्हाला ज्या मुलीकडून आश्वासन मिळाले असेल ते आश्वासन वाया जाईल. नोकरीत हा काळ तसा वाईट नाही. पण वरिष्ठांकडून तुम्हाला दिली गेलेली आश्वासने पाळली जाणार नाहीत. बढती, प्रमोशन जरा लांबणीवर पडेल. आर्थिक अडचण फारशी भासणार नाही. तात्पुरती गरज भासेल. येणे असलेले पैसे मात्र वसुल होण्याची शक्यता नाही. व्यापार उद्योगात घबाड हाती पडेल.नफा हवा तसा कमवाल. काळाबाजार करण्याची वृद्धी होईल. वरिष्ठ जागेवर असाल तर अधिकार गाजविण्याची हौस सोडून द्या. रासायनिक उद्योगात वरिष्ठ अधिकारी असाल तर दुखावलेल्या व्यक्तीकडून त्रास संभवतो. **महिलांस** : सार्वजनिक कार्यात मोठेपण मिळेल. सन्मानाचा योग येईल. सार्वजनिक कार्याचा गौरव होईल. ◻

**कन्या** : प्रगतीच्या पर्वाला सुरुवात

कन्या राशीचे अगतिकत्त्व, नैराश्य आता संपणार आहे हे कळवायला मला आनंद वाटत आहे. सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीच्या कोंडीत सापडलेली एक नाजूक मनाची व्यक्ती असेच तुमचे वर्णन होत होते. 'बिचारा' म्हणून तुम्हाला म्हटले जाईल.मकरेत पंचमस्थानी असलेला गुरू नीच राशीत असला तरी त्याने तुम्हाला 'जगवले' हे तुम्ही नाकारू शकत नाही. अनेकदा तुमची परिस्थिती हाताबाहेर गेली असेल. पण तो गुरू तुम्हाला तारीत होता. आता हे सारे विसरून नव्या क्षितिजाला सामोरे जा. यावेळीं तुमच्या आशाआकांक्षांना पालवी फुटल्याखेरीज रहाणार नाही. तुमच्या मनाचा वठलेला वृक्ष पुन्हा बहरू लागेल. ज्यांनी तुमची उपेक्षा केली तेच तुमची बाजू सावरू लागतील. या पंधरवड्याचे शेवटचे पाच सहा दिवस तुमच्या जीवनात काही अनुकूल घटना घडवून आणणार आहेत. तुमचा धर्म सेवेचा म्हणजे नोकरीचा आहे. नोकरीत गेल्या वर्षी तुमची फार उपेक्षा झाली. पण यावेळी पाचवा रवी तुमचे अनेक मनोरथ पूर्ण करणार आहे. नोकरीत तुम्हाला तुमच्या हक्काचे ते सारे वरिष्ठांकडून मिळणार आहे. पाचवा गुरू व पाचवा रवी ही जोडी तुमच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करतील. तुमचा एखादा व्यवसाय असेल तर गेल्या काही दिवसात त्या व्यवसायाची परागती भरून निघेल. धंद्याला बरकत येईल. नव्या उद्योगाच्या कल्पना वा तयार होऊ घातलेल्या योजना आकार घेऊ लागतील. अनेकांचे सहकार्य आपण होऊन तुम्हाला मिळेल. या वेळी प्रतिष्ठा व योग उंचावणारे योग आहेत. दि. १४ जानेवारीला पंचम स्थानी झालेले मकर संक्रमण तुमच्या व्यावसायिक जीवनात खरेखुरे संक्रमण घडवून आणणार आहे. नोकरीत बढती, पगारवाढ, लेखनात प्रसिद्धी, प्रतिष्ठित व श्रेष्ठ लोकांबरोबर निकटचे संबंध प्रस्थापित होणे, अपुरे लेखन पुरे होऊन गौरव होणे, मालक वा वरिष्ठ यांच्याकडून वरदान लाभणे वगैरे काही तरी घडू शकेल. निराशा व अप्रगती संपुष्टात येत असल्याची जाणीव होऊ लागेल. तब्येतीला उत्साह वाटेल. **महिलांस** : कुढत बसलेली मन:स्थिती सुधारणे हे या वेळच्या मकर संक्रमणाचे कार्य आहे. रविकिरणे मनात नवा प्रकाश व उत्साह निर्माण करतील. ◻

**तूळ** : जागेची समस्या.

तूळ राशीत सध्या चंद्रावर हर्शल असून हा हर्शल तेथे आल्यापासून तुमच्याबाबतीत अनेक अनुकूल घटना घडल्या असतील. हर्शल चमत्कार घडवून आणतो. तसेचसे काहीं घडले असेल. ध्यानी मनी नसताना आर्थिक व नोकरीच्या क्षेत्रांत काही अनुकूल घडणे शक्य आहे. मुकतेच मकरेंत रवीचे पदार्पण घडले असून तुमच्या सुखस्थानी हे मकर संक्रमण घडले आहे. तसे हे संक्रमण प्रतिकूल नाही तरी फारसे अनुकूलही नाही. आपल्या मातृसुखांत काही अडथळा निर्माण होणे शक्य आहे. आईचा वियोग वा सुखात व्यत्यय येण्याची शक्यता आहे. तुम्ही आधीच भावनाविवश आहांत. रवी हा ग्रह भावनेवर परिणाम घडवून आणीत असतो. संताप येणे, वृत्ती तापट बनणे, भांडणाची प्रवृत्ती निर्माण होणे असे काही तरी घडू शकेल. या पंधरवड्यात आपण कोणत्याही प्रकाराबद्दल विचार करणे सोडून द्यावे. मनाविरूद्ध घटना घडली तर संयम पाळावा. डोक्याला त्रास होईल असा विचार करीत बसू नये. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे राहात्या जागेबद्दल काही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. मालकाबरोबर कोर्ट कचेरी होईल. गुप्त शत्रुत्वाचाही त्रास होईल. असे असले तरी सर्वसाधारणपणे हा काळ एवढा प्रतिकूल नाही. पैशाच्या बाबतीत आपली परिस्थिती सुधारणार आहे. पैशांचे व्यवहार, शेअर व्यवहार फायद्याचे ठरतील. नफा मिळेल. उद्योगाच्या बाबतीत बँक अगर इतर ठिकाणाहून मिळावयचे अर्थसहाय्य वेळेवर मिळू शकेल. यावेळी आपणास प्रवासाचा चांगला योग आहे. अनेक अडथळे येऊनं परदेशी प्रयाण लांबणीवर पडत होते ते आता घडून येईल. तुम्ही जेथे नोकरीला असाल त्या संस्थेतून तुम्ही परदेशी जाऊ शकाल. नोकरीत फारसा त्रास नाही. वरिष्ठांबरोबरचे संबंध सुधारतील. बदलीचा प्रयत्न यशस्वी होईल. तुम्ही संशोधक असाल तर संशोधनात मोठे यश मिळेल. इंजिनियर्स वकील यांच्या बेकारीचा प्रश्न सुटेल. यांच्या पैकी भाग्यवंतांना उत्तमपैकी व्यवसायाची वा नोकरीची संधी मिळेल. संसारात पुत्रसुखाचा लाभ होईल. **महिलांस** : माहेरी जाण्याचा योग येईल. वृद्ध महिलांस तीर्थ यात्रा घडेल. नोकरीत सर्वसाधारण काळ. ◻

**वृश्चिक** : कर्तृत्त्वाला आव्हान

मंगळासारखा तुमच्या राशीचा उग्रस्वामी

अजून सहावा म्हणजे शत्रूस्थानी पाय रोवून बसला असताना वस्तुतः तुम्हाला कुणाचीच भीती नाही. पण सध्या तुम्हाला उगीचच धाकधूक वाटत आहे. हृदयांत घाबरल्या-सारखे होत आहे. कुणाची तरी तुम्हाला भीती वा आशंका येत आहे. राहु व केतू प्रतिकूल असले की असेच घडत असते. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणजे रवीसारखा अंतरिक्षातील 'सम्राट' तुमच्या पराक्रमांत प्रविष्ट झाला आहे आणि तो तुमचे भाग्य आणि जीवन बहुविध फुलवण्याचे ठरवून बसला आहे. नोकरी व्यवसाय, प्रवास इत्यादी सर्वच क्षेत्रांत नव्या पर्वाची व नव्या युगाची सुरुवात होत आहे. पराक्रमात घडलेले मकर संक्रमण म्हणजे तुमच्याही आशा-आकांक्षाचे घडलेले संक्रमणच होय. हे लक्षात घेऊनच तुम्ही आपल्या नवनव्या योजना तयार करा. तुम्हाला शेतीसाठी जमीन खरेदी करावयाची असेल, असलेल्या जमिनीत द्राक्षासारखी बागायत करायची असेल तर त्याला अनुकूलता आहे. गेले अनेक दिवस तुमचे व तुमच्या नातेवाईकांचे संबंध बिघडत चाललेले आहेत. त्यात यावेळी सुधारणा होईल. दि. २० नंतर एखाद्या उच्चपदस्थ मंत्र्यांशी तुमचा संबंध येईल व त्यामुळे तुमच्या भवितव्याला कलाटणी मिळेल. रासायनिक खते, अल्युमिनियमची भांडी, खाद्य तेले, शेती, नारळ, सुपारी, शेतीची अवजारे यासारख्या उद्योगांना भरपेट यश लाभेल. तुम्ही ऊस बागायतदार असाल तर तुमचे नशीब या वेळी बहरून येणार आहे. कागदाचे कारखानदार असाल वा कागदाचे व्यापारी असाल तर तुमच्या अडचणीत भर पडूनदेखील तुमचा फायदाच होईल. पदवीधर उद्योगपतींना नव्या क्षेत्रात प्रवेश करण्याची संधी मिळेल. त्याचे चांगले कौतुक होईल. त्याच्या बुद्धीचे चीज होईल. नोकरीत विशेष करून न्यायखाते, बांधकाम खाते, सर्वसाधारण प्रशासन, रेव्हेन्यू खाते यात काम करणाऱ्या लोकांना कर्तृत्वाचे नवे आव्हान मिळेल व ते त्यांनी स्वीकारावे. **महिलांस :** नोकरीत उत्तम काळ आहे. प्रवास करण्याची इच्छा पुरी होईल. लहान उद्योग ठीक चालेल. ☐

## धनु : आर्थिक प्रगती

राशीस्वामी गुरूचे मकर राशीतील भ्रमण आता फारच थोडे उरले आहे. तो आता तुमच्या पराक्रमास येऊन बसण्याच्या विचारात आहे. ९ फेब्रुवारीला म्हणजे आणखी काही दिवसातच त्याचे हे भ्रमण सुरू होणार आहे. हा गुरु तेथे आला की त्यानंतरच तुमच्या खऱ्या खुऱ्या आशा आकांक्षाना बहर येणार आहे. वाङ्मय साहित्य असो की, नाटचक्षेत्र असो. चित्रसृष्टी असो वा संगीत दालन असो. एखादी विविक्षित नोकरी असो वा धंदा असो प्रत्येक क्षेत्रात तुमचे कर्तृत्व गाजावे असाच नियतीचा विचार आहे. पण सध्या मात्र तुम्हाला जरा जपून पावले टाकायला हवीत. मुत्सद्देगिरीचा उपयोग करायला हवा. मतभेद वाढविण्यापेक्षा व स्वतःच्या मताचा आग्रह धरण्यापेक्षा मिळते जुळते घेणे, दुसऱ्याच्या मताचा आदर करणे अशी प्रवृत्ती ठेवा. तीच फायद्याची ठरेल. विशेष करून नोकरीच्या बाबतीत ही काळजी घ्या. कारण गेल्या काही दिवसात तुमच्या-बद्दल तुमच्या मालकांच्या वरिष्ठांच्या मनात नाराजीची मते तयार झाली आहेत. गुप्तपणे याची बातचित चालू आहे. तुम्ही याचा कानोसा घ्या. जपून पावले टाका. यावेळी हाताखालच्या माणसाची व वरिष्ठांच्या सहानुभूतीची गरज भासणार असून तीच तुम्ही मिळविण्याचा प्रयत्न करा. तसे काही प्रतिकूल घडेल असे नव्हे, पाचव्या मंगळाचे बळ तुमच्या पाठीशी आहे. तरी पण यावेळी तुमच्या बाबतीत ज्या बऱ्या किंवा वाईट घटना घडतील त्याचे परिणाम दीर्घ काळ टिकणारे आहेत. नोकरीत यावेळी तुमची अप्रतिष्ठा होणार नाही पण बदलीची शक्यता आहे. एखादे नवे काम मिळण्याची शक्यता आहे. ते काम भावी काळात तुमचा दर्जा वाढवील. पण आता कसोटीच पाहील. नव्या नोकरीचे प्रयत्न यशस्वी होतील. शिक्षण खात्यात नोकरी मिळेल. तुम्ही एखादा प्रबंध लिहिला असेल तर त्याला यावेळी विद्वानांची मान्यता मिळेल. लेखनात तुम्ही केलेल्या नव्या प्रयोगाचे स्वागत होईल. नोकरीत चालू कामात थोडाफार बदल होईल. आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने मात्र इतका छान काळ गेल्या कित्येक दिवसात आला नव्हता. कित्येकांचे कर्जदेखील फिटून जाईल. राहणीमान उंचावेल. मनासारख्या वस्तू खरेदी करता येतील. कलाकरमणुकीसाठी पैसे मिळतील. **महिलांस :** नैराश्य संपून तुमच्या मनाला प्रसन्नता आणणारा असा हा काळ आहे. नोकरी-व्यवसायात उन्नती ☐

## मकर : लाभदायी संक्रमण

यात्र महिन्याच्या १४ दिनांकाला रवी तुमच्या राशीत आला आहे. संक्रमण घडणे हे उत्तम लक्षण मानले जाते. वर्षांतून दोनदा हे संक्रमण घडते. हे संक्रमण घडले की बऱ्या वाईट घटना घडत असतात. त्या राष्ट्राबाबत घडतात तशाच मानवी जीवनातदेखील घडतात. तुमच्या राशीत होणारे हे संक्रमण मात्र अनुकूल काळाची चाहूल देणारे ठरणार आहे. आता तुमच्या कर्तृत्वाची नवी नवी क्षितिजे दृष्टीपथात येऊ लागतील. तुमच्या व्यावसायिक जीवनात नव्या युगाचे नाद-निनाद उठू लागतील. अर्थात जन्मस्थ कुंडलीत प्रत्येक व्यक्तीचे ग्रह ज्या प्रमाणात बलवान वा अनुकूल वा प्रतिकूल असतील त्या प्रमाणात त्याचा प्रत्यय येईल. मात्र गोचरीच्या ग्रहांचे स्थानमहात्म्य कमी असते असे नाही. या रवीचा परिणाम असाच दिसून येईल. रवी-शनी हे शत्रु ग्रह असून त्याचा षडाष्टक योग होत आहे. त्यामुळे अनुकूलतेत थोडीफार उणीव राहीलच. सर्व सामान्यांच्या व्यक्तिगत दृष्टीने विचार केला तर मागच्या पेक्षा प्रगतीच वाट्याला येईल. कुटुंबात अड-चणी वा आजार, मनःस्वास्थ्यात अडथळे, आर्थिक चणचण वगैरे जो त्रास होत होता त्याला पूर्णविराम मिळेल. गरजेपुरता पैसा उपलब्ध होईल. कुणीतरी सहाय्याचा हात पुढे करील. देणेकरांना हात हालवीत पाठवावे लागणार नाही किंवा त्याच्या शिव्याही खाव्या लागणार नाहीत. तोही माणूस जरा सबुरीने वागेल. नोकरीत थोडीफार अनुकूलता येऊ लागेल. कामाचा ताण कमी होईल. वरिष्ठ तुम्हाला अजिबात 'उभे करीत' नव्हते ते तुमच्याशी खालच्या आवाजात बोलू लागतील. तुमच्या मागण्याबद्दल थोडी सहानुभूती दाखवतील. प्रत्येक वेळी तुमचा नोकरीचा इंटरव्ह्यू अयशस्वी होत होता पण आता 'इम्प्रेशन' अनुकूल होईल. जुन्या नोकरदारांचे काही प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागतील. उद्योगात मात्र अनेक सुधारणा करू शकाल. भागीदार घेणे यावेळी हिताचे ठरेल. जुन्या धंद्यातील मंदी हळूहळू विरघळू लागेल. अनेकांचे विवाह दिमाखात पार पडतील. **महिलांस :** तुम्हाला सुखाचे दिवस येऊ लागले आहेत. तुम्ही राजकारणात असाल तर तुमची चलती होईल. सार्वजनिक कार्यात यश मिळेल. ☐

**कुंभ : सबुरीने वागा**

आज अनेक बाबतीत ज्या व्यक्ती लोकांच्या चर्चेच्या, टीकेच्या झाल्या आहेत. त्यात तुमचा अग्रक्रम आहे. तुम्ही टीकेला गांगरून जाण्यापैकी लोक नाहीत. लोकमताच्या प्रवाहाविरुद्ध जाण्याचे धाडस तुम्हीच करू शकता. बोलताना परिणामांची तमा तुम्ही बाळगीत नाही. हे सर्व घडत असले तरी नेहमी 'प्रकाशात' राहण्याची तुमची संवय कधीच सुटत नाही. बाराव्या गुरूने तुमच्या विचाराचा प्रवाह काहीसा स्वैरतेकडे, नीतिबंधने नाकारण्याकडे केला, तुमचा अनेकदा तोल गेला. पण शनी तुम्हाला सावरीत होता. आता तर रवी बारावा झाला आहे. त्याला शनी काही करू शकणार नाही. तुम्हाला आणखी काही काळ तरी सुजाण, सज्जन व सद्वर्तनी व्यक्तीच्या सहवासात घालवावा लागेल. स्वतःच्या मनाने कोणतेच निर्णय घेऊ नका. थोडे विचारी लोकांच्या तंत्राने वागा. प्रत्येक बाबतीत स्वतःचा हट्ट धरण्यापेक्षा दुसऱ्यांचे ऐकत जा. राजकारण हा तुमचा श्वास असला तरी हा पंधरवडा सभा, उद्घाटने, सार्वजनिक कार्य यापासून दूर राहा. उगीच 'मार' बसावयाचा ! तुम्ही खासदार, मंत्री वा आमदार अगर अशाच पदावर कुठे असाल तर तुमच्या विरूद्ध लोकक्षोभ उसळणार असून तुमचे पित्तही खवळणार आहे. यावेळी गप्प बसणे हेच हितकारक ठरेल. तुम्ही खाण्यापिण्यावर बंधन ठेवण आवश्यक आहे. कारण त्यापासून त्रास संभवतो. यावेळी स्थावर, जंगम, घर वगैरेच्या खरेदी विक्रीचा कोणताच व्यवहार करू नका. त्यातून नसती गुंतागुंत निर्माण होईल. मुलांकडून उपेक्षा होईल तर पत्नी तोंडसुख घेईल. पैशाची परिस्थिती अप्रतिष्ठा करणार नसली तरी फारच जिकजिक करावी लागेल. स्वतःचा पैसा देखील योग्यवेळी हाती येणार नाही. तुमच्या मनात अनेक योजना गर्दी करतील पण त्यांना वाव मिळणार नाही. नोकरीत विचित्र अनुभव येईल. सकाळी ऑफिसात जाल तर तुमचे काम अचानक बदलले असल्याची वार्ता तुम्हाला कळेल. वरिष्ठांच्या चेंबरमध्ये आनंदाने म्हणून जाल पण बाहेर खरडपट्टी काढून घेऊन यावे लागेल. तसा अपयशी हा पंधरवडा नाही. परंतु त्रास, दगदग असे काही तरी घडत राहणार आहे. **महिलांस :** कुणाच्या अध्यात मध्यात पडू नका. आपले काम की आपण या सूत्राने वागा. नोकरीत वरिष्ठाच्या फारसे आहारी जाऊ नका. पैसा जपून वापरणे योग्य. ¤

**मीन : भरपूर पैसा मिळेल**

मीन ही गुरुची रास आहे. गुरू महाराज गेले वर्षभर तुम्हाला अकरावे होते तरी त्यांचा तुम्हाला फारसा उपयोग झालेला नाही. त्याने तुमचे तसे काही अनिष्ट केले असेल असे नव्हे. पण तो नीच राशीत होता. त्यामुळे त्याचे सामर्थ्य कमी होते. आता लवकरच हा गुरू कुंभ राशीत येत आहे. हे गुरू महाराज जरी आता तुम्हाला बारावे झाले तरी ते तुमचे काही तरी भलेच करतील. त्याची थोडीफार चाहूल या पंधरवड्यात लागेल. तुमची आर्थिक बाजू आता सावरणार आहे. ती अनेक बाबतीत कमकुवत झाली आहे. लोकांचे देणे झाले असेल. पैशासाठी कुणाचे बोलून घ्यावे लागले असेल. ही परिस्थिती पालटणार आहे. चैनीसाठी पैसा उडवाल. राहणी डामडौलाची होईल. उंची फर्निचर घरात येईल. चौथा शनी तुम्हाला 'बंगलेवाला' बनवणार आहे. मात्र मूळचा मंगळ वा शनी उच्च असला तरच तसा बंगला मिळेल. तरी पण राहत्या जागेचा प्रश्न सुटणार आहे. घरात अगर नात्यात वृद्ध माणूस थोडी काळजी निर्माण करणार आहे. तुमचे मनःस्वास्थ्य बिघडवून टाकणार आहे. अध्यात्म्याचे दृष्टीने हा पंधरवडा उत्तम आहे. तुम्ही उपासना मार्गी असाल तर उच्च अशा साधूपुरुषाचे तुम्हाला दर्शन घडणार आहे. आशीर्वाद मिळणार आहे. मनाला आनंद मिळणार आहे. तुम्ही नास्तीकपणाचा अभिमान बाळगीत असाल तर तुमचे मत परिवर्तन होऊन तुम्ही साधूसंताच्या नादी लागणार आहात. नोकरीत वरिष्ठ जागी नेमणूक होईल. एखादे खास खाते निर्माण करून त्याची जबाबदारी तुमच्याकडे सोपविली जाईल. अडचणीच्या जागेवरून आवडत्या जागी बदली होईल. आता त्रास, कष्ट वणवण संपुष्टात येणार आहे. अनेकांचे सहकार्य मिळेल. उद्योगातील अडचणी कमी होऊ लागतील. मनोरथ पुरे होऊ लागतील. **महिलांस :** तिर्थ यात्रा घडण्याचा योग आहे. सूचक स्वप्ने पडतील. मन प्रसन्न राहील.

---

## एक चरित्र अभिनेता....

# अवांतर

शरद गोखले

पप्पाजी हैं घरमें ? जी नही, आप ऐसा कीजिए, राजकमल स्टुडिओ मे फोन करके देखिए, अगर उधर नही होंगे तो मेहबूब या आर. के. में जरूर होंगे !

पप्पाजींची चौकशी करणारा प्राणी चटकन फोन बंद करुन मोकळा होतो. ज्या पप्पाजींबद्दल विचारणा करण्यात आलेली असते ते पप्पाजी म्हणजे प्रेमनाथ. आज हीरोपेक्षा भाव खाऊन असलेला चरित्र अभिनेता आणि फोनवर मिस्किल जबाब दिलेला असतो 'जेम्स बाँड' नाव धारण करणाऱ्या वफादार दक्षिणी नोकराने. जबाब देणाऱ्याच्या बोलण्यातील मिस्किलपणाचा भाग सोडला तरी त्यांनी दिलेल्या माहितीमागे असलेली वस्तुस्थिती नाकारता येत नाही. पप्पाजींची १९७४ ची डायरीही जून अखेरपर्यंत 'शूटिंग डेटस्'नी गच्च भरलेली आहे याची कल्पना असलेला 'जेम्स बाँड' आपल्या मालकाचे निर्मात्यांपासून संरक्षण करण्याची जबाबदारी उचलतो. पप्पाजींपर्यंत कोणाला पोचू द्यायचे हे त्याला अनुभवाने माहीत झाले आहे. फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीच्या आवाजावरून तो कामाचे स्वरूप ओळखू शकतो. तात्पर्य काय, पप्पाजींना घरी भेटणे हे महाकर्मकठीण काम आहे.

पप्पाजी असा नामनिर्देश आता प्रेमनाथच्या वयाला शोभून दिसत असला तरी सोळा वर्षे नापत्ता असलेला हा प्राणी १९७० साली एकदम धूमकेतूसारखा उगवला. १९७० मध्ये जॉनी मेरा नाम प्रदर्शित झाले आणि अनेक मंडळींचे भवितव्य उजळून निघाले. जॉनीच्या तुफानी यशामुळे देव आनंदला साचेबंद टोलेबाजी दोन चार वर्षे चालू ठेवण्याचा परवाना मिळाला. पद्मा खन्ना खऱ्या अर्थाने 'एक्सपोज' झाली आणि चरित्रअभिनेता म्हणून प्रेमनाथची दुसरी इनिंग्ज सुरू झाली. जॉनीच्या प्रदर्शनापूर्वी कित्येक वर्षे देवधर्म, ज्योतिष, संगीत आणि

काही काळ राजाजींच्या स्वतंत्र पक्षाचे राजकारण यामध्ये मश्गूल असलेला हा बेफिकीर कलाकार पुन्हा एकदा अंग भाजून काढणाऱ्या स्टुडिओ लाइटस्खाली ओढला गेला.

खूप खूप वर्षांपूर्वी, घरच्या मंडळींना पत्ता लागू न देता, दोस्तांबरोबर पळून जाऊन चित्रपट बघण्याची ओढ असते, अशा कोवळ्या वयामध्ये प्रेमने पृथ्वीराज कपूर यांचा डाकू मन्सूर नावाचा चित्रपट पाहिला आणि ठरवून टाकले, हाच आपला जीवनमार्ग. निर्णय झाला पण अंमलबजावणीला बहुत अवधी होता. शाळा कॉलेजची चाकोरी पूर्ण झाली. पदवीची पताका खिशामध्ये पडली. चांगली नोकरी पाठोपाठ छोकरी सहज मिळाली असती. पण डोक्यामध्ये डाकू मन्सूरची नशा अजून टिकून होती. लगेच क्षणात निर्णय झाला. आता पृथ्वी थिएटर्स, पृथ्वीराज कपूर यांच्याशी नाते होतेच. फारशी खळखळ न करता त्यांनी बसक्या नाकाच्या या उमद्या तरुणाचा स्वीकार केला. पृथ्वी थिएटर्स बरोबर धावपळ सुरू झाली. नाटकाची दुनिया म्हणजे आज इथे तर उद्या तिथे. या भटक्या दुनियेतही प्रेम रुळला खरा, पण लक्ष लागले होते रुपेरी पडद्याकडे आणि पहिली संधी चालून आली आणि पृथ्वी थिएटर्सला रामराम ठोकून प्रेमची स्वारी भवनानींचे बोट धरून स्टुडिओमध्ये आली. ज्या चित्रासाठी प्रेमची निवड झाली होती ते अजित नावाचे चित्र १९४८ साली पडद्यावर आले. नायिका होती मोनिका देसाई. तथापी आघाडीच्या कलाकाराची शान यायला आणखी वर्षभर थांबावे लागले. १९४९ साली बरसात पडद्यावर आले आणि प्रेमनाथ या नावाला वजन आले.

बादल, सगाई, बुझदिल, आराम, नवजीवन प्रभात, साकी–चित्रपटांची संख्या बघता बघता फुगत गेली. वर्षामागून वर्षे सरत गेली. कलाकार म्हणून मान्यता मिळाली, स्वास्थ्य लाभले. विसाव्यासारखे लाभणारे स्वास्थ्य हा या धंद्यातील सगळ्यात धोक्याचा काळ. खाजगी आयुष्यामध्ये इष्क, मोहब्बतची लागण नेमकी याच काळात होते आणि फुगत जाणारा काळा पांढरा पैसा नवीन धाडस करण्यास प्रवृत्त करतो. मोहाचे हे क्षण प्रेमच्या वाट्याला आले आणि या दोन्हीमध्ये तो पूर्णपणे गुरफटला. नायिका म्हणून प्रेमच्या आयुष्यामध्ये आलेल्या कलाकारांमध्ये सुरैय्या, निम्मी, मधुबाला आणि बिना रॉय या विशेष महत्त्वाच्या. प्रेमाचे पहिले ' गुफ्तगु ' मधुबरोबर सुरू झाले. डाव रंगत गेला. भीड चेपत गेली लग्नाच्या आणाभाकापर्यंत पाळी आली. पण योग नव्हता.

बाह्य चित्रणासाठी प्रेम मसुरीला गेला होता. बिना रॉय स्वतःच्या घरी विश्रांतीसाठी आली होती. फिल्मी मोहब्बतीचा अनुभव दोघांनीही पूर्वी घेतला होता. हमारा वतन या चित्रामध्ये बिना त्याची नायिका होती. मसुरीच्या याच मुक्कामामध्ये बिना रॉयने लग्नासंबंधी विचारले आणि मधुबरोबरचे मधाळ क्षण विसरून प्रेमने होकार भरला. लग्न झाले. पण प्रेमच्या मनामध्ये ठुसठुस होती. मनातील मळमळ ओकून टाकण्याच्या हेतूने त्याने मधुबालाची भेट घेतली. पण मधुने त्याला कधीही क्षमा केली नाही. प्रेम प्रकरणावर पडदा पडला.

इकडे बँकेतला पैसा साहसाचे आवाहन करीत होता. कलाकार म्हणून मार्केट कमी होत होते. आणि प्रेमने नवीन धाडस केले. पी. एन. फिल्मस–एक नवी छत्री उगवली. चित्रे दोनच. प्रेम-बिनाच्या भूमिका असलेले व एच. एस. रावेल यांनी दिग्दर्शित केलेले शगुफा पडद्यावर आले. सी. रामचंद्र यांचे संगीत लाभलेल्या या चित्रावर प्रेमचा आजही जीव आहे, पण शगुफा कोसळले. प्रिझनर ऑफ गोलकोंडा या आपल्या दुसऱ्या चित्राच्या वेळी दिग्दर्शनाची जबाबदारीही त्याने स्वतः संभाळली. पण सेन्सॉरने गोलकोंड्याचा हा कैदी बंदिस्त करून ठेवला. आणि पी. एन. फिल्मसचे तीन तेरा वाजले. १९५२ मध्ये एका शिष्ट मंडळाबरोबर प्रेम अमेरिकेची फेरी करून परत आला. पण मार्केट आता त्याच्या हातातून निसटले होते. आल्यावर कामे मिळेनात. सौंदर्य आणि साजूक चेहरा याचे भांडवल असलेली बिना रायही लवकरच व्यवसाया बाहेर फेकली गेली. परिस्थिती कठीण असल्याचा वास प्रेमला आला. शान तर कायम रहावी आणि वायफळ खर्च तर टळावा अशा पद्धतीने धन संचिताची रचना करण्यात आली. शिवाय जबलपूरचे चित्रपटगृह हे हुकमी उत्पन्नाची बाब होतेच. बालगोपाळामुळे घरालाही घरपण आले होते. नाही म्हणायला बिनाच्या तब्येतीची सदा कुरकुर होती आणि आहे. पण प्रेमने साथ सोडली नाही.

साठ सालापर्यंतची चार-सहा वर्षे सुस्थिरता निर्माण करण्यात निघून गेली. सिनेमा हा विषय मागे पडला. पोरींच्या शाळा सुरू झाल्या. आईचे मार्गदर्शन होतेच. प्रेमने घरातले लक्ष कमी केले. ज्योतिष, प्रवास आणि संगीत ही विरंगुळा देणारी नवीन ठिकाणे त्याने निर्माण केली. त्यातच तो रमून गेला. वर्षामागून वर्षे सरली. ज्योतिष शास्त्रावरचे एक जाडजूड पुस्तक वाचीत प्रेम पडला होता. आणि फोन खणाणला. जॉनी मधल्या कामाबद्दल विचारणा होती. प्रेमला तपशील हवा होता. वेळ निश्चित झाली. भूमिका पटली, आवडली. दुसऱ्या इनिंगजची ती नांदी होती. गुलशन राय सारख्या खंद्या माणसाचे पहिले चित्र. हा हा म्हणता चित्र पूर्ण झाले. पडद्यावर झळकले. आणि मग खणखणारा फोन ही नित्याची बाब झाली. नव्या स्वरूपातील प्रेमचे प्रचंड स्वागत झाले होते. जॉनीच्या पाठीवर शोर हे मनोजचे चित्र लागले. शोर मधील प्रेमचा कनवाळू पठाण लोकांना आवडला. राजा-जानी मध्ये एक वेगळे रूप पहावयास मिळाले. दो बच्चे-दस हाथ, बेइमान येऊन गेली. बॉबी मधील त्याच्या भूमिकेला टीकाकारांची टाळी पडली. बॉबीच्या त्या दिलदार बापाने लोकप्रियतेचा अजून एक टप्पा सर केला. प्रचंड वेगाने कामं येऊ लागली. धर्मेंद्र, संजीवकुमारच्या तारखा मिळवण्यासाठी आज जी यातायात पडते, तीच यातायात प्रेमच्या तारखा मिळवण्यासाठी पडते. तारखा देणे शक्य नाही म्हणून प्रेमने नोटांची पुडकी समोर ठेऊन गोष्टी करणाऱ्या मद्रासच्या देवर नावाच्या निर्मात्याची ' ऑफर ' नाकारली.

तारुण्याचा कैफ उतरला आहे. घराकडे खास काळजी करावी असे काही नाही. मोठा छोकरा प्रेम किशन, विजय आनंदा सहाय्यक म्हणून वावरतो आहे. धाकटा कैलासनाथ अजून शिकतो आहे. आज पप्पाजी म्हणून वावरणाऱ्या प्रेमसमोर मनाजोगत्या भूमिका


# प्रेमनाथ

तब्येतीने करणे एवढे एकच काम आहे. शिवाय फावल्या वेळात गायनाचा शौक आहेच. पप्पाजी सिनिअर–म्हणजेच पृथ्वीराज कपूर हे प्रेमचे श्रद्धास्थान. स्वतःचा जवळचा आप्त, अभिनयातील आदर्श, पितृतुल्य प्रेम करणारा अशा अनेक नात्यांनी प्रेम आणि पृथ्वीराज ऋणानुबंधांच्या गाठीभेटींनी बांधले गेले आहेत. त्याच्या घरामध्ये सुस्पष्ट दिसणाऱ्या तसबिरीमध्ये पृथ्वीराज कपूर स्थानापन्न आहेत. त्याची स्वतःची सख्खी बहीण कृष्णा पप्पाजींच्या पश्चात कपूर मंडळींना संभाळीत आहे. व्यवसाईक संबंध आणि नाते गोते यापेक्षा राज, शम्मीबरोबर स्नेह रज्जूंनी जास्त बांधला गेला आहे.


१९४८ साली प्रेम पडद्यावर आला हे खरोखरच त्याचे नशीब म्हटले पाहिजे. आजच्या जमान्यामध्ये तो पडद्यावर येता तर उग्र चेहऱ्याचा, बसक्या नाकाचा, आडव्या शरिराचा हा ' नायक ' आजच्या मंडळीना कितपत रुचला असता याची शंकाच आहे. एकापेक्षा एक सरस असलेली पोरे आज कॅमेऱ्यासमोर येण्यासाठी धडपडत असताना–नायक म्हणून पडद्यावर येण्याची प्रेमनाथची जर आज उमर असती तर वशिला कितीही दांडगा असता, तरी प्रेक्षकांनी त्याचा जॉय मुखर्जी केला असता. चरित्र अभिनेता म्हणून त्याने आज मिळवलेले अग्रस्थान वादातीत आहे. त्याच्या बरोबरोने उभा राहील असे चरित्र अभिनेते हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत. देव आनंद (इष्क इष्क इष्क), मनोजकुमार (रोटी, कपडा मकान) फेरोज खान (धर्मात्मा) या सारखी मातब्बर मंडळी त्याला गुंतवून ठेवीत आहेत. गॉड फादर वरून घेतलेल्या ' धर्मात्मा 'मध्ये प्रेमनाथ प्रमुख भूमिका करतो आहे. स्वाभाविकपणे येणाऱ्या चित्रपटांपैकी गॉड फादर या चित्राबद्दल विशेष उत्सुकता आहे.

कलाकार म्हणून प्रेमनाथच्या आयुष्यातील दुसरा टप्पा, प्रेमनाथची याद विशेष प्रकर्षाने चित्रपट इतिहासामध्ये कायम ठेवणार असल्याने या नवीन स्वरुपामध्ये त्याने मनसोक्त वाटचाल केली तरी त्याचे स्वागतच होणार आहे.





एकेरीतील प्रतिस्पर्धी
निरुपमा मंकड । सुसान दास
विजय अमृतराज । शशी मेनन






आणि हे एकेरीतील विजेते
विजय अमृतराज । सुसान दास
भारतीय टेनिसचे भवितव्य
विजयच्या हाती सुरक्षित आहे.

**मुक्काम पुणे**

# टेनिस : राष्ट्रीय स्पर्धा


छाया : सुनील रेडकर



विजयच्या सावध नजरेपुढे
शशी मेननचे काहीच चालले नाही.

तरीही शशीचे भवितव्य
नक्कीच उज्वल आहे
हे स्पर्धेने दाखवून दिले
कारण एकेरीत विजयकडून
सणसणीत पराभव स्वीकारणाऱ्या शशीने
लगेचच जसजीतसिंगच्या सहाय्याने
दुहेरीत अमृतराज बंधूंवर विजय
मिळवला.

आणि अशीच एखादी बेफाम सर्व्हिस
विजय करतो की
शशी मेननही टाळ्या देतो.



निरूपमा मंकड
गतवर्षीची विजेती.
पण यंदा सुसान दासकडून एकेरीत
व दुहेरीतही पराभव.

सुसान दास
तिहेरी मुकुट पटकावणारी सुसान
भारतातली सर्वश्रेष्ठ
महिला टेनिसपटू ठरली.

शशी मेनन हे नादमधूर नाव धारण करणाऱ्या 'यंगटर्क'ने आज भारतीय टेनिस क्षेत्रात तडफदारपणे पदार्पण केलंय्. पुण्याच्या डेक्कन जिमखाना कोर्टवर झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेने हे सिद्ध केलंय्.

टेनिस जगतात सध्या, जाणत्या बुजुर्ग मंडळींना; आक्रस्ताळेपणाने नव्हे, तर मानाने, अदबीने पानावरून उठवून, स्वतः स्थानापन्न होण्याचे प्रकार अनेक तरुण तुर्क सर्रास घडवीत आहेत.

भारतही त्यात मागे नाही !

अमृतराज बंधु गेली एक-दोन वर्षे ही परपरा चालवीत आहेत. कृष्णन्, जयदिप, प्रेमजितलाल या, एकेकाळचा जमाना गाजवणाऱ्या मंडळींच्या वर एक पायरी अमृतराज बंधू उभे आहेत.

आणि म्हणूनच, गेली तीन वर्षे अमेरिकेत शिक्षण होत असलेल्या व या स्पर्धेत सातवे स्थान दिलेल्या शशी मेननने अंतिम फेरीत प्रवेश केल्याचे विशेषसे आश्चर्य वाटत नाही.

—अमृतराज बंधूंच्या हाताला हात लावून शशी मेनन, जसजितसिंग उभे आहेत हे नक्की !

आता यानंतर भारतापुढील आव्हान म्हणजे डेव्हिस कप स्पर्धा.

कृष्णन्‌चा डेव्हिस कप स्पर्धेतील समावेश आता 'आऊट ऑफ क्वेश्चन' झाला आहे असे तोच म्हणतो.

प्रेमजितलालही बहुधा स्पर्धेत उतरणार नाहीच.

म्हणजे यंदा संपूर्णपणे जवान मंडळी भारताचे प्रतिनिधीत्व करणार !

डेव्हिस कप स्पर्धेत भारतीय संघ काय असावा यावर विजय अमृतराज म्हणतो— 'मी सध्या बरा खेळतोय्. दुसऱ्या एकेरीत आनंदही चांगला खेळेल. शिवाय दुहेरीत मला चांगली साथ देईलच !' —म्हणजे विजयाच्या दृष्टीने भारतीय संघ नक्की झाला.

यातील एका एकेरीत किंवा दुहेरीत विजयच्या जोडीला शशी मेननला उभे केले की मात्र भारतीय संघाचे चित्र अधिक परिपूर्ण होईल !

जपानविरुद्ध विजय मिळविणे भारतीय चमूला विशेष अवघड जाणार नाही.

प्रश्न आहे तो आस्ट्रेलिया विरुद्धचा !

विजय मिळणार, चांगली लढत देणार का मागच्या वर्षीसारखाच ०–५ असा सणसणीत पराभव पत्करणार ?

**—मुकुंद मणूरकर**

# रंगभूमी

# चित्रकथा गरूड झेपची

## एका तृप्त नाटकाची

**माधव कुलकर्णी**

तशी नाटकं बरीच येत असतात.
पण ज्यांची उत्सुकतेनं वाट पाहावी अशी थोडीच.
'गरूड झेप' त्यांच्या पैकीच.
कादंबरीकार रणजित देसाई आणि नाटककार वसंत कानेटकर यांनी संयुक्तपणे योजलेली ही गरूड झेप. अशी तोलामोलाची युती नाट्यलेखनाच्या क्षेत्रात घडली नव्हती. शिवाय नीटस् निर्मितीसाठी प्रख्यात असलेली मोहन वाघांची चंद्रलेखा ही नाट्यसंस्था. श्रीकात व आशालता सारखे गुणी कलाकार व दत्ताराम बापूसारखा तपस्वी दिग्दर्शक असा सुवर्णयोग जुळून आल्यामुळे वर्षाअखेरीचा दिवस आणि वर्षारंभीची रात्र 'गरूड झेप'नं गाजविली. सकाळी, दुपारी, रात्री आणि मध्यरात्री (खरंच हो!) लावलेले 'गरूड झेप'चे चार खेळ 'हाऊस फुल्ल' गेले. मोहन वाघांना त्या रात्री–चुकलो, दुसऱ्या दिवशी सकाळी नक्कीच शांत झोप लागली असेल. पहिल्याच दिवशी वीस हजाराच्या आसपास गल्ला गोळा झाला हे त्याचं कारण असणारच पण त्याहीपेक्षा जवळजवळ चार हजार प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरील आनंद त्यांनी डोळे भरून पाहिला हे अधिक महत्त्वाचं. शिवाय सर्व कलावंतांनी आणि कार्यकर्त्यांनी थोडंही न थकता वाढत्या रंगतीनं प्रयोग रंगविले हाही एक मोठा विक्रमच म्हटला पाहिजे. या समाधानालाही तोड नाही.
होय,
'गरूड झेप' पाहून प्रेक्षक समाधान पावले हे तर नक्कीच याचं कारण हे नाटक उत्तम बांधलेलं होतं. लेखनात घोटीवपणा होता, भावनोत्कट क्षण टिपण्याची कारागिरी चोख होती. श्रीकांत मोघे शिवरायाचं मन अभिनयातून व्यक्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होता. त्यांची आई तेव्हा किती थकली असेल व वयोमानानं तिचं मन किती हळवं झालं असेल हे आशालताचा अभिनय पाहून समजत होतं. औरंगजेबाचा मुत्सद्दीपणा आणि दूरदृष्टी वेगळेपणानं जाणवत होती.
दत्ताराम बापू हे जुन्या पिढीतले दिग्दर्शक, परंतु नव्या दृष्टीने लिहिलेली शिवचरित्रावरील नाटकं ते समर्थपणानं उभी करू शकतात या अनुभवाचा पुनःप्रत्यय आला. श्रीकांत हा कुणाचीही नक्कल न करणारा नट. परंतु बापूंच्या उच्चारपद्धतीचा प्रभाव त्याच्यावरही जाणवला. त्यात चूक काहीच नाही. आणि तसा तो श्रद्धाळू देखील आहे. 'माझ्याकडे शिकायला या रे' असं नानासाहेब फाटकांनी अनेकांना आवाहन केलं. पण धडे घेऊन आला फक्त श्रीकांतच.
'गरूड झेप' इतकं ठाकठीक होऊनही मनाचं पूर्ण समाधान झालं का? माझं नाही झालं. त्याची मुख्य जबाबदारी लेखनावर. 'गरूड झेप'च्या लेखनात तृप्ती आहे पण धडपड नाही. आणि धडपडीशिवाय उत्स्फूर्तता जाणवत नाही. आणि ज्या लेखनात उत्स्फूर्तता नाही ते विलक्षण उंची गाठू शकत नाही. कानेटकरांच्या अलीकडील लेखनावर हीच तृप्ती पसरली आहे. 'रायगडाच्या' वेळी असं नव्हतं. ते नाटक काहींना आवडलं नसेल पण त्यातील धडपड अमान्य होणार नाही.
कानेटकर या तृप्तीतून मुक्त होतील का?
होतीलही.
पण त्यासाठी कलावंत असमाधानी असावा लागतो.

□



# गरुडझेप



मुहूर्त: स्वरलता मंगेशकर यांच्या शुभ हस्ते.





स्वराज्यावर संकटाचं सावट दाटल
शिवाजी राजे सचिंत झाले.

'हे राज्य व्हावे हे तो श्रींची इच्छा'- मग चिंता करण्याचे कार
काय? मातोश्री जिजाईस आणि पुतळाबाईस हेच आश्वासन महाराज देत आहेत.



मिर्झाराजे जयसिंग व महाराज यांची पुरंदर तहावेळी भेट.

दोन मुत्सद्दी आपल्या प्रतिस्पर्ध्यावर कशी मात करता येईल याचा अंदाज घेत आहेत.





शंभूबाळ केवळ लाडात वाढलेला नाही. तो आहे सिंहाचा छावा. म्हणूनच संकटात हसत हसत उडी घ्यायला तो मुळीच कचरला नाही.




महाराजांनी तलवारीस
नुसता हात लावताच
दिल्लीपती औरंगजेब
भयभीत झाला.
अखेर महाराजांना त्याने
कैद केलेच, परंतु...




महाराज भवानीमातेच्या कृपेने कैदेतून सुटले.

औरंगजेबाच्या काळदाढेतून
महाराज सुखरूप निसटताच हिरोजी
व मदारी आनंदाने बेहोश झाले.





लपतछपत वेश पालटून महाराज मातोश्रीस गडावर येऊन
भेटले तेव्हां मातोश्रीच्या व पुतळाबाईच्या
डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले.



# डोळे जिथे स्थिरावतात त्याही पलीकडे आमचे क्षितिज असते.

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ फक्त कच्चा माल विकते, असे आपल्याला कोणी सांगितले असले तर ते खरे नाही. महामंडळ आणखी कितीतरी कामे करते.

उदाहरणार्थ, लघु उद्योगानी तयार केलेला अनेक प्रकारचा माल विकण्यास आम्ही मदत करतो. आम्ही आयात करतो आणि निर्यातसुद्धा! अडचणीत सापडलेल्या अनेक लघु उद्योगांना आम्ही मदत करतो. लघुउद्योगांचा माल देशी व परदेशी बाजारपेठात यशस्वीपणे विकता यावा म्हणून उद्योगनिहाय संघ बनवून संयुक्त प्रयत्न केले जातात. आता आम्ही अठीच लाख रुपयांपर्यंतची देशी यंत्रसामुग्री हप्तेबंदीने पुरवितो आणि परदेशी यंत्रसामुग्री पुरविण्यासाठीही आमच्याकडे एक नवी योजना आहे. नव्या दिल्लीत अद्ययावत असा त्रिमूर्ति महाराष्ट्र एंपोरियम आम्ही चालवितो आणि लघु उद्योगांचा प्रसार व पुरस्कार करण्यासाठी अनेक प्रकारने प्रसिद्ध करतो.

कच्च्या मालाविषयी बोलावयाचे तर लोहित व अलोहित धातु आणि रसायने मिळून चाळीसपेक्षा अधिक वस्तु आम्ही पुरवितो, हे आपल्याला माहित आहे का? आयात केलेली आणखी अनेक रसायने आम्ही एस्. टी. सी. च्याच दराने लघु उद्योगाना पुरवितो, हे आपल्याला माहित आहे का?

खरे म्हणजे लघु उद्योगाना लागणारी विविध प्रकारची सेवा उपलब्ध करून देणे हाच महामंडळाचा सर्वात मोठा उद्योग आहे.

MSSIDC

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लि.
(महाराष्ट्र शासन निर्मित संस्था)
कृपानिधि, बॅलार्ड इस्टेट, पो. बॉ. नं. ३११ अ, मुंबई ४०० ००१.
फोन: २६११२१ टेलेक्स: ०११.३३९९ तार: MASSIDCORP

Chaitra-MSSIDC 34 Mar Rev.

MANOOS (Chitra Varta Pustak Fortnightly) : Rupee : One : Regd. No. PNC–I

# टॉलस्टॉय–एक माणूस

लेखिका : सौ. सुमती देवस्थळे

## पूर्वग्राहक । विनामूल्य भेट । योजना

कागद, छपाई, बांधणी इत्यादींचे भडकते भाव पहाता टॉलस्टॉय–एक माणूस लेखिका : सौ. सुमती देवस्थळे या चरित्रग्रंथाची किंमत अगाऊ निश्चित करता येत नाही. तरी ती रुपये तीस ते चाळीसच्या घरात जावी असा अंदाज आहे. आपण वीस रुपये भरून पूर्वग्राहक म्हणून नोंदणी करावी. ग्रंथ पाठविण्याचा टपाल–पॅकिंग इत्यादी खर्च मात्र आपल्याला करावा लागणार आहे. [ वीस रुपये दोन सारख्या हप्त्यात भरण्याचीही सवलत आपण घेऊ शकता. ]

☐ पाच वर्षांची साप्ताहिक माणूसची किंवा चित्रवार्ता पाक्षिकाची रुपये शंभर ही वर्गणी आपण एकदम भरली तर हा ग्रंथ आपणास विनामूल्य मिळेल. पाठवणीखर्च आपल्याकडे राहील.

☐ पाच वर्षांसाठी रुपये शंभरची ठेव 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवली तरी हा ग्रंथ विनामूल्य मिळू शकेल. पाठवणीखर्च ठेवीदाराचा.

☐ सव्वाशे रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपण विकत घेतलीत तरी हा ग्रंथ विनामूल्य देण्यात येईल. पाठवणीखर्च ग्राहकाचा.

☐ ग्रंथ १९७४ अखेर प्रसिद्ध होईल.

☐ ठेव असल्यास 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्ट किंवा म. ऑ.ने रक्कम पाठवावी.

☐ पाच वर्षांची वर्गणी पाठविणे असल्यास ड्राफ्ट 'व्यवस्थापक माणूस' या नावावर पाठवावा व सोबतच्या पत्रात चित्रवार्ता पाक्षिक किंवा साप्ताहिक माणूस यापैकी कुठला अंक हवा त्याचा खुलासा करावा.

☐ चेकने रक्कम पाठवणाऱ्यांनी वटणावळ म्हणून एक रुपया अधिक पाठवावा.

☐ या टॉलस्टॉय पुस्तक योजनेची मुदत ३१ मार्च १९७४ पर्यंत आहे.

**राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पुणे–४११ ०३० दूरध्वनी : ५७३५९**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच, संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**